


# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**मराठी व्याकरणातील वादस्थळे**

**डॉ. सुनील रामटेके**




व्याकरण हा विषय तसा जटिलच. त्यातल्या वादग्रस्त जागा शोधून काढायच्या म्हणजे निबिड काळोखात घनदाट जंगलातून वाट शोधण्याचा प्रकार, परंतु असे धाडस डॉ. सुनील रामटेके यांनी केले, नव्हे त्यांनी वाट शोधली आणि सुखरूपपणे त्यातून बाहेरदेखील पडले. अर्थात त्यासाठी किती प्रयास करावे लागले, याची कल्पना त्यांनी दिलेल्या संदर्भस्थळांच्या यादीवरून येते. एकदोन नव्हे, तब्बल एकेचाळीस तज्ज्ञांच्या संदर्भांची यादी आहे. तो आवाका अचंबित करणारा आहे. आणि त्यामुळे कुतूहलही आहे. व्याकरणात वादस्थळे आहेत ती कशी, कोणती आणि कुठे? त्याच कुतूहलापोटी या ग्रंथांचे वाचन केले. आणि त्यावेळी जाणवले, व्याकरणाबाबत आपण किती वरवरचा विचार करतो. कुठे अडले, नाही समजले तर ती जागा सोडून पुढे जातो. परंतु डॉ. रामटेके यांनी नेमक्या त्याच जागांचा शोध घेतला. त्या अर्थाने हा एका अज्ञात प्रदेशाचा प्रवास, शोध आणि परामर्श म्हणावा लागेल. जो वाचत असताना मति गुंग करून टाकतो, नवीन काही सापडल्याचा आनंद देतो, आणि डॉ. रामटेके यांच्या प्रयासाला सलाम करायला भाग पाडतो.

व्याकरण म्हणजे काय? भाषा म्हणजे काय? प्रमाण कुणाला मानायचे, बोली की लिखित भाषेला? भाषा आणि व्याकरण यांचा परस्पर संबंध कसा? भाषा आधी की व्याकरण आधी? असे काही प्राथमिक प्रश्न आहेत. मग व्याकरणाची परंपरा इथपासून सुरुवात करून यातील तर्खडकर, चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले ते आगरकर, खेर गुंजीकर, दामले, राजवाडे, अर्जुनवाडकर अशा अनेक व्याकरणकारांविषयीचा तपशील, त्यांचे वेगळेपण, भाषा आणि व्याकरण यांचा मागोवा घेतलेला आहे. मराठीमध्ये शब्दयोगी अव्यये ही प्रत्यायासारखी असतात. तेव्हा त्यांना शब्द म्हणायचे का? काही शब्दयोगी अव्यये स्वतंत्रपणे येतात व त्यांना अर्थ असतो. मग त्यांची ओळख शब्दजाती म्हणून कशी करायची? अशा प्रश्नांचा परिचय या प्रबंधातून होतो. मराठीतील शब्दांच्या जातींचा विचार केला असता असे लक्षात येते की, आठ जातींच्या व्यवस्थेचा विचार इंग्रजीच्या अनुषंगाने केलेला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी दोष निर्माण झाले आहेत, असे त्यांनी नमूद केले आहे. मराठीतील शब्दविचार या प्रकरणात नामापासून उभयान्वयी अव्ययापर्यंतचा शोध आहे. संयुक्त क्रियापदे, विभक्ती– द्वितीया आणि चतुर्थी (स ला ते / स ला ना ते), शब्दसिद्धी आणि प्रत्यय, उपसर्ग, समास असा विस्तृत पट आपल्यासमोर उलगडून ठेवलेला आहे. तज्ज्ञांनी त्यांच्या विचाराचा ठेवलेला खजिना हा वेगवेगळ्या स्वरूपातील आहे. त्यांच्यातील सूत्र एक असले तरी त्यातील परामर्श, विमर्श, व्याख्या यांच्यात भेद आहेत. त्यामुळे काही वाद उपस्थित झालेले आहेत. या सगळ्यांचा शोध घेऊन त्यांवर आधारित निष्कर्ष काढण्याचे अवघड काम डॉ. रामटेके यांनी केले आहे. त्यातला नेमकेपणा शोधला आहे. आठ प्रकरणात हा प्रबंध बांधेसूदपणे साकारलेला आहे. प्रत्येक प्रकरणात प्रास्ताविकापासून ते निष्कर्षापर्यंत मांडणी केलेली आहे, खाली संदर्भांची सूची दिलेली आहे. शेवटी परिशिष्ट आणि समग्र संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

'मराठी व्याकरणातील वादस्थळे' हा डॉ. रामटेके याचा प्रबंधाचा विषय आहे. त्यासाठी त्यांनी केवळ विषयाचा शोध घेतला आहे असे नाही, तर त्यांची उकल केली आहे, त्यांचा परामर्श घेतला आहे. निष्कर्षापर्यंत येऊन ठाकले आहेत. असे करीत असताना तज्ज्ञांच्या विचारांना धक्का लागण्याची, परिणामी रोषाची आपत्ती येणे स्वाभाविक ठरते. परंतु डॉ. रामटेके यांनी निर्भीड आणि चिकित्सकपणा दाखवून सखोल, समतोल, वस्तुनिष्ठ असे संशोधन पार पाडले, तेही सगळ्यांच्या मतांचा, विचाराचा, सूत्रांचा आदर ठेवून. त्यासाठी वापरलेली पद्धती सुलभ, सोपी, आकलनाकडे घेऊन जाणारी आहे. भाषेवरील प्रभुत्व नजरेत भरणारे आहे. आणि काढलेले निष्कर्ष निर्विवाद आहेत. त्यामुळे अभ्यासकांना एक मोठे दालनच त्यांनी खुले करून दिले आहे, असे म्हणता येईल. त्यांची भूमिका स्पष्ट करणारी प्रस्तावना त्यासाठी अभ्यासकांनी जरूर नजरेखालून घालावी. व्याकरणातील जटिलता आणि त्यांची उकल स्पष्ट करणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे. ते विषयाला साजेसे असेच आहे.

**मूल्य ४०० रु. ● सवलतीत २२० रु.**

# ग्रंथपान

## अचानक

**स्मिता भागवत**




''नियतीनं पुरुषाला भयंकार शाप दिलाय डॅडी! वयात आल्यापासून ते सरणावर चढेतो , तो अनोळखी स्त्रीकडे वासना वा विकृतीपलीकडच्या कुठल्याही भावनेनं बघू शकतो, यावर दुसरा पुरुषही विश्वास ठेवत नाही.'' हे वाक्य आहे, स्मिता भागवत यांच्या 'अचानक...' या कादंबरीतलं. कादंबरी वाचत असताना हे वाक्य १९०व्या पानावर अचानक समोर आलं, काही काळ स्तब्ध झालो. (यासंबंधातला प्रसंग कादंबरीच्या ६ व्या पानावर आलेला आहे.) नेमकं सत्य कशाभोवती गुंडाळलं गेलेलं असू शकतं, तर ते अशा वाक्यांभोवती. हे सत्य किती विदारक असू शकतं, हा आणखी वेगळा भाग. कदाचित अनुभवपरत्वे भिन्न असू शकेल, वास्तव मात्र तेच राहते. कालपरत्वे गढूळ पाणी नितळ झाल्यानंतर साक्षात्कार होणारी मंडळी शुद्धतेचे दाखले देत राहतात, तोपर्यंत पुरुषाच्या जगण्यातलं सत्वच नाहीसं होऊन गेलेलं असू शकतं, गाळ खाली बसल्यासारखं. या कादंबरीचा बराचसा भाग व्यापला आहे तो या सत्याभोवती. पुरुषी नजरेचा अन्वयार्थ आणि त्यातून वाट्याला आलेले कटू अनुभव, हे सत्याइतकेच कटू असतात. त्या सत्याचा अन्वयार्थ शोधण्याचा खडतर प्रयास म्हणजे ही कादंबरी; 'अचानक'!

ही एका विद्वान नायकाची शोकांतिका आहे, संदीप शहा नावाच्या. फाळणीच्या क्रौर्याने होरपळलेलं मन, उध्वस्त झालेलं कुटुंब, अंधारमय वाटावा असा अनिश्चित भविष्यकाळ, यात एकच जमेची बाजू, बुद्धिमत्ता. तिच्या जोरावर स्वतःला अत्युच्च शिखरावर पोहोचण्याचे धाडस तो दाखवतो, परंतु अत्युच्च शिखरावर सारेच रम्य असते, ही कल्पना भ्रामक ठरते. आणि 'आपुले मरण पाहिले म्या डोळा', ही अवस्था समोर उभी राहते, कधी ठरवून, कधी अचानक!

कुठलाही नायक स्वतःचे आयुष्य स्वतः घडवू शकत नाही. त्यात प्रिंससारखा मित्रही खूप मोलाची कामगिरी बजावतो. क्षत्रिय कुलोत्पन्न उदयसिंह उर्फ प्रिंस केवळ मित्रत्वाचे नाते दाखवत नाही, क्षत्रिय कुळाला साजेसे कुलाचाराचे शस्त्र पाठीशी धरून उभा राहतो, अगदी अखेरपर्यंत. त्यामुळे ही कादंबरी जरी सुदीप शहाची आहे, तरी, प्रिंस हा तिचा उपनायक आहे. विक्रमसारखा विद्यार्थी गुरुजनांचा करावा तितका आदर करतो, नव्हे कर्तव्यभावनेने संपूर्ण जबाबदारी घेतो. या विक्रमचे नाते म्हणजे प्रिंसचा जावई, आणि प्रिंसची कन्या प्राची, तिचे 'प्राची' हे नामकरण संदीपने केलेले आहे.

डॉ. जॉर्ज ही एक प्रभावी व्यक्तिरेखा या कथानकात आहे. ती संदीपचा पुर्नजन्म करते, संदीप ऐवजी 'व्ही जे प्रसाद' या नावाने. डॉ. जॉर्ज हे त्याच्यासाठी मानसपिता ठरतात. कठीण परिस्थितीत सदैव सोबत करतात. तर मेहरा नावाचा सासरा. कपट आणि धूर्तपणा असलेला. गर्विष्ठ पूनम आणि भाबडी प्रिया अशा दोन मुलींचा पिता. कधीकाळी प्रिंसच्या राजवाड्यात काम केलेला, चोरी करून पळालेला. संपत्ती आणि वैभवाला किंमत देणारा. संदीप उर्फ प्रसाद या नायकाचा छळ करणारा. त्याची मुलगी प्रिया ही प्रसादची पत्नी झाली, पुढे तीही बापाप्रमाणेच प्रसादच्या छळात सहभागी झाली. पूनम तर कॉलेजपासूनच त्याचा द्वेष करीत होती. आणि उरला सुरला छळ कॉलेजच्या मुलांनी केला, त्याला कारण अल्पना. असा छळ की त्याला एकच उपाय, राजीनामा आणि कॉलेज सोडणे. जगण्याने छळले होते...अशी अवस्था. यात इतर व्यक्तिरेखा येतात, पैकी दिप्ती व अल्पना या कन्या. त्यांच्या व्यक्तिरेखांतील बदल हा कादंबरीचा तोल सांभाळण्यात मोलाची जबाबदारी पार पाडतो.

एक कादंबरी म्हणून या साहित्यकृतीकडे पाहताना ती सर्व निकषांवर उतरली आहे, हे स्पष्टपणे दिसते. कथानकाचा वेग कायम ठेवण्यासाठी फ्लॅशबॅक पद्धतीचा अवलंब केलेला आहे. मुख्य कथानक संदीप शहाचे आहे, परंतु यात आलेल्या व्यक्तिरेखांची स्वतंत्र वाटावीत अशी उपकथानके आहेत. त्यांच्या वास्तवाची वर्णने तितकीच चपखल आहेत. स्वभाव, गुणदोष, नाती यांच्यातील बारकावे लहाल लहान तपशीलातून उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्याच उत्तम कलाकुसरीने त्या सगळ्यांना एकत्र गुंफण्याची किमया केलेली आहे. विमानात बसलेल्या प्रसादला बाहेर बोलावण्यासाठी खोटी अनाऊंसमेंट केली जाते, 'डॉ. प्रसाद, ..युवर डॉटर इज फेसिंग क्रिटिकल प्रॉब्लेम.' क्षणार्धात प्रसादला गळफास आवळलेल्या बापूचं प्रेत हेलकावल्याचा भास होतो. गुंफण घटनांची, नात्याची, पुन्हा काळाची. वाचताना लेखिकेच्या कल्पकतेची, प्रतिभेची उंची पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येत राहते.

सतीश भावसार यांची मुखपृष्ठाची कल्पकता नेहमीच वाचकाच्या कल्पनेला साद घालणारी असते. कथानकातला नायक जो सतत परिस्थितीचा सावज ठरत गेला, तरी त्याने आपला स्वाभिमान आणि मनाचे हळवेपण कायम जोपासले आहे. हे जपणे मोडून गेलेल्या खोडावर विसावलेल्या लहानशा पक्ष्याप्रमाणे. अल्पना ही कन्या या पक्ष्याप्रमाणेच लहान, निरागस परंतु तीच एका टप्प्यावर मोडून पडायला कारणीभूत ठरलेली. हे सारे उत्तम रीतीने मुखपृष्ठावर उतरले आहे.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**

ग्रंथाली

# ग्रंथपान

## सत्यमेव जयते

**यशवंत व्हटकर**




यशवंत व्हटकरांनी पोलिसदलात प्रवेश केला तो उपनिरीक्षक या पदावर, ते साल होते १९८४. आज आपल्यासमोर ते त्यांचे तिसरे पुस्तक घेऊन येत आहेत तेव्हा त्यांचा हुद्दा आहे साहाय्यक पोलिस आयुक्त! म्हणजे पूर्ण तीस वर्षांचा अनुभवसिद्ध लेखक आपल्या भेटीला आले आहेत, असे ठामपणाने म्हणता येते. पोलीसदलातला एक जबाबदार कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण करणे म्हणजे तळहातावर निखारा ठेवून चालण्यासारखे, परंतु व्हटकर त्यात यशस्वी ठरलेले आहेत, तावून सुलाखून निघालेल्या अजोड दागिन्यासारखे, त्याचा चढता आलेख आपल्यासमोर त्यांनी ठेवला आहे तो ‘गुन्हेगारांच्या मागावर’, ‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’ आणि ‘सत्यमेव जयते’ या तीन पुस्तकांतून!

मुंबईत गँगस्टर स्वतःचा सुभा कसे सांभाळतात, याच्याविषयीची माहिती साधारणपणे मुंबईतल्या प्रत्येकाला असते, अगदी नावासहित. त्यातले एक नाव आहे अरूण गवळी यांचे. त्यांचा दगडीचाळीचा गड कसा अभेद्य आहे हेही सर्वजण जाणून आहेत. परंतु त्या गडाला सुरूंग लावला आणि डॅडी जन्मठेपेवर पोहोचले, ते व्हटकरांच्या साहसी कारवाईमुळे. तीच तऱ्हा चिन्या उर्फ अशोक मोनासिंग नेपाळी या तीस गुन्ह्यांचे रेकॉर्ड अंगावर असलेला आणि हातात कायम दीड फुटाचा कोयता बाळगणारा गुंड याची. तोही पकडला गेला. खंडणी घेऊन पेपर चालवणारा तिवारी ठिकाणावर आला. मुंबईत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, हा महानगरपालिका, न्यायालय आणि पोलीस यांच्यासाठी एक जटील प्रश्न. ही अतिक्रमणे, बांधकामे पाडणे व त्यासाठी पोलीस बंदोबस्त याचा खर्च महापालिकेला सोसावा लागतो. महम्मदी मस्जिद प्रकरण प्रदीर्घकाळापासून प्रलबिंत होते. त्याच्यावर पूर्णपणे कारवाई झाली ती व्हटकरांच्या धाडसामुळे, प्रश्न सोडविण्याच्या कुशलतेमुळे. साकीनाका येथील एका व्यापाऱ्याचा मुलगा, मैफुस याचे खंडणीसाठी अपहरण करण्यात आले होते. त्याची सुटका सहीसलामत झाली, ती व्हटकरांच्या कार्यपद्धतीमुळे.

३० जून २००७ रोजी पुराचा जबरदस्त फटका साकीनाका भागाला पोहोचला. तेव्हा तेथील जवळपास ६५ लोकांना वेढलेल्या पुरातून बाहेर काढण्याचे काम व्हटकरांच्या तुकडीने त्यांच्यासह केले, परंतु त्याचे मिडियासमोर भांडवल केले नाही. लग्न जुळवायला घरी कुणी नाही म्हणू लग्नाशिवाय राहिलेल्या वर्षाचे लग्न जुळले पाहिजे म्हणून त्यांनी दाखविलेली तळमळ आत्मीयतेची होती. दारूपायी घराकडे दुर्लक्ष करणाऱ्या चव्हाण अंमलदारास योग्य त्या मार्गाने व्यसनमुक्त करून कुटुंबवत्सल बनविले. साबिरा नावाच्या बाईने पोलिसांवर केलेले बलात्काराचे आरोप, त्यात आहुती पडणाऱ्या विनय घोरपडे या सहकाऱ्यासाठी त्याच्या पाठीशी शेवटपर्यंत उभे राहून एकाकीपणे दिलेली झुंज यशस्वी झाली, ती व्हटकरांमुळे. सत्यासाठी हा लढा आवश्यक होता, तो त्यांनी जिद्दीने तडीस नेला. पोलिसांची होणारी बदनामी दूर करून त्यांनी शान वाढविली. पोलिस ठाणे, पोलिसवसाहत स्वच्छ व सुंदर ठेवता येते, रिकाम्यावेळात, खेळ–व्यायाम असे उपक्रम पोलिसांसाठी राबविता येतात, हा अनुभव पोलिसांना मिळाला तो व्हटकरांच्या सौंदर्यदृष्टीमुळे.

व्हटकरांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी वरिष्ठाची प्रशंसा, प्रशस्ती, रोख बक्षिसे, बढती मिळाली. तरी सगळेच सुरळीत होते असे नव्हे. कोर्टात जाताना गणवेष घातला नाही म्हणून झालेला अवमान, पटेलबंधूप्रकरणी हलगर्जीचा ठपका ठेवून झालेली शिक्षा. वरिष्ठांची अवकृपा आणि त्यातून झालेला मानसिक त्रास, हेही व्हटकरांच्या वाट्याला आलेले आहे. किंबहुना वरिष्ठांची अवकृपा हाताखालच्या कर्मचाऱ्याला कशी देशोधडीला लावू शकते, याचेही उदाहरण म्हणून राजा सावंतचे प्रकरण दिलेले आहे. तशी काही परमवीरसिंह, बिहारी, प्रसन्ना, त्यागी मॅडमसारखी चांगली वरिष्ठमंडळीही त्यांना भेटली आहेत.

पुस्तकांची मांडणी करताना ती प्रकरण क्रमांक घालून केलेली आहे. प्रकरणांच्या सुरुवातीला थोर साहित्यिक, विद्वान, तत्त्वज्ञ यांचे विचार शीर्षभागी दिलेले आहेत. उत्तम साहित्य वाचनाचा छंद त्यांनी जोपासलेला आहे, याचा प्रत्यय यातून येतो. हेमंत करकरे, अशोक कामठे, विजय साळसकर हे २६/११ च्या दहशतवादी हल्लयात शहीद झाले, त्यांच्याविषयीच्या हृद्य स्मृतींना ‘आदरांजलीत’ उजाळा दिलेला आहे. त्यांच्याविषयी लिहिताना ते नमूद करतात, ‘ देशबांधवांच्या रक्षणासाठी रणांगणात धावून गेले आणि धारातीर्थी पडले, अमर झाले... देशावर आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यास प्रथम महाराष्ट्रच उभा राहतो. ’

एका कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय, तडफदार, सौदर्योपासक व करड्या गणवेशात माणुसकीचा गहिवर असलेल्या यशवंत व्हटकर नावाच्या अधिकाऱ्याशी आपली खूप जुनी मैत्री आहे, आपण त्यांच्या खूप जवळचे आहोत; ही भावना आपोआप त्यांची पुस्तके वाचल्यानंतर मनात रूजत जाते. पोलिसखात्यात सगळेच यशवंत व्हटकर असतील तर किती चांगले होईल.

पुंडलिक वझे यांनी ‘मुंबई आणि मुंबईचे पोलीस’ ही संकल्पना समोर ठेवून ‘जागल्याची’ प्रतिमा सुरेखपणे मुखपृष्ठावर चितारली आहे.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

## सदरक्षणाय खलनिग्रहणाय

**यशवंत व्हटकर**




'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे पुस्तक म्हणजे यशवंत व्हटकर यांच्या कारकिर्दीचा दुसरा टप्पा. पोलीस खात्यात नोकरी करीत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे, हे त्यातले मोठे आव्हान. पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली म्हणजे आपल्याला न्याय मिळणारच, अशी ही अपेक्षा असते. परंतु तिची पूर्तता करताना पोलिसांना किती जिवाचे रान करावे लागते, तहानभूक विसरून माग काढीत जावे लागते. वरिष्ठ, राजकीय हस्तक्षेप, नागरिकांच्या भावना, यासारख्या अनेक कुंपणांची कदर करावी लागते, काटेरी भासत असूनही. स्थळ–काळ कुटुंब यांचे भान विसरून कर्तव्याला समर्पित भावनेने पार पाडण्यासाठी झोकून द्यावे लागते. सत्य, न्यायाची कास धरून खलप्रवृत्तीचे दमन करण्याच्या ध्यासासाठी आपले कौशल्य आणि शक्ती पणाला लावावी लागते. याची कल्पना यातून वाचकांना यावी, असे हे पुस्तक.

यशवंत व्हटकर यांनी अधिकारी या नात्याने लोहियासाहेब, आव्हाडसाहेब, विक्रम मराठेसाहेब, बिहारीसाहेब, केदारीसाहेब, अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विविध खात्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी कामे केलेली आहेत. त्यांची प्रशंसा मिळविलेली आहे. काहीवेळेस रोषालाही सामोरे गेलेले आहेत, परंतु आपल्या कामातले नाणे कायम खणखणीत राहील याबाबत दक्षता घेतलेली आहे. खून हा या दलासाठी सगळ्यात घृणास्पद आणि क्लिष्ट प्रकार. त्याची उकल करताना पोलिसांना किती दिव्यातून जावे लागते याची कल्पना या घटनांचे तपशील वाचल्यानंतर लक्षात येते. भारती पाटील खून, ननकूने केलेला खून, गोदीत काम करणाऱ्या बाळूचा खून, अशी काही प्रकरणे आहेत. यांचा शोध घेताना स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अभ्यास किती अंगांनी करावा लागतो, संशयिताला गुन्ह्याच्या मुळाशी आणताना चातुर्याची कशी कसोटी लागते, हे थक्क करणारे अनुभव मुळातून वाचण्यासारखे आहेत. यातील धारावीतील एका खुनाच्या तपासासाठी रामप्यारे नावाच्या संशयित आरोपीला पकडण्यासाठी उत्तरप्रदेशातील प्रतापगड नावाच्या गावी जाण्याचा प्रसंग व त्यातून उद्भवलेल्या घटना म्हणजे स्वतःहून स्वर्गाच्या द्वारावर थाप देऊन त्याला उघडायला भाग पाडण्याचाच प्रकार.

तेलगी प्रकरणाने बनावट स्टॅम्पपेपरचा घोटाळा उघड झाला. परंतु त्याच्यावरही मात करू शकेल असे मुद्रांकशुल्क बनावट फ्रँकिंग प्रकरण निर्माण झाले, तेव्हा सगळ्यांनाच अचंबा वाटल्याशिवाय राहिला नाही. यातला प्रमुख सुत्रधार अशोक पारेख याच्यापर्यंत माग काढून, हे प्रकरण धसाला लावण्यात दाखविलेले कौशल्य, हे 'रॉ' संस्थेच्या पातळीवरचे ठरावे. विक्रोळीत मिरवणुकीच्या दरम्यान झालेल्या स्फोटाचे निदान वेळीच केल्याने मोठी जातीय दंगल टळू शकली. तेलचोरांचे रॅकेट वेळीच पकडल्याने संभाव्य अग्निस्फोट व त्यातून होणारी मोठी हानी टळू शकली. मेधा पाटकरांच्या मंत्रालयाजवळील उपोषणाने निर्माण झालेली परिस्थिती, कोर्ट आदेश, यांच्यामध्ये सापडलेले पोलीसखाते, परंतु अतिशय संयमाने हे प्रकरण हाताळल्याने नामुष्की टळली. अंबानीच्या घरी रात्री दहानंतर सुरू असलेला डीजेवरील गरबा शांत करण्यासाठी योग्य ते भान ठेवून कारवाई केली. अनधिकृतपणे मंदिर उभारणे, मोकळ्या जागेत पक्षाचा झेंडा लावणे, यातून जातीय तेढ निर्माण होते. त्यावर कारवाई करून ही तेढ दाबून टाकली. अशा कितीतरी घटना आहेत, ज्या ठिकाणी यशवंत व्हटकरांतील अधिकाऱ्याच्या कुशलतेचा कस लागलेला आहे. राजीव – मीनल यांच्या प्रेमविवाहाला विरोध करणाऱ्या आप्तांना शांत करून प्रेमवीरांना शांततेचे आयुष्य बहाल करण्यात दाखविलेले औदार्य, पार्ला बॉम्बस्फोट प्रकरणात शेवटच्या टप्प्यापर्यंत जाण्यासाठी केलेली धडपड वाखाणण्यासारखी ठरूनही अपयश आले, ही जिव्हारी लागणारी खंत, त्यांच्यातल्या माणूसपणाची साक्ष देतात.

राजकीय हस्तक्षेप किती पराकोटीचा असतो, त्याचा इमानदार अधिकाऱ्यास कसा त्रास सहन करावा लागतो, याचे उदाहरण म्हणजे शांतीनगरची निवडणूक. तडकाफडकी बदलीची शिक्षा व्हटकरांच्या वाट्याला आली ती इथे. कामाच्या अतिघाईतून हरवलेल्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमुळे झालेली शिक्षा, नाते राखलेल्या अधिकाऱ्यांच्या जवळच्या माणसांची कसून चौकशी केली म्हणून ओढवून घेतलेली नाराजी, गंभीर आजारपण व आकसापोटी नाकारलेली 'रजा', अशा प्रसंगांनी त्यांच्यावर मानसिक आघातही केले आहेत. कोल्हापूर प्रवासात चहात गुंगीचे औषध टाकून फसवणारा सहप्रवासी त्यांना वेगळी चुणूक दाखवून जातो, हेही त्यांनी प्रामाणिकपणे मान्य केले आहे.

यशवंत व्हटकरांचे हे लेखन अनुभवसिद्ध आहे. यात त्यांचे अधिकारी म्हणून असलेले गुण, माणूस म्हणून असलेले माणूसपण आणि त्यांचे सहकारी याविषयीचा मोकळेपणा सहजपणे उतरला आहे. कुठे आकस, द्वेष, कटुता नाही की स्वतःची स्तुती नाही. जसे घडले तसेच निवेदन केले, असेही नाही. तर त्यात ओघवतेपण आहे, लालित्य आहे. त्यामुळेच ते वाचताना वाचकाला आपल्यासोबत प्रवासाला घेते. पोलीसखात्याची ठळक निशाणी म्हणजे वर्तुळातील स्टार, त्यात हाताचा पंजा; अधिकाऱ्याची निशाणी म्हणजे छडी आणि कॅप; आणि गुन्हेगार शोधण्यासाठी बोटाचा ठसा व भिंग, यांचा योग्य तो समन्वय ठेवून सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. त्यामुळे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्याचे शीर्षक सजीव झाले आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




**आनंदाची मुळाक्षरे**

**प्रल्हाद जाधव**

'आपलं स्वातंत्र्य कशात आहे हे जर प्रत्येकाला कळलं, आपली जागा कोणती आहे हे जर प्रत्येकाच्या लक्षात आलं, आपल्या जीवनाचा उद्देश नेमका काय आहे हे जर प्रत्येकाला कळलं, तर सगळं जग सुखी होईल. ज्यांना हे कळतं ते भाग्यवान! बाकी सारे अहंकार, तृष्णा, वासना, स्वार्थ याच्या महासागरात गटांगळ्या खात जगतात. जगणं कसलं ती फरफटच एक प्रकारची! आपण किती घोर अज्ञानात जगत आहेत हेही बिचाऱ्यांना कळत नाही.'

महाभारतातील शेवटचा श्लोक : नच कश्चित श्रृणोति माम् । व्यास दोन्ही हात उंचावून मी सर्व जगाला ओरडून सांगत आहे की, धर्म, अर्थ, आणि काम यातील नीती आणि नियम सांभाळून आनंदाने जगा, पण कोणीच माझे ऐकत नाही. जर व्यासांचे कुणी ऐकणार नसतील तर...नाही. ऐकणारे सारेच असतात, सांगणारा कुणीतरी असावा लागतो. ही भूमिका कुणीतरी घ्यावीच लागते, वठवावी लागते. ती जबाबदारी लेखकाची असते असे नाही, आणि नसते असेही नाही. लेखकाची स्वतःच्या मनात काही एक भूमिका नक्कीच असते, आपल्याला आपल्या लेखनातून काय सांगायचे आहे, का सांगायचे आहे आणि कसे सांगायचे आहे, त्याला अनुसरून लेखनाचा प्रवास सुरू होतो. त्याला जे सांगायचे आहे, ते त्याचे व्यक्त होणे असते, आपल्या संवेदनशील मनाच्या भावनांचे. या भावना जोडलेल्या असतात आपल्या भोवतीच्या जगण्याशी, निसर्गाशी, व्यवस्थेशी. लेखक या सगळ्याशी एकजीव झालेला असतो, त्याचाच एक भाग झालेला असतो. धर्म, अर्थ आणि काम यातील नीतिनियम सांभाळून आनंदाने जगण्याचा प्रयत्न त्यालाही आपलासा वाटतो आणि आपल्यासोबत इतरांनीही आनंदी असावे अशी त्याची धारणा असते, आग्रह असतो. ती धारणा ठेवून प्रल्हाद जाधव 'आनंदाची मुळाक्षरे ' घेऊन आपल्यासमोर हजर झाले आहेत.

'आनंदाची मुळाक्षरे ' हा प्रल्हाद जाधव यांचा नवा लेखसंग्रह, त्यांच्या 'आनंद नक्षत्र' या लेखसंग्रहाची आठवण करून देणारा. यात सत्तेचाळीस लेख आहेत. प्रत्येकाचा विषय वेगवेगळा,त्याची धाटणी वेगळी. त्याच्या सर्व पैलूंना हळूवारपणे आणि तितक्याच समर्थपणे उलगडत जाताना आपण अनुभवतो. एकाच विषयाला वेगवेगळ्या अंगांनी पाहता येते, प्रत्येकाला स्वतःची बाजू असू शकते, ती सकारात्मक-नकारात्मक, सक्रिय निष्क्रिय, खोल -उथळ, प्रकाशमान -काळोखी अशी कुठलीही. तिची एकेकबाजू उलगडून पाहताना नक्कीच आनंद होतो, पाकळ्या उलगडून पाहिल्या सारखा. आपण नेहमीच एकाच बाजूचा विचार करीत जातो. पण आपण दुसरीही बाजू उलगडून वा तपासून पाहिली पाहिजे, हे सदरच्या लेखसंग्रहातील लेख वाचताना लक्षात येते. २६ जुलैच्या पावसात सगळेच व्यवहार ठप्प झाले होते, जीवन मात्र चालू होते. अशावेळी बाळंतपणासाठी आलेल्या महिलांना दवाखान्यात दाखल करून घ्यायचे की नाकारायचे, दिवे नाहीत, स्टाफ नाही आणि ऑपरेशन थिएटर चालू नाही, या कारणास्तव? एक डॉक्टर अशा सर्व अडचणी असूनही महिलेला रात्री दाखल करून घेतो आणि ती नैसर्गिकरीतीने बाळंत होईल याची काळजी घेतो, तर दुसरा डॉक्टर याच अडचणींचा पाढा समोर ठेवून महिलेला बाहेरचा रस्ता दाखवतो. आपल्यावर कुठले अरिष्ट येऊ नये म्हणून. यात कुणाचे बरोबर, कुणाचे चूक हे नंतर. मुद्दा आहे तो, लेखकाला दिसलेले भोवतालचे अनुभव, एकाच विषयाचे. यात कुठला बोध कुणी घ्यावा, हा विषय नाही, विषय आहे विचार करण्याचा, जो प्रत्येकाने करावयाचा आहे. तसे झाले तर व्यासाला वैफल्यग्रस्त होण्याची वेळच येणार नाही.

मानवी मनाचे अनेक कंगोरे उदाहरणांसहित लेखांमधून आलेले आहेत, कामापुरता वापरून घेतलेला तुतारीवाला काम संपताच खिजगणतीतून बाद होतो. आपल्या मुलाऐवजी आपण दुसऱ्यांच्या मुलांना चॉकलेट देण्यात उत्साही असतो, मुलांवर पालक म्हणून आपलीच सत्ता असते, मुले ऐकतात तो पर्यंत, पुढ्यातले ताट द्यावे की बसायचा पाट द्यायचा, आणाचा चहा आणि नानाचा चहा, अशी कितीतरी उदाहरणे आहेत, जी वाचत असताना आनंद तर होतोच, परंतु त्याचवेळी अंतर्मुखही होतो. जाधवांच्या लेखांनी नक्कीच आनंद दिला असे एक वाचक म्हणून आवर्जून सांगावेसे वाटते. तरल आणि चपखल भाषा, योग्य ठिकाणी थोरामोठ्यांची अवतरणे, यामुळे आपल्या वाचनात संदर्भांची भर पडत जाते. प्रदीप म्हापसेकरांनी आतील रेखाटने आणि मुखपृष्ठ लेखाबरहुकूम छान सजविलेले आहे.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

## आरसपानी जगताना
**डॉ. वीणा सानेकर**



‘खरोखर शाळा नको असू दे चकाचक, तिच्यात नको एसी, नको लिफ्ट, पण शाळेत हवेत प्रत्येक मुलाचं बोट घट्ट धरून ठेवणारे शिक्षक! आईपेक्षासुद्धा मुलांना बाई आवडू लागल्या तर आईने समजावं आपलं मूल योग्य हाती सोपवलंय आपण.’

‘फुटलेल्या स्वप्नांच्या काचा वेचून त्यांची बिलोरी नक्षी रचणं खूप कमी माणसांना जमतं.’

‘आशेचा धागा आयुष्य बळकट ठेवेल. तो सोडू नका. शेवटपर्यंत एखाद्या जिद्दीनं आपलं आयुष्य ओतप्रोत भरून टाका. आत्मबळ आणि दुर्दम्य इच्छाशक्ती हेच या व्याधीवरचं रामबाण औषध आहे. ते विकत घेता येत नाही. जगातल्या कुठल्याही मेडिकन शॉपमध्ये ते मिळत नाही. त्याचं प्रिस्क्रिप्शन आधी स्वतःला लिहून द्या नि मगच गाठा जगातला कोणताही धन्वंतरी अन्य औषधासाठी!’

अशी सुंदर वाक्ये एकमेकांचा हात धरून समोर उभी राहिली, सुभाषितांचा गणवेश बाजूला ठेवून, तेव्हा मोहरून गेलो, अलवार होत गेलो. किती सुंदर वाक्ये, कल्पकता, विचार आणि काव्याचा साज ल्यायलेली. एक फूल म्हणजे बाग नव्हे. परंतु बागेतलं एखादंच फूल मोहिनी घालणारं असू शकतं. अनेक असतील तर स्वर्ग अवतरल्याचा आनंद होतो. तशी गत झाली ती ‘आरसपानी जगताना’ हा डॉ.वीणा सानेकर यांचा लेखसंग्रह वाचताना. लेखसंग्रह , त्यातून तो वृत्तपत्रीय स्तंभलेखनाचा, म्हणजे त्याला स्वतःच्या मर्यादा असणार, हे नक्कीच. त्याला त्याच्या परिघाबाहेर जाण्याची मुभा नसते. जे सांगायचे ते त्यात चपखलपणे बसविण्याचे आव्हान असते, चाकाच्या आरे–पाठे यांना धावेच्या परिधात बसविण्यासारखे. त्यातून ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे कालबंधन असते, टांगत्या घडाळ्याच्या काट्यासारखे. अशावेळी स्तंभलेखक त्या लेखाला कितपत न्याय देऊ शकेल, अशी शंका येण्याची शक्यता जास्तच. परंतु चाफ्याचा जातिवंतपणा अंगी असलेल्यांच्या बाबतीत अशी शंका घेणे म्हणजे अरसिकतेचे प्रदर्शन. डॉ. सानेकर यांच्या लेखनाच्या कला कलेकलेने कशा आकाश कवेत घेत जातात, त्याचा सुंदर अनुभव या शंकाना भिरकावून देतात, उल्केसारख्या. एका ध्यानमग्न उर्जेने त्यांनी या लेखांना जोजवलेले आहे, गोंडस बाळांसारखे.

आपल्या जगण्याशी धाग्यांनी घट्ट आवळलेले कितीतरी विषय आहेत, ते येथे हातातळले आहेत. शाळा, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षण, शिबिरे, भाषा, पुस्तके, घर, लेक, नाटक, भेटागाठी, कविता, गाणी, व्यक्तिरेखा, बोधकथा, निसर्ग, नाती, उद्योगीपणा, असे अनेक विषय. परंतु हे नुसते विषय नाहीत, ते घेऊन येतात जगण्याचा अनुभव, धडपड, अवघडलेपण, सुंदरता, हास्य. परंतु या सगळ्यात भावते ते लेखिकेची कवितेप्रती असलेली ओढ, गाण्यांनी ओथंबून भरलेले मन. कितीतरी जुनी गाणी जगण्यातला तरल भाव सांगतात. कवितांमधून आपलेपण दाखवितात. शंकर वैद्य, विंदा, कुसुमाग्रज, शांता शेळके यांचे भावविश्व अनुभवाशी जोडले जाते. राजू तुलालवार आणि बालनाट्य हा विषय वेगळ्या पातळीवर नेणारा विषय. मुलांच्या धीटपणाची पायाभरणी इथे होते. त्यातील सृजनता प्रत्येक पालकाने लक्षात घेण्यासारखी आहे. घर हा विषय लँडलाईनच्या फोनसारखा मनमुक्त स्वागत करतो. शांतिनिकेतनच्याप्रमाणे बिनभिंतीची शाळा, ही कल्पना सुंदरच. सादाकोची जिद्द, आनंदाचा कंद, आता प्रकाश प्रकाश.., पुदिनावाली खमंग मावशी, परंपरा, स्वप्न असे अनेक लेख आहेत, जे विचारांना नवा विचार करायला भाग पाडतात. वेदनांचा हुंकार मधील ‘जिन्हे नाज है हिंद पर वो कहाँ है.. या ओळी तर आपणास आपला विकलपणाच उघड करून दाखवितात. ‘कधीतरी जाणवतं का आपल्याला आपल्यातही होतं एक निरागस मूल’ ही ओळ अंतर्मूख होऊन भूतकाळावरचे पांघरूण बाजूला करायला भाग पाडते. लेखांचं यशापयश असं असत नाही. परंतु सारं सार केंद्रित होतं ते शेवटात. ते शेवट हे या लेखांचे खरे वारसदार म्हणायला हवेत. त्यावर कळस चढवतात ती शीर्षकांची नावे.

या संग्रहाला किशोर बेडकिहाळ यांची मर्मज्ञ प्रस्तावना लाभलेली आहे. त्यांनी लेखिकेच्या लेखनाचे केलेले कौतुक आणि विश्लेषण ही या मोराच्या शिरावरील तुऱ्यासमान आहे. ते म्हणतात, ‘यातील लेख आकाराने लहान आहेत पण जाणीव व आशय मोठे आहेत. आपले जगणे विविध अंगाने समृद्ध करण्यासाठी अशा लेखनाची गरज भासतेच, ती गरज डॉ. सानेकरांच्या या संग्रहाने भागेल असा विश्वास आहे.

पुस्तकाला लाभलेले मुखपृष्ठ हे खरोखरच आरसपानी म्हणावे असे आहे. सप्तरंगी इंद्रधनुष्यावर पक्षांचा थवा असावा, ही सुंदर कल्पना जगण्यातील सुंदरचे प्रतीक वाटावे. प्रदीप म्हापसेकर यांनी जगण्यातील हा आशय सुंदरपणे टिपला आहे. तर ईशा सानेकरांनी लेखांना आपले हळवेपण रेखाटनातून बहाल केलेले आहे. ही रेखाटने भावगर्भतेचा प्रत्यय देतात.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान

**फुटपाथ ते नोटरी**

**सुजाता लोखंडे**




'सागर, टाक हे टिकास–फावडं आणि शिक्षणाचं हत्यार हातात घे. शिक्षण ही साधना आहे रे. दूध आहे वाघिणीचं. जीवनाच्या व बुद्धीच्या विकासाचं तसेच समाजाच्या प्रगतीचं टॉनिक आहे.' असं वानखेडे गुरुजींनी सागरला सांगितलं नसतं तर? या जातिवंत शिक्षकाने उपदेश करूनही सागरला स्वतःला त्याचे महत्त्व पटले नसते तर?

तर त्याच्या जीवनातला अंधार दूर होण्याची शक्यता असण्याचे कारण सापडले नसते. हाती घेतलेले टिकास आणि फावडे हेच त्याचे साथीदार राहिले असते. कदाचित साधने बदलली असती, प्राक्तनाची पाऊलवाट मात्र तीच मळलेली राहिली असती. कारण त्याच्या भोवतीचे वातावरण मळलेल्या वाटेवरील फुफाट्याने आधीच कवेत घेतलेले होते. हातातोंडांची गाठ पाडताना आई, बहिणी यांनाच झिजावे लागत होते. घरातला कर्ता असलेला, कुटुंबाची काळजी घेण्याची जबाबदारी असलेला बाप बेजबाबदारपणे घरात असून नसल्यासारखा,नंतर घरापासून दूर गेलेला होता. अशावेळी हाताला मिळेल ते काम करण्याला पर्याय नव्हता. न पेलवणारे कष्ट कोवळे हात पेलू लागले होते. लहान वय हे शिक्षणाचं. परंतु शाळेतील शिक्षकाचा धाक असा की, मार नको पण शाळा आवर असा. त्यामुळे शिक्षणाला तेव्हाच अर्धचंद्र मिळाला होता, मनात शिकण्याची आस असूनही. पण आयुष्य असे कुठेही संपून जात नाही. आतली धग कधीतरी पेट घेते, वरची धूळ झटकणारा वारा सोबतीला आला तर. ते परिवर्तन इथे झाले. वानखेडे गुरुजीमुळे. म्हणूनच सागरच्या ओठावर आले, 'शिक्षणाच्या पहिल्या दालनानं आयुष्यातील नवं पान माझ्या हाती लागलं होतं. त्यावर हवा तो मजकूर मला लिहिता येणार होता. तशी संधी मला प्रथमच मिळाली होती. आता कितीही संकटं आली किंवा अपमानाचे कितीही कढ पचवावे लागले तरी वळून पाहायचे नाही, या विचारावर ठाम झालो. त्यासाठी आतापर्यंतचं आयुष्य वैनगंगेला अर्पण केलं.' सागरला वानखेडे गुरूजी हे अज्ञानाच्या उफाळत्या सागरात, दारिद्र्याने व्यापून टाकलेल्या तिमिरात भेटलेले दीपगृह ठरले. आणि सागरला आपला किनारा सापडला.

सागरने अनेक तऱ्हेचे कष्ट केले. हाल अपेष्टा सहन केल्या. त्याचे फळ त्याला मिळाले. रस्त्यावर मजुरी करणारा सागर एलएलबीपर्यंत शिकला. वकिलीचा काळा कोट अंगावर चढला. यावेळी त्याला स्मरण झाले ते वानखेडे गुरूजी, महामानव आणि जन्मदात्रीचं. होय, जन्मदात्रीच. आपलं जगणं बदलायचं असेल तर शिक्षणाला पर्याय नाही, हे तिने वारंवार सागरच्या मनावर बिंबवण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. दिवसभर राबून कुटुंबाचा चरितार्थ चालविला होता. तिच्या नजरेसमोर आदर्श होता तो डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा. तो वसा सागरने पुढे चालवावा असे मनोमन वाटणारी ती माऊली होती. शिक्षण शिक नाहीतर फाटक्यात रायशीन, हे सत्य तिनेच त्याच्या गळी उतरवले होते. पैशासाठी दारू विकण्याचा धंदा करू नकोस, हे ही तिनेच त्यातल्या परिणामासह पटवून, प्रसंगी विहिरीत जीव देण्याची धमकी देऊन त्याला त्यापासून दूर केले. त्यामुळेच सागरचा प्रवास वैनगंगेपासून अरबी समुद्रापर्यंत होऊ शकला. नोटरी होण्यापर्यंत मजल मारू शकला.

दारिद्र्याचे चटके सहन करणे, म्हणजे प्रत्यक्षात आगीच्या भट्टीत भाजून निघण्यासारखे आहे. त्याचे प्रत्ययकारी वर्णन या कथानकात आलेले आहे. गाव, आजूबाजूची माणसं, शाळा, शिक्षक यातून वास्तवदर्शी चित्रण उभे राहिलेले आहे. सागर, त्याची आई, बाप, बहिणी, भाऊ, मामा, मामी, वानखेडे गुरुजी, स्वतः ची पत्नी, मुले यांच्या व्यक्तिचित्रणातून नात्याचा गोफ विणला आहे. भावनांचे, कर्तव्याचे, अपेक्षांचे, वैफल्याचे धागे घट्ट पिळदार झालेले आहेत. यातून लेखिकेचा कसदारपणा दिसून येतो. फ्लॅशबॅक पद्धतीचा अवलंब करून लेखनातला प्रवाहीपणा जपला आहे. निवेदनासोबत विचारांचा, कल्पकतेचाही विणीत सुंदर उपयोग केलेला आहे. 'गावकूस आपली दुसरी माय असते.' 'तुटपुंज्या पगारात पोटातली आग विझत होती पण मानहानीचा वणवा पेटत होता.' 'काळाची महती ओळखून मला त्याला पुढे जाऊ द्यायचे नव्हते व त्याच्यासाठी थांबायचेही नव्हते.' यासारखी वाक्ये लेखिकेच्या परिपक्वतेचा अनुभव देतात. लेखिकेचं सर्जनशील मन, संवेदनात्मक जाणीव आणि कलासक्त भान कांदबरीतल्या घटनांना थेट भिडलेलं असलं तरी तिच्यातली नवनिर्मितीची क्षमता केवळ प्रसंगांचं लालित्यपूर्ण वर्णन करीत नाही तर त्या प्रसंगावर विचारपूर्वक भाष्य करते, अशी शाबासकीची थाप डॉ. भारती सुदामे यांनी लेखिकेच्या पाठीवर प्रस्तावनेतून दिलेली आहे.

निलेश जाधव यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले आहे. फुटपाथचा दिवा आणि त्याच्या खांबावर असलेले वायरींचे अस्तित्व, काळ्या प्रतिकृतीभोवती आवळलेले फास हे तळागाळातल्या वास्तवाचे भान देणारे आहे. आणि त्याचवेळी नोटरीचा शिक्काही ठळकपणे दिलेला आहे. त्यामुळे कथानकाशी एकजीव झालेले मुखपृष्ठ पाहायला मिळते.

**मूल्य १८० रु. ● सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

## निर्भया लढते आहे

**नीलम माणगावे**




निर्भया शब्दाला वेगळ्या अर्थाने सामर्थ्य प्राप्त झाले ते दिल्लीतील अघोरीपौरुषीय आक्रमणाशी अपयशी झुंज देणाऱ्या नवोन्मिलित कळीच्या कुस्करलेपणामुळे. स्वप्नांना जाग येण्यापूर्वी त्यांचे पंख छाटल्यामुळे. अपेक्षांचे अंकुर फुलण्याआधी जळून गेल्यामुळे. तेव्हापासून हा शब्द लढतो आहे स्वतःच्या अस्तित्वासाठी, असहायपणे. त्याचा नाद येताच कानावर आदळते किंकाळी, विकट हास्य, आणि आरपार जाणारा भावनांचा बधीर तीर. एक वासनेचा खेळ जिवाशी, आयुष्याशी, भावनांशी, कुटंबाशी, समाजाशी, तुमच्या आमच्या सगळ्यांशी. गुदमरून टाकणारा हा डाव कधी थांबणार आहे, कुठे थांबणार आहे आणि कोण थांबवणार आहे, आणि ...आणि किती निर्भयांना त्यासाठी लढावे लागणार आहे, अशा प्रश्नांना जन्म देणारा हा शब्द. शीर्षकात त्याचीच योजना करून लेखिकेने आपल्या सगळ्यांना वास्तवाच्या उंबरठ्यावर उभे केले आहे. निलेश जाधवांनी मुखपृष्ठावर तिचेच रेखाटन केले आहे, कृष्णछायेत. ती पाहते आहे समाजातील प्रत्येकाकडे नजरेत तोच प्रश्न घेऊन, हे लढणे निर्भयांच्या हाती का असावे?

नीलम माणगावे यांचा हा कथासंग्रह, दहा कथा असलेला. ज्यांत निर्भया भेटत राहते, वेगवेगळ्या रुपात, वास्तवात. तिच्यावर होणारा अन्याय हा शारीरिक आहे, एवढेच त्याचे स्वरूप नाही. तो आघात असतो तिच्या शरीराबरोबरच भावनेवर, मानसिकतेवर. ज्यातून अनावर होते ती नैराश्याची भावना, जगण्यासारखे आपल्या आयुष्यात काही राहिलेच नाही, इतक्या टोकाची. एक उध्वस्तपणा व्यापून टाकणारी भावना. एकटेपणाच्या आगीत होरपळणारी तगमग. आणखी दुसरा प्रश्न असतो तो स्वत:ला आधार मिळण्याचा, समजून घेण्याचा. कुटुंबाकडून, समाजाकडून. आणि न्याय हवा असेल तर पोलिसांकडून. परंतु अनेकदा ब्रभा, अब्रू, कोण काय म्हणेल हेही आडवे येते. अशावेळी अन्याय, अपमान, तगमग सहन करायची, स्वाभिमान गहाण ठेवून. सारे आयुष्य तो व्रण कुरवाळत राहायचे, एकटीने, मूकपणे. ही एक बाजू. पण वासनेची भूक फक्त पुरुषांनाच असते आणि तिचा निचरा होण्यासाठी हे प्रकार घडतात, असे असले तरी स्त्रियांमध्ये ती नसते असे म्हणता येत नाही. त्यांच्यातही ती तितकीच तीव्रपणे जागृत असते. विधवा, परित्यक्ता, लग्न न झालेल्या प्रौढ कुमारिका यांच्याप्रकरणी हा प्रश्न तीव्रपणे समोर येतो. लोकलाजेखातर जाहीरपणे व्यक्त करणे शक्य नसते, ही आणखी कोंडी. या आणि अशा अनेक प्रश्नांभोवती गुंफलेल्या कथा या संग्रहात आहेत. यात प्रामुख्याने केंद्रस्थानी आहे ती स्त्री!

बलात्कारातून जन्माला येणारे अपत्य, हे तर बायको व नवरा, आदित्य–वसू, दोघांच्याही मानसिकतेची कसोटी पाहणारे परीक्षायंत्र ठरते. त्यातून ज्याना मूलबाळ होत नाही, त्याना हे दान असे मिळाले, तर ते स्वीकारतानाची घालमेल आणखी वेगळी. यात जी मानसिक आंदोलने उठतात, आधार देण्याची, समजून घेण्याची, स्वतःची फसवणूक करून घेण्याची, ती विश्लेषात्मक पद्धतीने टिपणे कठीण गोष्ट आहे. बायकोपासून सुखाला पारखा झालेला सासरा सुनेचा, छोट्या काकीचा घास घेतो. कुंपणानेच शेत खाण्याचा प्रकार. परंतु हा खरा प्रकार कुणाला कळू नये, बापावर आळ येऊ नये म्हणून श्रीकांत–मुलाने तो स्वतःवर घेण्याचा प्रकार आणखीच वेगळा भावनिक गुंता निर्माण करतो. त्यातून मोठ्या कुटुंबात निर्माण झालेला पेच, त्यातील प्रत्येकाचा वैयक्तिक दृष्टिकोन, आणि शेवटी आजीने आपल्या कर्मटपणाला दिलेला दोष, हे सारे म्हणजे कुठचा ओंडका कुठे वाहून जातो, आणि नुकसान कुणाचे कसे होते, इथे ते येऊन थांबते. या उलट परित्यक्तेचा प्रश्न. जिचं वेळीच लग्न लावून देण्याऐवजी, आमच्यात स्त्रीचा दुसरा विवाह लावून दिला जात नाही, यात भूषण माणण्यात मोठेपण दडलेले. परिणामी ती आपसूक सावज म्हणून डॉक्टराच्या पिंजऱ्यात शिरते आणि स्वतःचा घात करून घेते. स्त्रीमुक्ती कार्यकर्तीवरच बलात्कार होतो, तेव्हा तिची मैत्रीण करूणा तिला पोलिसात तक्रार करायला प्रवृत्त करते. गुन्हेगाराला शासन मिळालंच पाहिजे, इथे ही भूमिका घेतली जाते. परंतु त्यापूर्वी मन तयार होणं किती अवघड असतं, याचा प्रत्यय येतो. आणखी काही प्रश्न घेऊन कथा आलेल्या आहेत.

बलात्कार हा विषय घृणास्पद! तो मध्यवर्ती ठेवून लिखाण करणे ही मोठीच अवघड गोष्ट. त्यासाठी मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांची जोड लेखकाकडे असणे आवश्यक ठरते. ते भान नीलम माणगावे यांनी राखलेले आहे हे कथानकातील सखोल विश्लेषण आणि चिंतनातून लक्षात येते. व्यक्तिरेखांच्या तळाचा ठाव घेण्याचा प्रयत्न तर स्तुत्यच म्हणायला हवा. या विषयांकडे त्या त्या व्यक्ती कशा पाहतात, आणि वाचकांनी कसे पाहायला हवे, हेही यातून उलगडत जाते. आपल्या लेखनाबाबतची भूमिका त्यांनी मनोगतात व्यक्त केलेली आहे, तीही समजून घेण्यासारखी आहे. स्त्री ही एक माणूस आहे. तिचे माणूसपण जपले गेले पाहिजे. तिला जगण्याचा हक्क आहे, याचं समाजाला, पुरुषी परंपरेतून आलेल्या पुरुषीपणाला भान यायला हवे, असे त्यांना वाटते.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**ठसे आठवांचे**

**विनता कुलकर्णी**




परदेशात वास्तव्य करून राहिलेली मंडळी आपला मातीचा गंध आणि भाषेचा गुण सोबत घेऊन वावरत असतात, हे सांगण्यासाठी कुठला आरसा दाखवण्याची गरज उरलेली नाही. ही मंडळी परदेश वास्तव्य स्वीकारतात यापाठी त्यांची अपरिहार्यता असू शकते, मात्र त्यांच्या भारतीयत्वाच्या अभिमानात कुठे उणे नसते, हेही अभिमानास्पदच म्हणायला हवे. उच्चविद्याविभूषित विनता कुलकर्णी, ज्या संख्याशास्त्र आणि संगणकशास्त्र हे विषय अमेरिकन विद्यापीठात शिकवतात, याच विषयावरील त्यांची चारचार पुस्तके अभ्यासक्रमात आहेत, तरीही त्या मराठीपण जपून आहेत. महाराष्ट्र मंडळ, बृहन्महाराष्ट्र मंडळ, मराठी भाषक मंडळ, महाराष्ट्र फाउंडेशन अशा संस्थांमध्ये सहभागी आहेत, या संस्थांच्या नियतकालिकांचे संपादन-लेखन पाहतात, इतर संस्थांमधून सेवावृत्तीने कार्यरत राहतात, यावरून हे स्पष्ट व्हावे, मातीचा गुण किती खोलवर रुजलेला आहे. आणि तोच गुण त्यांच्या 'ठसे आठवांचे' या लेखसंग्रहातून ठळकपणे तरारून आलेला दिसून येतो.

परदेशातील अनुभव हे परदेशस्थ भारतीयांच्या वाट्याला येणे स्वाभाविक ठरते, तसे इकडचे पूर्वाश्रमीचे अनुभव, आठवणी त्यांची सोबत करीत असणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे त्यांच्या लेखनात हे दोन्ही अनुभव समृद्धपणे साकारले जातात. त्यांची गुंफण वाचकाच्या उत्सुकतेला भुरळ घालीत राहते. विनता कुलकर्णी यांचे लेखन हे असे दोन खंडांच्या अनुभवांना गुंफणारे, पूर्वाश्रमीच्या स्मृतींना उजाळा देणारे, आपुलकी आणि मर्मबंधांना स्नेहार्दतेचे कोंदण कोरणारे, असे वरवर भासत असले तरी त्याला चिंतन आणि संशोधनाची जोड आहे. त्यामुळे विषयांचा तळ डोहासारखा सखोल आणि काही वेगळेपण दाखविणारा ठरलेला आहे. वाऱ्यावर उडणारा पतंग, प्रेमभावनेचा १४ फेब्रुवारी हा व्हॅलेन्टाईन डे, वेड्यात काढणारा एप्रिल फूल, अशुभ भासणारा १३ हा अंक, सरत्या वर्षाला निरोप देणारा ३१ डिसेंबर हे विषय आपल्या परिचयाचे. परंतु त्यांचे उगम, उगमकर्ते, हेतू, उपयोग, इतिहास यांचे तपशील आपल्या परिचयाचे असण्याची शक्यता कमी. ती उणीव या लेखांतून दूर होते. नावात काय आहे, हे वाक्य सर्रासपणे वापरले जाते, परंतु त्याचा कर्ताकरविता लेखातून सापडतो, तेव्हा त्याचे महत्त्व अधिक उजळ होते. नाताळच्या वेळी सांताक्लॉज येऊन खेळणी देतो, एवढेच त्याचे प्रयोजन असते का? नाही, हेच त्याचे उत्तर. कोण कुठल्या रूपात येऊन आपली नकळत मदत करून जातो, तो आपल्यासाठी सांताक्लॉज नसतो का? होय, तो सांताक्लॉजच असतो.

आपल्याकडे एक ओरड सातत्याने होत आहे, ती जंगले नष्ट केल्याची. परिणामी जंगली प्राणी मनुष्यवस्तीत येत आहेत. परंतु अमेरिकाही त्याला अपवाद उरलेली नाही ती वेगळ्या अर्थाने. इथे हरणांची संख्या इतकी आहे की, ती मनुष्यवस्तीत येतात. त्यांचा तपशील लेखिका आकडेवारीसह देतात. तीच गोष्ट नेट आणि संजयला दिसणारे महाभारताचे युद्ध. आपले जन्मघर, नातीगोती, कर्मयोगिनी नंदिनी यासारखे जिव्हाळ्याचे विषय आहेत, जे नात्यातल्या आर्द्रतेने ओथंबलेले आहेत.

लेख आकाराने लहान आहेत, परंतु त्यांचा आवाका मोठा आहे. लेखनाला एक गती आहे, जी वाचकाला खिळवून ठेवते. लेखात आपल्याला काय म्हणायचे आहे, त्याविषयीचे मत ठाम आहे. त्यामुळे लेखांना बांधेसूदपणा प्राप्त झालेला आहे. त्यात नोंदवलेले निरीक्षण आणि त्याओघात आलेली वाक्ये तर एक वेगळेच समाधान वाचकासमोर ठेवतात. जसे,

'पतंग आणि मानवी वर्तनामध्येही साधर्म्य मानता येईल. समाजात दिखावू मोठेपणासाठी दुसऱ्याचा पाय खेचून स्वतः पुढे जाण्याची प्रवृत्ती, आणि खेळात दुसऱ्याचा दोर तोडून स्वतःचा पंतग उंचावर नेण्याची युक्ती, दोन्हीमागे अहंकारी वृत्ती सारखीच. पण एखाद्या तीव्र झोताबरोबर पंतग फाटून भेलकांडत भुईसपाट होतो तेव्हा दुसऱ्याचा मांजा न कापता, आपल्या आयुष्याच्या पतंगापुढती गगन ठेंगणे करणे उचित आणि सुसंस्कृत लक्षण आहे.'

'आत्मिक समाधानासाठी, अंगभूत गुणांना खुलवण्यासाठी आणि आयुष्य एकसुरी न होण्यासाठी काहीतरी सकारात्मक नाद हवाच. मात्र सृजनात्मक वेड जोपासताना आणि स्वतःच्या आयुष्यात रंग भरताना, स्वतःचे विविध छंद जपताना, इतरांच्या आयुष्याचा बेरंग न करण्याइतपत शहाणपण असणं महत्त्वाचं.'

'आपल्या इंग्रजी वर्षाचा एप्रिल महिना 'ऑल फूल डे'ने सुरू होतो. अगदी पंधराव्या शतकापासून ही प्रथा अस्तित्वात आहे. त्या दिवशी कुणाचीही 'निरुपद्रवी' खोडी/गंमत मंजूर समजली जाते.'

पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यांनी सजविले आहे. आठवणींचे ठसे हे विविध आकाराचे आणि रंगांचे असू शकतात. त्यांची जणू प्रतीकेच मुखपृष्ठावर साकारली आहेत.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**




# ग्रंथपान

**मिरग**

**डॉ. सई लळीत**




आशा–अपेक्षा आणि समजूत यांच्या झोक्यावर अनेकदा आयुष्य झोके घेत राहते, कधी उंच, कधी संथ तर कधी नुसतेच टांगलेले. यालाच आपण जीवन असे नाव देतो. या जीवनाविषयीचा कप्पा वैयक्तिक स्वरूपाचा असतो तेव्हा तो एका परिघात बंद राहतो, परंतु आयुष्य हे कधीच एकटे नसते, त्याभोवती नात्याची वीण असते. त्यामुळे एकास बसलेला पीळ इतरांनाही सहन करावा लागतोच. अशीच नात्याची, ताणतणावाची आणि तितकीच आपलेपण जपणारी कथा म्हणजे 'मिरग' ही कादंबरी होय. मिरग म्हणजे मृगनक्षत्र.

आशा या पोरवयातील मुलीची ही कथा आहे. दहावीला ८५ टक्के गुण मिळवणारी ही मुलगी खूप शिकायचं, शिक्षिका व्हायचं हे स्वप्न बाळगते. तिला वाचनाची आवड आहे. लिहायची आवड आहे. बारावी होते. आता मुलीचं लग्न लावून आपण मोकळं व्हावं, ही आस बापाच्या मनात उसळी घेते. आई आशाच्या पाठी उभी राहून लग्नाच्या कल्पनेला रोखू पाहते. परंतु आजारी असलेला बाप त्यांच्यापुढे पेच टाकतो, ' तू पै पैसा गोळा कर आणि पाच वर्षांनी तेचा थाटामाटात लगीन कर, पण त्या लग्नात मी असीन की नाय ता सांगूक शकनय नाय. निदान एका मुलीचा तरी कन्यादान माझ्या हातान होवचा एवढी माझी इच्छा होती.'

लग्न हा जीवनात आनंद फुलवणारा, दोन जिवांना एकत्र आणणारा पवित्र संस्कार, सर्वाच्या साक्षीने पार पडणारा. परंतु त्यात असलेल्या व्यवहार नावाच्या राक्षसापुढे किती शरण जावे लागते, हे सर्वज्ञात आहे. त्यातून हातावर पोट असणाऱ्यांची अवस्था तर आणखीच बिकट. अशावेळी तडजोड करणे एवढेच हाताशी असते. आशाचे लग्न हे अशाच तडजोडीवर पार पडते. एक मुलगी असलेल्या बिजवराशी संसाराची गाठ बांधली जाते. पुढे संसार सुरू होतो, पण त्याचे स्वरूप असते, 'मी इथं नसण्यामुळे काहीही फरक पडणार नाही तर मग राहून काय उपयोग? कोणीतरी सोडून दिलेल्या नको असलेल्या मांजरासारखं वळचणीला राहून एवढं मोठं आयुष्य जगून काढायचं? गोधडी धुवून काढल्यासारखं? बस्स झालं हे नकोसं जगणं.'

कथानक एका मुलीच्या भावविश्वाशी जोडलेले असल्याने, तिचा घरातील वावर, कामाचा उरक, आई, वडील यांच्या कामात मदत करण्याचा मनस्वीपणा, घरातला केर काढण्यापासून ते शेतातील कामांपर्यंतच्या अनेक कामांचा तपशील देत आशाच्या व्यक्तिरेखेला आकार देण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. त्यातून तिच्या विविध अंगभूत गुणांचा परिचय होतो. स्वभावाच्या पैलूंवर प्रकाश पडतो. तिचा निरागसपणा तर अनेकदा प्रत्ययास येतो. मांजरांना दूध मिळावं म्हणून गाय पाळायची, हे उदाहरण खूप बोलके आहे. ती केवळ अभ्यासात रमणारी आहे असे नाही, आपल्या परिस्थितीची जाणीव असलेली आहे. बिजवराशी लग्न ठरले तेव्हा, दुसरेपणाची भावना खिन्न करणारी होती. आपण फक्त रिकामी जागा भरायला जाणार आहोत का? असा प्रश्न उपस्थित करणारी. परंतु जी पत्नी मृत्यू पावली आहे, ती आपली बहीण होती आपल्या आक्कासारखी, असे समजून घ्यायचे. त्याच्या मुलीचे आपण आई व्हायचे, हा समजूतदारपणा तिच्या ठायी असावा, हे मन किती मोठे आहे!

पती श्रीकांत पहिल्या पत्नीच्या दुःखातच रममाण राहून आशाच्या भावनांकडे सपशेल दुर्लक्ष करतो, तेव्हा आशाचा होणारा कोंडमारा तिच्या उपदेशात उतरतो. 'आपल्याच नवऱ्याक भूलवूचा लागता ताई? ता मंग आपला माणूस कसा?' तर आईच्या तोंडी असलेले वाक्य किती स्पष्टपणे बाहेर पडलेले आहे, 'जावयांनू तुमचा लगीन एका मुलीशी झाला वस्तुशी नाय एवढा फक्त लक्षात ठेवा!'

या कथानकाला कोकणची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे संवादाची भाषा तीच आहे. तिच्यातला गोडवा, लय आणि ढब जशीच्या तशी येथे उतरली आहे. शिवाय सोबतीला तिथला सुंदर परिसर, निसर्ग, शेती, पीकपाणी आहेच. परंतु स्वतःच्या शेतात असलेला 'काळांबा' नावाचा आंबा आणि 'कोथमिऱ्या' नावाचा भात, त्यांची वैशिष्ट्ये आहेत. आंब्याविषयीचे वर्णन तर मजेशीर असेच आहे,' काळांबा, त्याचे आंबे काळपट, हिरव्या सालीचे पण आतून एकदम केशरी भगवे, गोड रसाळ चवीचे. एखादा काळा ओबडधोबड माणूस स्वभावाने एकदम गुणी आणि प्रेमळ असावा तसा हा आंबा.' घरात असलेल्या चंगू आणि मंगू या दोन मांजराचा वावर, त्यांचे पराक्रम आणि त्यांचा लळा, हेही यात येते. 'अगे ही मांजरा नाय. दोन वाघ आसत पराक्रमी. मी जर राजा असतंय तर सोन्याच्या वाटीत हेंका दूध दिलं असतंय.'

आक्काची घरातल्यांना येणारी आठवण आणि श्रीकांतला पहिल्या पत्नीची येणारी आठवण हा धागा समान ठेवूनही भावनिकतेची वेगवेगळी पातळी इथे अनुभवास येते. भाषा लयदार आणि चिंतनाची जोड असलेली, वास्तवाचे चित्रण करणारी आहे. संवाद नेमके आणि आशयघन आहेत. सतीश भावसारांचे मुखपृष्ठही तसेच आशयगर्भ आहे.

**मूल्य १३० रु. ● सवलतीत ६५ रु.**

# ग्रंथपान

## जलसूक्त

**संजीवनी खेर**




संजीवनी खेर यांच्या लेखनाशी वाचक म्हणून आपला स्नेह या आधीच जोडला गेलेला आहे. ‘सर्वसाक्षी’ या पुरस्कारप्राप्त सांस्कृतिक इतिहासाने आणि इतर साहित्याने त्यांच्या लेखनातला कसदारपणा आणि संशोधनाची आवड, यांचा परिचय आपल्याला यापूर्वी करून दिलेला आहे. त्यांच्या लेखनाला संशोधनाची जोड आहे तशी त्यातल्या साक्षेपी चिंतनाला आणि निरीक्षणालाही दाद द्यावी अशी उत्तम किनार आहे. त्यामुळे लेखन वाचताना केवळ माहितीचे भांडार उघडले जात नाही, तर त्या विषयाला दिलेल्या सखोलचे परिपूर्णत्व आपल्याला अचंबित करीत जाते. तो अनुभव देण्यात ‘जलसूक्त’ अपवाद नाही. या विषयासंबंधी त्यांनीच केलेले विधान असे आहे, ‘उद्याची युद्धे ही पाण्यावरून होतील असे अस्वस्थ करणारे भवितव्य वर्तवले जात आहे. अशावेळी या पाण्याची खोली तपासून पाहावीशी वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून हा लेखनाचा प्रपंच करत आहे.’

आपली भूमी सुजलाम् सुफलाम आहे असे आपण म्हणतो. परंतु त्याचवेळी आपला देश पावसावर अवलंबून असलेला देश आहे, हेही वास्तव आहे. काही भागात मुबलक पाऊस तर काही भागात अखंड डोळे आकाशाकडे. आपल्याकडे बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत, परंतु धरणांनी त्यांचे प्रवाह थांबले आहेत. असे असले तरी त्यांचे महत्त्व जराही कमी झालेले नाही. या नद्या जिथून उगम पावतात आणि जेथे विलय पावतात, या दरम्यानचा त्यांचा प्रवास हा अदभूत आहे. तो कसा आहे, त्याच्या काठावरील संस्कृती कशी आहे, इतिहास, पुराणे, वेद, पौराणिक ग्रंथ यांत त्यांच्याविषयीचे संदर्भ काय आहेत, यांचे वर्णन आणि त्यानिमित्ताची परिशिष्टे असलेला हा संग्रह आहे. त्यासाठी भारतातील काही प्रमुख नद्या, गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, कावेरी, सिंधू, ब्रह्मपुत्रा आणि राजस्थानात हरवलेली सरस्वती, यांचा समोवश या संग्रहात आहे.

राजस्थानात हरवलेली सरस्वती आणि डॉ. राजेंद्रसिंह यांनी सुरू केलेले जोहडचे प्रयोग, या दोन्ही विषयांचा मागोवा या लेखात आहे. राजस्थानातील पाणी दुर्भिक्ष्य, तेथील महिलांना त्यासाठी करावी लागत असलेली पायपीट, त्याच प्रदेशात असलेले पवित्र पुष्कर सरोवर आणि खाऱ्या पाण्याचे सांभर सरोवर, घडीसार सरोवर त्यांच्याभोवती असलेल्या शुक्राचार्य, देवयानी, आणि ययाति यांची कथा व शाकंबरी देवीच्या मंदिराचे मिथक, ब्रह्मदेव–सावित्री–सरस्वती–गायत्रीची कथा यांचे वर्णन यात येते.

गंगा ही सगळ्यांना पावन करणारी नदी. गंगामैया. भगिरथाच्या कठोर तपाचरणाने शिवजटेत प्रकटलेली स्वर्गीची गंगा. वसूंची मुक्तता करण्यासाठी मानवीरूपात धरतीवर येऊन शंतनूशी विवाह केला आणि कुरुवंशाची जन्मदात्री बनलेली गंगा. भौगोलिक दृष्टीनं ती भारतातील सर्वात मोठी नदी नाही, परंतु पावित्र्याच्या संकल्पनेत तिची बरोबरी दुसरी कुठलीही नदी करू शकणार नाही. ती केवळ शिवाशी संबंधित नाही तर ती विष्णूपदी म्हणूनही पवित्र मानली जाते. गंगोत्री ते गंगासागर हा तिचा प्रवास म्हणजे मिथकांचे आगर आणि इतिहासाचे साक्षीदार, सांस्कृतिक वैभवाला जन्म देणारा. तिची अतिशय सुंदर, अजोड मूर्ती पवनारला विनोबांच्या आश्रमात आहे. तीच गोष्ट यमुनेची. ऋग्वेदातील महत्त्वाची देवता असलेल्या सूर्याची अत्यंत लाडकी कन्या, सूर्यतनया, सूर्यजा, रविनंदिनी ही तिची नावे. काही पौराणिकांच्या मते पाण्याच्या जामुनी रंगामुळे ती जमुना–यमुना, कालिंदी म्हणूनही ओळखली जाते. कृष्णाने द्वारकेला परत जाताना तिच्याशी विवाह केला. नर्मदा – अवखळ कुमारिका या लेखात नर्मदेविषयीचे वर्णन आहे. नर्मदा ही गंगेची ज्येष्ठ भगिनी मानली जाते, तर पुराणकथानुसार ती नागांची बहीण आहे. तिची स्तुती करून मनापासून स्मरण करणाऱ्याला सर्पविषाचे भय राहणार नाही, असे गंगावचन आहे. बहुतेक नद्या या सवाष्ण सम जल्या जातात, खणानारळाने त्यांची ओटी भरतात. परंतु नर्मदा ही एकमेव कुमारिका मानली जाते. त्याविषयीच्या कथा पुराणात आहेत. ही एकमेव नदी आहे, जिची परिक्रमा केली जाते आणि जिच्याकाठी चारशे तीर्थस्थाने आहेत. तिचं पावित्र्य असे की तिच्या प्रवाहातील दगड शिवरूप समजला जातो.

गोदावरीचा त्र्यंबकेश्वर ते राजमहेंद्री हा प्रवास रामकथेची निगडित आहे. तर कृष्णा ही महाराष्ट्राची लडिवाळ कन्या आहे. कावेरी, सिंधू, ब्रह्मपुत्रा यांचीही माहिती या संग्रहात आहे. ही माहिती संदर्भग्रंथांच्या, नकाशांच्या आणि फोटोच्या आधाराने परिपूर्ण आहे. त्यामुळे आलेले तपशील हे अधिकृत आणि संशोधनावर आधारलेले आहेत.

निलेश जाधव यांनी सजवलेले मुखपृष्ठ सुंदरच. मंदिराच्या कळसाचे प्रतिबिंब पाण्यात पडलेले असून त्यात जलदेवतेची शिल्पप्रतिमा साकारलेली दाखवलेली आहे. नदीला देवीच्या रूपात मानल्या जाणाऱ्या संस्कृतीचे हे प्रतीक उठावदारपणे दाखवून ‘जलसूक्त’ची समर्पकता अधोरेखित केली आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**सोलमेट**

**अर्चना गाडेकर शंभरकर**




'आकाशात उंच उडणाऱ्या पतंगाने हे विसरून चालणार नाही की, कुणीतरी त्याची दोरी घट्ट धरून ठेवलेली आहे, कुणी दुसरी दोरी त्याला जमिनीवर कोसळण्यास भाग पाडू शकते. ही दोरी संस्काराची असू शकते, जी नात्याला खंबीरपणे धरून ठेवते आणि कितीही उंच गेलो तरी जमिनीशी असलेले नाते सोडू देत नाही.' पतंगोत्सवाच्या प्रसंगात सहजपणे पतंगाची दोरी आणि संस्कारांची तुलना वाचताना जरा थबकलोच. लेखनात अशा तऱ्हेचे मंथन व्यक्त होते तेव्हा ते लेखकाच्या पुढच्या लेखन प्रवासातील यशाची नांदी ठरते. पुस्तकरूपाने आलेले हे पहिलेच लेखन असूनही आश्वासक असे काही यात आहे, हे तिथेच लक्षात आले.

जीवनात घडणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाणे अपरिहार्य असते. परंतु त्याही परिस्थितीत आपण त्याच्याकडे पाहतो कसे, बोध कोणता घेतो, हेही महत्त्वाचे ठरते. भूतकाळात काय घडले, भविष्यात काय घडणार, यापेक्षा वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांना समजून घेणं महत्त्वाचे आहे. आपल्या आजूबाजूच्या माणसांना गृहीत धरण्यापेक्षा त्यांची कदर करायला हवी. आणि जेव्हा जे वाटते ते तेव्हाच करून घ्यायचे, आयुष्य तुम्हाला पुन्हा संधी देत नाही. हे विचार देखील असेच, लेखिकेचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दाखविणारे.

'सोलमेट' ही म्हटली तर एक प्रेमकहाणी आहे, म्हटले तर आपल्या भोवतालच्या परिस्थितीचे चित्रण आहे. कथानकाच्या जोडीने भवताल हातात हात धरून चालतो तेव्हा ते लेखन समग्रतेचे दर्शन घडवणारे ठरते. त्याचा अनुभव हे लेखन देते. ही प्रेमकहाणी अनु आणि श्री यांच्यातील असून ती चिरागशी येऊन थांबते. या प्रेमकहाणीत असलेल्या व्यक्तिरेखा म्हणजे अनु ऊर्फ अनन्या, जी स्वतःच निवेदकाच्या रूपात आपल्यासमोर येते. श्रीनिवास तिचा प्रियकर, कुलदीप, रिया, डॉ. मुस्तफा, जिग्नेश, सोनी, आई आणि इतरजण. या सगळ्यांची स्वतःची खास वैशिष्ट्ये आहेत. जगण्याचा, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा स्वतंत्र दृष्टिकोन आहे, तसा एक नितळपणा त्यांच्यात भिनलेला दिसतो. ज्यामुळे एक प्रसन्न आणि भावनांची कदर असलेले विश्व उभे राहिले आहे. परंतु माणसांचे वागणे तसे निसर्गाचे वागणे, विज्ञानाची किमया कथानकाच्या वातावरणात स्वतःचे रंग भरतात आणि जे घडत जाते त्यावर विश्वास ठेवणे अवघड होत जाते.

कांदबरीची जडणघडण होते ती गुजरातच्या भूमीत. सगळ्या जगाला अंहिसेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधींच्या प्रदेशात १९६० ते १९६९ या काळात येथे २९३८ दंगे झाले होते. १९८५ मध्येही दंगे झाले होते. त्यानंतर झालेला भूकंप आणि गोध्राकांड. पैकी गोध्राकांड आणि भूकंप यांची पार्श्वभूमी कथानकाचा एक भाग, नव्हे अभिन्न भाग ठरले आहेत. ते कथानकाची दिशा बदलून टाकते, नव्हे माणसाच्या वागण्याचे संदर्भही बदलून टाकते. ज्याच्या मुळाशी एक सूत्र विसावलेले आहे, 'प्रतिकारच करायचा नाही, धडा शिकवायचा.' यातील अनेक संदर्भ आपणास प्रसारमाध्यमातून कळलेली आहेत. परंतु नेमकेपणाने कथानकाशी जुळणारे संदर्भ संयतपणे मांडल्यामुळे यातील आशय थेट येऊन भिडतो. कथानकातील ताण अधिक तीव्र होतो. जुळत आलेले ध्रुव दोन दिशांना फेकले जातात. या घटना जीवन बदलून टाकतात. तीच गोष्ट येथील उत्तरायण –पंतगोत्सवाची आणि गरबाची. हे दोन्ही खेळ उत्सवासारखे खेळले जातात. संस्कृती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. यातील गंमत, आनंद आणि उत्कटता यांचीही गुंफण कथानकात कलात्मकपणे केलेली आहे.

नात्यातील वीण आणि स्वभावांचे बारकावे, यामुळे व्यक्तिरेखा सजीवपणे साकार झालेल्या दिसतात. श्रीनिवास, कुलदीप, डॉ. मुस्तफा यांच्यातले माणूसपण, प्रेम, जिव्हाळा जितका तरल आहे तितकीच निवेदक म्हणून असलेली अनु स्वतः विषयी उत्कटपणे समोर येते. सोनीचे स्वतःचे निर्णय हे स्वतःसाठीचे आहेत. रियाचे जगणे वेगळे आहे. आईच्या संस्काराशी घट्ट नाते असलेल्या अनुला हे जग वेगळे भासते. ते तिच्या वागण्यातून स्पष्ट होत जाते. तरी त्याविषयी कुठला द्वेष वा असूया नाही. एक समज असलेली व्यक्तिरेखा म्हणूनच तिचा वावर दिसतो. सारे कथानक ती स्वतः निवेदनातून मांडत जाते, स्वतःला केंद्रस्थानी न ठेवता तटस्थपणे इतरांकडे पाहते. त्यामुळे कहाणी एका तरुणीची आहे, तरी ती इतरांचे दर्शन समग्रपणे घडवीत जाते.

लेखनाला गती आहे. भावनांची स्पंदने अलगदपणे टिपलेली आहेत. अभिराम भडकमकर आणि सुरेश द्वादशीवार यांच्या प्रस्तावनेत या विषयी अधिक मनोज्ञपणे विचार व्यक्त झालेले आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजवलेले आहे. बहरलेल्या वृक्षाच्या कुशीत दोन पक्षी कुंजन करीत असल्याचे दाखविले आहे. सफल प्रेमाचे बहुरंगी साक्ष देणारे मुखपृष्ठ उत्कृष्ट झाले आहे.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## धर्मधुरीण

**डॉ. प्रकाश लोथे**




''आपला धर्म अन् आपली संस्कृती ह्यात गोंधळ करतो आहेस, ख्रिश्चन धर्मात वर्णन केलेली सहिष्णुता क्षमाशीलता व अहिंसा हे आपल्या धर्मात यम नियम म्हणून समजले जातात. ते पाळल्याशिवाय योगी होता येत नाही, असे गीतेत तेराव्या अध्यायात आहे...आपण गीता चिंतनपूर्वक वाचत नाही हा आपला दोष आहे. रेव्हरंड फिशरसारखा देवमाणूस तुला भेटला हे तुझे सुदैव, पण मजसारख्या हजारो विधवांना मार्गाला लावणारे अण्णा कर्वे कोण आहेत श्याम? देवमाणूसच ना? जगात देवमाणसे असतात अन् नराधमसुद्धा. हिटलर अन् स्टालिन ख्रिश्चन नव्हते का?''

डॉ. प्रकाश लोथे यांची ही पहिलीच कादंबरी. चांगली भलीमोठी. त्यामुळे वाचताना धाकधूक होणे स्वाभाविक होते. परंतु ही धाकधूक आपोआप विरळ होत गेली, आणि नकळत ती पूर्ण वाचून होईपर्यंत तिच्यात गुंतून राहिलो. धर्म आणि धर्माचरण यात इतरांच्या धर्माशी तुलना होणे हे अनादी काळापासून चालत आले आहे. त्यातली शिकवण व त्याची श्रेष्ठता याबाबत प्रत्येक धर्मीयाचे स्वतःचे ठाम मत असू शकते. परंतु जे का रंजले गाजले, तयासी म्हणे जो आपुले, या उक्तीशी थांबलेल्यांचे काय? आपला म्हणणारा त्यांना परमेश्वर वाटू लागतो, यात चूक मानण्याचे कारण नाही. जगण्याला भ्रमावस्था प्राप्त असताना कुठेतरी आधार देणारा, समजून घेणारा भेटला, तर त्याच्याविषयीचे देवपण हृदयात विराजमान होणारच. अशावेळी कुणी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, तरी ते समजून घेणे अनुभवाच्या पातळीवर कठीण ठरू शकते. प्रस्तुतच्या कांदबरीची गुंफण याच आवर्ताला समोर ठेवून झालेली दिसून येते. ही गुंफण करताना लेखकाचा कस लागलेला आहे, हेही दिसून येते. आपल्याला जे म्हणायचे आहे, ते तसेच मांडता येणे ही लेखकाची अग्निपरीक्षा असते. निवडलेल्या व्यक्तिरेखा, त्यांच्या सभोवतालचे वातावरण, त्यांच्यात होणारा संघर्ष, त्यांच्यातील मानसिक समतोल, या सगळ्यांची व्यवधाने सांभाळून इप्सिताकडे पोहोचणे, यासाठी लेखकाकडे केवळ प्रतिभा असून चालत नाही, त्याला कौशल्याचीही जोड असावी लागते. तर अशी पाचशे पृष्ठांची कादंबरी वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवण्यास समर्थ ठरू शकते. ते समर्थपण लेखकाच्या ठायी आहे, हे आश्वासन ही कलाकृती देते, लेखकाविषयीची अपेक्षा वाढविते.

कर्मठ सनातनी ब्राह्मण, प्रवचनकार आबासाहेब हे शिरोडकर कुटुंबाचे प्रमुख. विदर्भाच्या पंचक्रोशीत त्यांचा वावर, मान, मोठेपणा. त्यांची स्वतःची मते या कर्मठपणाभोवती घट्ट बिलगून आहेत. प्रत्येक वागण्याला शास्त्रीय आधार सांगणारे. त्यापलीकडे जाणे, वा वेगळे काही मत मांडणे म्हणजे पाखंड, धर्म बुडणे. अशा घरात असणाऱ्या विधवा, परित्यक्ता महिलांच्या वाट्याला उंबरठ्याच्या आत कोंडून घेणे, केशवपन हे शस्त्र ठरवून करावे लागणे, शस्त्रासारखा शास्त्राचा आधार देणे आलेच. यातला कोंडमारा कुठेही उघड न करता येणे ठरलेलेच. त्यात सावत्रपणाची झळ. अशा कुटुंबात श्याम नावाचा मुलगा आहे, ज्याच्या जन्मापासूनचे भाकीत आहे, तो अल्पायुषी असल्याचे. श्याम हुषार आहे परंतु कौटुंबिक कलह आणि आर्थिक परिस्थिती यांचे तो सावज आहे. अशा सावजाने कितीही पळून जाण्याचा प्रयत्न केला तरी पळणार कुठे, किती? परंतु अल्लाच्या घरी देर आहे, अंधेर नाही, असा सांगणारा इक्रमली तेथे आहे. तिथेही अद्भुत शक्ती आहे, त्यासाठी लॉर्ड जिझस आहे, असा सांगणारा रेव्हरंड फिशर आहे.

विमल ही एक व्यक्तिरेखा, अभागीपणाचा शाप असलेली, हुशार, मनमिळाऊ, श्याम जिला समजून घेऊ शकतो. तिला आयुष्यात सुखी पाहण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यासाठी धडपडत राहतो. तरुण विधवेला घरात कोंडण्यापेक्षा जगातल्या मुक्त वातावरणात स्वतःच्या मनाप्रमाणे जगण्याचे स्वप्न दाखवतो. ते स्वप्न पाहण्याचे,उभे राहण्याचे बळ मिळाले ते अण्णा कर्वे यांच्यामुळे, परंतु या दोन्ही आधारस्तंभांना स्वीकारण्याची तयारी कर्मठ आबासाहेबांकडे नाही. आबासाहेबांना गोऱ्यांचा देव, त्यांचा धर्म, त्यांची शिकवण अमान्य आहे. आपला मुलगा त्या धर्माच्या प्रभावाखाली जाऊन ख्रिश्चन झाला तर...त्यांना छळणारी ही सर्वात मोठी भीती. मुसलमान ही जात विश्वास ठेवण्यासारखी नाही. त्यांच्याशी संबंध ठेवणे, त्यांच्या मोहल्ल्यात जाणेही त्यांना पसंत नाही. तर श्यामचे वर्तन नेमके त्यांच्या मतांना छेद देणारे. इक्रमली त्याचा मित्र आहे, उपाशीपोटी असणाऱ्या श्यामला स्वतःच्या डब्यातली रोटी तो खाऊ घालतो. तर रेव्हरंड फिशर शिक्षणापासून ते नोकरी, दवाखाना इथपर्यंत सर्व सहाय्य करतात. तेही श्यामने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्याची अपेक्षा न ठेवता. आबासाहेब शेवटपर्यंत ह्याच कोंडीने अस्वस्थ व श्याम त्यावर मात करण्यासाठी अस्वस्थ. हा संघर्ष वाचकाच्या चिंतनशीलतेला आवाहन करणारा आहे. परित्यक्ता असूनही विधवा म्हणून जगणारी आक्का, दंगलीत श्यामचं घर वाचवण्यासाठी धडपड करताना मृत्यू पावलेला इक्रमली, बेवारस दामू, समजून घेणारा, मदत करणारा, उदार मनाचा फिशर, स्वार्थी काकी, अण्णा कर्वे, या व्यक्तिरेखा ठळकपणे आपला ठसा उमटवून जातात. कथानकाला वेग देण्यासाठी पत्रांचा केलेला उपयोगही उत्तम साधला आहे.

कादंबरीला स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी आहे. इंग्रजांचे राज्य, स्वातंत्र्य लढा, गांधीजी, जागतिक महायुद्ध, विधवांचे प्रश्न, त्यावेळची सामाजिक परिस्थिती, विदर्भाकडील वातावरण, भाषा, संस्कृती, यांचे चित्रण अतिशय नेटकेपणाने मांडलेले आहे. त्यामुळे खांडेकरांच्या काळाची आठवण येते. सतीश भावसारांचे सूचक मुखपृष्ठ 'धर्मधुरीण' या कादंबरीला अर्थपूर्ण परिमाण देते.

**मूल्य ६०० रु. ● सवलतीत ३०० रु.**

# ग्रंथपान

## अवनवी

**उषा सेठ**




लहान लहान वाटणाऱ्या घटनांना एकत्र गुंफले तर त्यांची सुरेख अशी माळ होऊ शकते. कुटुंब, त्यातली माणसे, त्यांची आपसातली नाती, भांडणतंटे, व्यवहार, प्रत्येकाचे वैयक्तिक आयुष्य हे सगळे म्हटले तर मणीच. त्यांना एकत्र गुंफले तर त्याची देखील कादंबरी होऊ शकते, 'अवनवी'सारखी. उषा सेठ यांची ही कादंबरी, 'अवनवी', तरलपणे कौटुंबिक कथा, त्यातले नात्यातले धागेदोरे, एकमेकांकडे पाहण्याची दृष्टी, व्यवहार यांचे वर्णन करणारी कादंबरी आहे. किती तरलपणे, प्रत्येक घटनेचा अन्वयार्थ लावायचा तर तो किती नेमकेपणाने, त्यापासून दूर जायचे तर किती अलगदपणे, एमकेकांना समजून घ्यायचे तर किती समंजसपणे, नात्यांना जोडून ठेवायचे तर किती घट्टपणे, या सगळ्यांना आखीवपद्धतीने उत्तरे देणारी कादंबरी म्हणून हिच्याकडे पाहता येईल. अगदी आपण शीर्षकाकडे पाहिले तर त्यात एक वेगळेपण दिसून येते, अवनवी. मूळात ही कथा आहे 'अवनी' नावाच्या व्यक्तिरेखेची. ती सरळमार्गी असूनही अनोळखी मार्गाला आपलंसं करू शकते, म्हणून 'अवनवी'.

अवनी ही लग्नानंतर नवऱ्याच्या घरी येते, तेव्हा तिच्यासाठी हे जग नवीनच. नवरा एक काहीसा परिचय होत जाणारा, बाकी सगळेच अनोळखी. त्यांचे स्वभाव, वागणं-बोलणं, अपेक्षा, दैनंदिनी हे त्याहून अपरिचित. अशावेळी त्या सगळ्यांशी जुळवून घेणे, त्यांच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे, ही तिच्यासाठी मोठीच कसरत. त्यात हे मारवाडी-जैन संस्कृतीत असलेले कुटुंब. त्या संस्कृतीलाही कुठे बाधा येणार नाही याची काळजी घेणे आलेच. हे सारे अवनीसाठी दिव्यच. परंतु स्वतःचे शिक्षण, पतीचा बांधकामाशी संबधित असलेला व्यवसाय, मुलींची शिक्षणं, त्यांची लग्ने, करिअर यातून स्वतःसाठी वेळ काढणे, स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवणे, वेळ मिळेल तेव्हा आश्रमात जाणे, तिथे असलेल्या निराधार महिलांना आधार देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम शिकवणे, तिथली व्यवस्था पाहणे. हे सारे अवनी करीत राहते, तेही घरसंसार सांभाळून. हे सारे करता येते, तेही घरसंसार साभाळून, हे या कांदबरीच्या माध्यमातून लेखिका दाखवून देतात.

विनय, पती. श्रेया व नेहा या मुली. आकाश, सरिता, तेजस, समीर ही भावंडं. या सगळ्यांच्या व्यक्तिरेखा प्रामुख्याने आणि तितक्याच प्रभावीपणे यात आलेल्या आहेत. शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने परदेशात जाणे, तिथे स्थायिक होणे, तिकडेच विवाह करणे, परत येणे याही घटना या प्रवासात येतात. अवनी ज्या आश्रमात सेवाभावी वृत्तीने काम करते, त्या आश्रमातील पदाधिकारी, तिथले सहकारी, निराधार मुली, तिथले वातावण, आपसातले मतभेद यांची वर्णने अनुभवाला येतील अशीच आहेत. या सगळ्यात आनंद आहे, घुसमट आहे, सोडून दूर जाण्याचा विचारही जोडीला येतो. या सगळ्यात महत्त्वाचं आहे ते स्वतःचे स्वपण. त्यावर आघात सोसून सेवा करणे शक्य आहे का? किंवा प्रत्येकाला आपापला व्यवसाय आहे, स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे, तसे ते आपल्याला का असू नये, आपण आपल्या पायावर उभे का राहू नये, हाही विचार येथे अवनीच्या रुपाने मांडलेला आहे. नव्हे ती तशी वागते देखील.

कादंबरी म्हटली की तिचा आवाकाही तसाच विस्तृत, अनेक अंगांना व्यापणारा. आजूबाजूच्या घटना, प्रसंग, यांना टाळता न येऊ शकणारा. या कादंबरीला मुंबईची पार्शभूमी आहे. त्यामुळे इथे घडलेले बॉम्बस्फोट, कच्छचा भूकंप झाल्याने मुंबईच्या इस्पितळात आणलेले अनेक जखमी लोक, शेअर मार्केट, बांधकाम व्यवसाय, यांचा तपशील यात आलेला आहे. परदेशात प्रवास केल्याने तेथील वर्णने आहेत. ही एका स्त्रीची कहाणी, तरी तिची मानसिकता आणि प्रवाहातील बदल, इतरांच्या वागण्या-बोलण्यातील प्रकार व त्यांची निरीक्षणे, लिखाणातील सहजता आणि विचारांची परिपक्वता, वर्णनातील नेमकेपणा आणि त्यात असलेला आपलेपणा, यामुळे कादंबरी ही लेखिकेची न राहता ती वाचकांची होते. यात आलेले संवाद आणि त्या निमित्ताने व्यक्त झालेले विचार हे वाचकाला अंतर्मुख करणारे आहेत.

स्त्री ही नेहमी एका चौकटीत बंदिस्त असते. तिचे स्थान तिथेच राहील, यासाठी कुटुंब, समाज आणि संस्कृती असे सारेच ती चौकट मजबूत राहील याची काळजी घेत असतात. अशा वेळी एखादी अवनी या चौकटीतून मुक्त वावरण्याचा ध्यास घेऊ पाहते. ती तो कसा घेईल, याची कल्पना सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठावर साकार केली आहे. जी पाहताना, प्रत्येक स्त्रीला आपले प्रतिबिंब तिच्यात पाहता येईल.

**मूल्य ४०० रु. ● सवलतीत २४० रु.**

# ग्रंथपान

**पारुल : एक प्रेमकहाणी**
**मूळ लेखक : हर्ष देहेजिया**
**अनुवाद : सविता दामले**




पारुल : एक प्रेमकहाणी, हातात घेताना खिळवून ठेवले ते मुखपृष्ठारील चित्राने. मुघलकालीन काही चित्रे पाहिलेली असल्याने, तिथे कुठे या कहाणीचा संदर्भ असावा, अशी शंका मनाशी विसावली. छान गडद लाल रंगाचा तळ चित्राच्या रेखाटनासाठी ठेवलेला. लाल रंग हा प्रेमाचे प्रतीक आहे, हा अंदाज साधारणपणे सर्वांनाच ठाऊक आहे. त्याचा पूर्ण वापर इथे केलेला. दोन प्रेमिक समोरासमोर पूर्णाकृती, राजघराण्यातील पेहराव आणि आभुषणे परिधान केलेले. मधोमध वृक्ष, त्यावर वेलींची नक्षी, कूंजन करणारे पक्षी. चित्राला फ्रेम केलेली, झालरने सजवलेले. सहजपणे मनात येऊन जाते ही प्रेमकहाणी शहाजहान–मुमताज, जयदेव–पद्मावती, महिवाल–सोहनी, संवतसिंह–बनी ठनी, चंडिदास–रमी, घनानंद–सुजन, माधवानल–कामदंदला, दुष्यंत–शकुंतला यांच्यापैकी कुणाची अजरामर कलाकृती तर नसेल? प्रेमकहाणी हा कधीही शिळा न होणारा, औत्सुक्य, आनंद–विरह, भावभावना, रंगोत्सवाच्या छटा, असा काळजाला हात घालणारा विषय. वाचताना आपल्याला तरुण करीत जाणारा विषय. त्याच उत्सुकतेने वाचायला घेतला. आणि वाचतच राहिलो. त्यात पूर्ण बुडून गेलो. एक वेगळीच अनुभूती अनुभवत राहिलो. विचारांची, कल्पनेची, तत्त्वज्ञानाची एकेक दालने खुली होत राहिली आणि त्यांच्या अद्भुत दुनियेने सर्वांगाने प्रफुल्लित होत गेलो. शेवटी जाणवले, आपण अनुभवले ते काय होते, कहाणी, नाट्य की काव्य? काव्यच. गद्य काव्य. खूप दिवसांनी असे काही वेगळे वाचायला मिळाले, वेगळीच अनुभूती देणारे. आणि अचंबाही वाटला तो लेखकाच्या प्रतिभेचा. किती सहजपणे हे काव्य त्यांच्या लेखनीतून अवतरले आहे! इतके तरल, ओघवते, सकस काव्य! पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटणारे काव्य! हे काव्य आहे अभिसारिकेचे, वासकसज्जेचे, खंडिताचे, मानाचे, प्रौढाचे, विप्रलब्धाचे, मुग्धेचे, प्रकृतीचे. नायिकेची विविध रूपे इथे अशी पाहता आली, तिच्या आत्म्याची, प्रीतीची, विश्वासाची प्रचिती येत गेली.

या कहाणीत रुढार्थाने दोन व्यक्तिरेखा आहेत. प्रफुल्ल आणि पारूल. प्रफुल्ल व्यवसायाने तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. तर पारूल ही ग्रामकन्या. प्रफुल्ल विवाहित आहे. पारूल अविवाहित. एका टप्प्यावर त्यांची भेट होणे, एकमेकांकडे आकर्षिले जाणे, त्यातून निर्माण होणारी ओढ, विरह, भेटीतील उत्कटता, प्रणय, श्रृंगार, विभक्ती, हे सारे प्रेमी जिवांच्या भोवती असणारे टप्पे इथेही आहेत. म्हणून ही कहाणी पूर्ण होत नाही, अथवा अपूर्ण राहत नाही. ती संथपणे एकेक टप्पा पार करीत पुढे प्रवास करीत जाते. या प्रवासाचे साक्षीदार आहेत, पारिजात आणि चाफा. बाग. कूजन करणारे पक्षी. आजूबाजूचा निसर्ग, वरचे आकाश. चंद्र, तारे, वाऱ्याची झुळूक आणि बदलत जाणारे मास, ऋतू. प्रेमरसाने ओथंबलेल्या या प्रेमवल्ली आपल्याच कोशात जखडलेल्या नाहीत. निसर्ग त्यांचा सखा आहे, ऋतुमानानुसार त्यांच्यात बदल होत जाताना दिसतात. प्रत्येक ऋतूचा, मासाचा संबंध त्यांच्या प्रेमाशी आहे, श्रृंगाराशी आहे. तसा पारंपरिकतेशीही नाते जोडून आहे.

कथानकात आलेला हळवेपणा, भावनिकता, उदात्तता, मनोव्यापाराची अगाधता, तात्त्विक, मर्मज्ञ दृष्टी वाचकाला खिळवून ठेवते. आपल्या मोहजालात जखडून टाकते. रंग, कुंकू, साडी, वेणीची पेड, श्रृंगार, प्रणय, सौंदर्य, सुंदरता, मौन, आत्मा, शाक्त, सालभंजिनी, बुद्धाचे तत्त्वज्ञान, त्यांचे नेमके चार प्रसंग, भागवत, दृष्टांत, उगवणारा कोंब, वेली, झाडे, पाने, फुले, प्रणयिनी अशी कितीतरी रूपके आहेत, ज्यांच्यावर भरभरून विचार व्यक्त झाले आहेत. कल्पना गुंफलेल्या आहेत. पारिजात आणि चाफ्याच्या सुगंधाने सारी कहाणीच सुगंधी केलेली आहे. बागेतल्या प्रत्येक फुलाने समर्पण दाखविलेले आहे. प्रेम, ऋतू आणि निसर्ग यांचा मिलाफ म्हणजे ही कहाणी; प्रणयापेक्षा आत्म्यांचा अमोघ सवांद, असे या कहाणीविषयी निश्चितपणे म्हणता येईल.

या कथानकाला लाभलेला कालखंड आहे बारा मासाचा, चैत्रापासून फाल्गुनपर्यंतचा. श्रृंगाराने उजळलेल्या रात्री आहेत अकरा. प्रकरणांचे खंड आहेत ते याच मासांच्या नावाने. प्रत्येक खंडाच्या सुरुवातीस त्या मासाची महती काव्यात्मक पद्धतीने दिलेली आहे. ती वाचत असताना आपल्याला दुर्गाबाई भागवतांच्या 'ऋतुचक्र'चे स्मरण सतत होत राहते. प्रल्हाद जाधव यांच्या 'तांबट'चे स्मरण होते. बदलणारा निसर्ग प्रेमवल्लींमध्येही कसा बदल घडवत राहतो, त्याचे सार येथे सापडते. लेखकाने स्वतः चे सर्वस्व यात ओतले आहे, असे सतत जाणवत राहते. मुळात लेखक हे गुजराती भाषिक असल्याने तिला लाभलेली पार्श्वभूमी त्याच मातीची आहे. इतकेच. एरव्ही कुठल्याही ठिकाणी ही कहाणी आपले अस्तित्व उजळण्यात यशस्वी झाली असती. अशा कलाकृतीचा अनुवाद करणे ही मोठी जोखमीची आणि प्रतिभेची कसोटी पाहणारी गोष्ट आहे. तिच्या गाभ्यालाच काय, पाकळीला देखील अनाघ्राततेपासून दूर नेणे अशक्य ठरावे अशी नाजूक बाब परंतु सविता दामले यांनी आपला संपूर्ण अनुभव या कलाकृतीच्या पाठीशी चपखलपणे उभा केलेला दिसतो. त्यामुळे ही कलाकृती अनुवादित न राहता ती अनुवादकर्तीची मूळ कृती आहे, असेच वाटत राहते.

**मूल्य २०० रु. ● सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

## शोधयात्रा

**अनंत देशमुख**




''संशोधन ही जीवनवृत्ती असायला हवी. केवळ फावला वेळ घालविण्याकरिता आणि आपल्या नावामागे पदवी लावल्याने त्याला भारदस्तपणा प्राप्त होतो, या खुळ्या समजाने इकडे येणाऱ्यांना इतकेच विनम्रपणे सुचवावेसे वाटते की, 'बाबांनो, हा तुमचा प्रांत नाही. नाही, तुम्ही संशोधन म्हणून काहीबाही करालही, त्याकरीता तुम्हाला पदवीही मिळेल, आयुष्यभर ती तुम्ही लावून मिरवालही. पण ती आत्मवंचना ठरावी.' संशोधनाकरिता शारीरिक श्रम आणि त्याहीपेक्षा बुद्धी सतत झिजवायला हवी. वाचनाने, मननाने, चिंतनाने बुद्धी तैलधारेसारखी होईल हे पाहायला हवे. संशोधक बोलू लागला की, त्या विषयावर काही नवा प्रकाश पडत आहे, आजवरच्या त्याच्या अभ्यासाला वेगळे परिमाण मिळते आहे, असे जाणवावे...''

डॉ. अनंत देशमुख यांचे 'शोधयात्रा' हे पुस्तक म्हणजे लेखसंग्रह आहे. वेगवेगळ्या चर्चासत्रांत सादर केलेले शोधनिबंध, मासिकांमधून अलक्षित राहिलेल्या विषयांवर प्रसिद्ध झालेले लेख, असे त्यांचे स्वरूप आहे. अतिशय गांभीर्यपूर्वक, विषयाला पूर्ण न्याय देणारे असे चिकित्सक लेखन वाचताना सहजपणाचा अनुभव वाचकाला यायला हवा, तो या शोधयात्रेत येतो. तोही असा, थक्क करणारा. विशेषतः भाषेचा विद्यार्थी नसलेल्यांना सुद्धा त्यात रुची वाटावी, इतकी प्रभावी आणि तितकीच रसाळपणे मांडणी या लेखांची केलेली आहे, एकेक धागा सुगरणीने विणावा तशी.

या ग्रंथाची तीन भागात विभागणी केलेली आहे, संशोधनपर, व्यक्तिपर आणि समीक्षा. ही विभागणी वाचकाची सोय म्हणून केलेली आहे परंतु त्यांचे सार पाहिले, तर ते संशोधनाचे आहे. संशोधन किती व कशा प्रकारे करायचे असते, त्याचा वस्तुपाठ हे लेख समोर ठेवतात. सर्वच लेख गुणात्मकदृष्ट्या एकमेकांशी जणू स्पर्धा करीत आहेत, असेच वाटत राहते. कुठलाही लेख घ्या, तो खिळवून ठेवतो. त्यांच्याच भाषेत संशोधनाचे मर्म सांगायचे तर, 'त्या विषयावर काही नवा प्रकाश पडत आहे, आजवरच्या त्याच्या अभ्यासाला वेगळे परिमाण मिळते आहे,' असे जाणवत राहते.

'आधुनिक मराठी साहित्य' या लेखाचा आवाका किती प्रचंड असावा? काव्य, नाट्य, एकांकिका, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, दलितकथा, श्रमिकसाहित्य, देशात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब दाखविणारे साहित्य, असा विशाल पट त्यांनी उलगडून दाखविलेला आहे. साहित्यिक आणि त्यांच्या साहित्यकलाकृतींची नावे यासह संदर्भ दिल्याने अभ्यासकांसाठी एक संदर्भसूचीच उपलब्ध झाली, असे या लेखाला मूल्य लाभले आहे. ललित लेखन करणारा लेखक व विचारप्रवर्तक लेखन करणारा लेखक अशी विभागणी करून त्यांच्या लेखनात समाज, संस्कृती, देश, जातपात, राजकारण, पाशवीवृत्ती, मानवी नातेसंबंध यांचे चित्रण करण्यास कुठल्या साहित्यकृती ठळकपणे आपली नाममुद्रा उमटवून आहेत आणि कुठे कुणाचे भान अपुरे पडले आहे, याचा शोध अतिशय चिकित्सकपणे घेतलेला दिसून येतो. लेखक लिहिताना केवळ निवेदन करतो आहे की, त्यात गुणात्मकदृष्ट्या काही वाढ करू पाहतो आहे, हे लेखन संख्यात्मक होत आहे की, गुणात्मक होत आहे, जीवनाभिमुख लेखन किती आहे, जगण्याच्या मूलभूत प्रश्नावर ध्यास, चिंतनाद्वारे कलात्मक पातळीवर आविष्कृत करण्याची लेखकाची दृष्टी कमी पडते की काय, अशा विविध पातळ्यांवरून आवर्ती विवेचनाचे पडसाद या लेखातून उमटलेले दिसतात.

कलेसाठी कला की जीवनासाठी कला, जीवनवाद आणि स्वायत्ततावाद, स्वतंत्रतावादी साहित्य, लौकिकवाद आणि अलौकिकवाद, आस्वादक शैलीवादी की वास्तववादी साहित्य, अशा अनेक दृष्टिकोनांतून साहित्याकडे गेल्या शतकात कसे पाहिले गेले याचे विवेचन 'गेल्या शतकातील साहित्याविचार' या लेखातून आले आहे. 'संक्षिप्त मराठी वाङ्मय कोशाच्या निमित्ताने' या लेखात देशमुखांनी जो चिकित्सकपणा दाखविलेला आहे, तो थक्क करणारा आहे. या कोशात किती ठिकाणी अवधानाचा विसर पडलेला आहे, यांची उदाहरणे पाहताना, डॉ. देशमुखांच्या तीव्र तैलबुद्धाची प्रचिती येते.

व्यक्तिपर लेखांमध्ये आलेल्या व्यक्ती आपणास ज्ञात असलेल्या. परंतु त्यांचे अज्ञातपण उलगडून दाखविताना ज्या अनेक पैलूंकडे आणि शक्यतांकडे ते निर्देश करतात, तो वाचताना आपणही काही क्षण थबकतो. बाळाजीपंत नातू हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. मर्ढेकर समजून घ्यायचे असतील तर पुन्हा मर्ढेकर समग्र वाचायला हवेत, अशी इच्छा प्रबळ निर्माण झाली, ती 'मर्ढेकरांच्या आदर्शलक्ष्यी चरित्राच्या प्रतीक्षेत' या लेखामुळे.

शोधयात्रेतील सर्वच लेख हे केवळ लेखन, आणि समीक्षा यांचे अंतरंग उलगडून दाखवत नाहीत, तर लेखक/संपादकाने कोणते भान जपायला हवे, संशोधकाची नजर कशाप्रकारे असावी, याचा आदर्श समोर ठेवतात.

शोधयात्रा ही अक्षरबागेतील रसास्वादाची आहे. बागेत गेल्यानंतर फुलपाखरांच्या विविधतेची, नवतेची आणि तितक्याच हळूवारपणाचीही शोधयात्रा अशीच असू शकते. अक्षरबागेतील वर्णमाला आणि बागेतील फुलपाखरांची नवता ही सारखीच नव्हे काय? किंवा या शब्दसुमनांच्या बागेत विहार करायला गेलात तर तिथे सापडणारी आस्वादांची अक्षरे ही फुलपाखरांची रूपे असतील, हे ध्यानात येतं का? असा प्रश्न जणू सतीश भावसार आपल्याला मुखपृष्ठ पाहताना विचारीत आहेत, असे वाटावे, अशा कलात्मकतेने हे मुखपृष्ठ त्यांनी सजविले आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**गुन्हेगाराच्या मागावर**

**यशवंत व्हटकर**



अलीकडे पोलीस खात्यातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची चरित्रे प्रकाशित झाली आहेत, होत आहेत, ही बाब आनंदाची म्हणावी लागेल. त्यांच्यापैकी एक आहेत यशवंत व्हटकर, पोलीस अधिकारी. त्यांच्या या सेवेतील पहिल्या एका तपाच्या कारकिर्दीविषयीचे लेखन ते घेऊन आले आहेत, 'गुन्हेगारांच्या मागावर' या नावाने. त्याला काही मर्यादा असणे स्वाभाविक ठरते. परंतु जे समोर ठेवले आहे, ते डोळ्यांत अंजन घालणारे अस्सल आहे, हे निश्चित.

पोलीस अधिकारी म्हणून 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे घोषवाक्य आचरणात आणण्यासाठी प्रत्यक्ष 'ड्युटी'ला सुरुवात होते ती मुंबईतील धारावी पोलीस स्टेशनहाऊसपासून. अंगात असलेली रग, ग्रामीण भागातून सोबत आलेले माणूसपण आणि आपले कर्तव्य चोखपणे पार पाडण्याचा प्रामाणिक ध्यास, यांचे दर्शन या तपाच्या पहिल्या कारकिर्दीत दिसून येते. धारावीच्या इथल्या गुंडापुंडाचा बंदोबस्त करणे, नंदिनी रामप्रसाद गुप्ता या उत्तरप्रदेशातून मुंबईत पळून आलेल्या तरुणीला तिच्या गावी परत पाठविण्यासाठी केलेली धडपड, हरवलेल्या इसमाचा जवळजवळ बंद झालेला तपास परत चालू करून निकाली काढणारे दुराईराजचे प्रकरण, चंदनाचे जीवन पुन्हा सावरले जावे म्हणून केलेली मदत, खुनाचा आरोप असलेल्या खंडणी–बहाद्दर रुपा नेपाळीच्या आवळलेल्या मुसक्या, गँगवॉरवाल्यांचे आश्रयस्थान असलेल्या महाबळ शेट्टीच्या गडाला दिलेला धक्का, बँक रॉबरी आणि उषा कडावूल प्रकरण, बनावट पासपोर्ट आणि व्हिसा गँग व त्यांचा मद्रास छापखाना उध्वस्त करण्याचे प्रकरण, नुसत्या फोटोवरून आंतरराष्ट्रीय गुन्हेगार असलेल्या मनमीतला मुंबईत जेरबंद करणे, खैरू–सायरुन्नीसा प्रकरण शोधून काढणे, बाबरी मशीद पाडल्यानंतर उसळलेल्या जातीय दंगलीत कुर्ला भागात दाखविलेले अतुलनीय साहस, अशा कितीतरी प्रकरणी यशवंत व्हटकर यांनी आपल्या कौशल्याचा, साहसाचा आणि माणूसपणाचा परिचय पोलिसखात्याला, वरिष्ठांना करून दिला. ज्यासाठी रोख बक्षिसापासून ते राष्ट्रपती पुरस्कारासाठी शिफारस करण्यापर्यंतची अनेक पारितोषिके सन्मानपूर्वक त्यांच्याकडे आली. ज्यामुळे केलेल्या कामाचे समाधान लाभले. पदोन्नती झाली. वेगवेगळ्या जबाबदाऱ्या चालत आल्या.

पोलिसखाते केलेल्या चांगल्या कामगिरीसाठी नक्कीच शाबासकी देते, परंतु या खात्याचा करडा रंगही लक्षात घेण्यासारखा आहे. केलेल्या कामात हयगय, निष्काळजीपणा, स्टेशनप्रमुख म्हणून असलेली जबाबदारी, दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने ओढवलेली आपत्ती, आरोपीने केलेले खोटे आरोप, कैदी हातावर तुरी देऊन पळून जाणे, पोलिसकस्टडीत झालेले मृत्यू, महिला आरोपीने उडविलेले चारित्र्यावरील शिंतोडे, अशा वेळी वरिष्ठ पाठीशी घालतीलच याची शक्यता गृहीत धरता येत नाही. त्यातच वरिष्ठांची मर्जी हा इथला सगळ्यात नाजूक भाग. या चक्रातून व्हटकरांची सुटका झालेली नाही, आणि व्हटकरांनी ती लपविलेली नाही किंवा तिथे आपली बाजू सावरून सांगण्याचा प्रयत्न केलेला नाही. आलेले सत्य स्वीकारले, ते तसेच वाचकांसमोर ठेवले. कर्तव्यनिष्ठ अधिकारी अशा प्रकरणात शिक्षेला सामोरा जातो, तेव्हा होणाऱ्या यातना कोठडीतील छळापेक्षा भयंकर असतात. त्या त्यांनी प्रामाणिकपणे मांडल्या आहेत.

यशवंत व्हटकर यांना लाभलेले वरिष्ठ हे त्या काळात काळावर आपला ठसा उमटवलेले असे आहेत. अरविंद इमानदार, मीरा बोरवणकर, डी शिवानंद, वाय सी पवार, रामदास कामत, जयंत शास्त्री, पोपट आवळे, वालीशेट्टी, यांच्याशिवाय ज्यांच्यासोबत काम केले ते सहकारी, त्यांची कामाची पद्धत, स्वभाव, त्यांच्यातले आंबट–गोड यांचे वर्णन व्हटकरांनी उत्तम लेखकाप्रमाणे सकसपणे केले आहे. पोलिसस्टेशनचे म्हणून काही शब्द रूळलेले असतात.

बीट, सत्यशोधक, स्टेशनडायरी, बाबल्या, धर्मकाटा, रिमांड, पेट्रोलिंग, आरोपांसाठी लावायची कलमे यांचा परिचय यातून करून दिलेला आहे.

व्हटकरांनी केलेले लेखन हे त्यांच्या एका तपाच्या कामगिरीविषयीचे आहे. त्यात वैयक्तिक जीवन, कुटुंब यांचा आलेला उल्लेख हा त्रोटक आणि आवश्यकतेपुरताच आलेला आहे. त्यामुळे हे लेखन एका पोलीस अधिकाऱ्याची डायरी म्हणता येईल असे आहे परंतु त्यात पोलिसी कोरडेपणा नाही. तिथल्या भाषेचा परिणाम तिच्यावर नाही. प्रत्यक्ष फिल्डमध्ये काम करीत असल्याने आपल्या भोवती दिसणारे जग, तिथले वातावरण, माणसे, त्यांच्या प्रवृत्ती अशा सर्व तपशिलाचा ते वेध घेतात. महत्त्वाचे म्हणजे करड्या गणवेशात असून, कामाची पद्धती करडी ठेवूनही माणूसपणाला कुठे गालबोट लागलेले नाही. त्यामुळे एक पोलीस अधिकारी किती निष्ठेने आपली जबाबदारी, कर्तव्य पार पाडतो याचे वर्णन मनाला भावणारे ठरले आहे. अधिकारी आणि अधिकारातला माणूस याचे उत्तम दर्शन यातून होते.

गिरीश कुलकर्णी यांनी मुखपृष्ठ साकारले आहे. गुन्हेगाराच्या हाताचे ठसे हे माग घेण्यास पुरेसे ठरतात. तेच ठसे मुखपृष्ठावर ठेवून मागे गडद रंगाची शेड दिलेली आहे. शिवाय पोलीस म्हटले की बेड्या हा त्यांचा ट्रेडमार्क, त्याही तिथे दाखविलेल्या आहेत. त्यामुळे शीर्षकाशी साम्य साधले गेले आहे.

**मूल्य १५० रु. ● सवलतीत ९० रु.**




# ग्रंथपान

**सफरनामा**
**स्मिता भागवत**




''आणीबाणीच्या परिस्थितीत माझे समग्र चेतातंत्र कामावर केंद्रित करण्याची मला सवय आहे. म्हणूच आता फार काही करणे जमणार नाही, हा नकारात्मक विचार मनात नव्हता. 'काय करता येईल', याचा शोध वेगाने घ्यायला हवा, असे मला वाटले. याचवेळी नव्हे तर अटीतटीच्या प्रत्येक क्षणी मन आणि बुद्धीचा कौल घेत, विचार करून तो वेगाने अंमलात आणण्याची मला सवय आहे. गॉड हेल्प्स देम हू हेल्प देमसेल्व्हज् यावर माझी नितांत श्रद्धा आहे. कदाचित म्हणूनच मला विमान उतरवणे जमले असेल.''

स्मिता भागवत यांचे सफरनामा हे नवे पुस्तक समोर आहे. त्यांची 'रंग दे बसंती', 'सावन घन बरसे', 'पुत्र मानवाचा' यासारखी पुस्तके यापूर्वी वाचलेली होती. वास्तव, इतिहास यांची साक्ष ठेवून त्यांचे लेखन सुरू आहे. गुजरातीइतकीच मराठी भाषेची लेक असल्याने दोन्ही भाषेत समृद्ध असे लेखन त्यांच्या हातून झाले आहे. शिवाय हिंदी व इंग्रजीचा लडिवाळ जिव्हाळा असल्याने, त्या भाषांतूनही त्यांनी लेखन केलेले आहे. तेही सकसपणे, हे त्यांना मिळालेल्या पुरस्कारांनी सिद्ध केले आहे. तोच सकसपणा 'सफरनामा' या नव्या पुस्तकाला लाभलेला आहे, याची खात्री पुस्तक वाचून झाल्यावर पटते.

प्रवासवर्णन हा गाभा असलेले हे पुस्तक, केवळ प्रवासाचे वर्णन करीत नाही. स्थळ, परिसर, मार्ग, निसर्ग जो ओघाने नजरेसमोर येतो म्हणून त्यांची केवळ शब्दबंबाळ भौगोलिक वर्णने यात नाहीत. भौगोलिकतेच्या सोबत आणखी त्या पलीकडे जाऊन प्रवासवर्णन करता येते. अनुभव, घटना, आख्यायिका, चमत्कार, गोष्टी, इतिहास यांचाही यात वेध घेता येतो, त्यांचा समावेश करता येतो. तो वेध या पुस्तकात लेखिकेने घेतला आहे. याचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो.

'किमया निसर्गाची' या लेखात हरियाणातील 'ज्वालामुखी' या गावातील याच नावाच्या मंदिराचे वर्णन आहे. ज्वालामुखी सती पार्वतीचे नवलप्रद मंदिर! ज्या मंदिरात देवीच्या मूर्ती ऐवजी धरणीतून प्रकटलेल्या स्वयंसिद्ध अग्निशिखा प्रज्ज्वलित आहेत, निसर्गतः. अनेक शतकापासून या ज्वाला प्रजेच्या श्रद्धा व कुतूहलाचा विषय ठरल्या आहेत. अकबर बादशहा आणि ध्यानू यांची आख्यायिका या लेखात आलेली आहे. या मंदिराप्रमाणेच गुवाहटीच्या कामाख्यादेवीच्या मंदिराचे वर्णन आहे. 'गुपिते नायगारा पोटातील...' या लेखात दि. ९ जुलै १९६० रोजी नायगारा या विख्यात धबधब्यात घडलेल्या अद्भुत, विस्मयकारी आणि अचाट साहसाच्या घटनांची नोंद आहे. अमेरिका आणि कॅनडा या दोन्ही देशात 'ब्रायडल व्हेल फॉल' आणि 'हॉर्स शू शेप फॉल' या नावांनी पसरलेल्या या धबधब्याचे कॅनडातले रूप रौद्रभीषण आहे. या धबधब्याने दाखविलेले रूप म्हणजे अचानक बोटीतील माणसांना हवेत फेकून देणे आणि साहसी वीरांनी त्यांना वाचवणे, ही एक घटना. तर १८४८ ला याच प्रपाताने तब्बल अडीच दिवस अदृश्य होण्याचा विक्रम केला होता. यातही विस्मयकारी आख्यायिकांचा समावेश आहे. 'देवदूतांचा बगीचा' हा लेख म्हणजे या दोन देशांतील बेटांवर पसरलेल्या बागेसंबधातील आख्यायिका, व सत्य यांच्या चित्तरकथा आहेत. ज्या वाचताना मन थक्क होते. 'अजब नगराची गजब कहाणी' या लेखात फ्लोरिडा राज्याच्या ईशान्य भागात डेटोना बीचनजिक स्प्रूस क्रिक हे छोटेखानी नगर आहे. येथे मोटारगाडी बाळगावी तसे बहुतेकांकडे स्वतःचे विमान आहे. म्हणून कौतुकाने त्यास एअरपार्क वा फ्लाय कम्युनिटी असेही म्हणतात. या विमानांना पार्क करण्यासाठी घराजवळ स्वतंत्र सोय केलेली असते. यांच्या वर्णनाच्या सोबत त्यांचा इतिहासही यात दिलेला आहे. उत्तर अमेरिकेत पहिले आंतरराष्ट्रीय शिवानंद योग आणि वेदांत केंद्राची निमिर्ती व्हॉलमोर येथेच का झाली, याचे वर्णन व इतिहास 'कॅनडातील पहिला योगाश्रम. एक आक्रित' या लेखात आलेले आहे.

फ्रँकफर्ट ते टोरांटो या प्रवासात जर्मनीत विमानप्रवासाच्या दरम्यान अनुभवाला हिटलरशाही वृत्ती आणि त्याचवेळी तत्परतेने दिसलेली सहृदयता याचा अनुभव आहे. न्यूयॉर्क-टोरान्टो प्रवासात विमान बिघडले असता कशाप्रकारचा अनुभव येऊ शकतो, याचे वर्णन आहे. कुमाउँ रेल्वे एक्सप्रेसने प्रवास करीत असताना आमदार-खासदारांची मुले मौज म्हणून प्रवाशांना कशी जीव मुठीत धरून प्रवास करायला लावतात, याचा अनुभव आहे. डलहौसीला जाण्यासाठी बसने प्रवास करीत असताना अचानक बसवर डोंगरावरून पाऊस-वाऱ्याच्यासोबत दगड -मातीचा वर्षाव होऊ लागल्यानंतर काय अवस्था होते, याचा अनुभव आहे. गुजरातमधील कायण येथे हिंदूंचे अपूर्ण राहिलेले शिवाचे मंदिर करीमभाई मोमीन यांनी कसे पूर्ण केले, त्याचे वर्णन आहे. आणि ब्रम्हदेवाच्या पुष्कर येथे सत्याची परीक्षा पाहणारा तरूण हा राजहंस कसा, याचे वर्णन आहे.

सफरनामा हा डोळसपणे केला तर अनुभव, घटना, माणसे, नवीन माहिती यांना तोटा नाही. फक्त त्यासाठी हवी चातुर्य, जिज्ञासा, कुतूहल, आस, अभ्यास या गुणांची जोड. ती असली तर त्या संधीचे सोने होते. इतरांना आनंद वाटता येतो. लेखिकेकडे असलेली ही गुणांची दृष्टी त्यांच्या लेखनातून पदोपदी दिसून येते. आवश्यक तिथे फोटो दिल्याने वर्णनाला साज चढला आहे.

सफरनामा म्हणून लेखिकेने ज्या ज्या ठिकाणी सफर केली आहे, तेथील वैशिष्ट्ये दृगोचर करणारी दृश्ये, फोटो यांची उत्सुकता वाचकाला लागलेली असते. शब्ददेह लाभलेली वर्णने नजरेसमोर तरळताना या प्रतिमादेही वर्णनांचा आस्वाद नक्कीच आनंददायी असतो. ते भान सतीश भावसार यांनी अचूकपणे सांभाळले आहे. त्यामुळे मुखपृष्ठाला लोभसपणा प्राप्त झाला आहे.

**मूल्य १६० रु. ● सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**प्रॉमिसलँड**

**मूळ लेखक : अविनाश बागल**

**अनुवाद : जी.बी. देशमुख**




''महत्त्वाकांक्षासुद्धा एक अजब चीज असते. आधी तुम्हाला ती उचकावते, डिवचते आणि तुम्हास केवळ पळायलाच नव्हे तर बेफाम वेगाने दौडायला लावते. मग यश लवकर हाती येते आणि वारंवार येते. नंतर तुम्ही थोडा दम घ्यायला थांबता आणि सगळे काही स्थिर होताना दिसते. तुमच्या लक्षात येते की तुम्ही पुढील यश मिळविण्यासाठी पुन्हा जोरदार मेहनत करू लागला आहात आणि मग एक असा मध्यबिंदू येतो जेथे तुम्ही स्वतःलाच प्रश्न विचारून बसता, इतक्या उरफोडीची खरंच गरज आहे?''

'प्रॉमिसलँड' ही आहे एका महत्त्वाकांक्षा असलेल्या यशस्वी माणसाची कहाणी, डॉ. अविनाश बागल यांची. प्रॉमिसलँडवर पाऊल ठेवायचे तर अगोदर मनाचा महत्त्वाकांक्षेने ताबा घेतलेला असणे महत्त्वाचे. नुसती महत्त्वाकांक्षा असून चालत नाही, तिला जोड असावी लागते जिद्दीची, पराकाष्ठेची, कठोर परिश्रमाची, हार न पत्कारण्याची, परिस्थितीला शरण न जाता तिच्यावर मात करण्याची आणि आपल्याला कुठल्या परिघावर विराजमान व्हायचे आहे त्याचे भान. तरच महत्त्वाकांक्षेला अर्थ प्राप्त होऊ शकतो. तरच प्रॉमिसलँडवर पाय ठेवल्याचे सार्थक होऊ शकते, आणि प्रॉमिसलँडलाही उपकृत झाल्याचा आनंद मिळू शकतो. या सगळ्यांचे चित्रण शब्दरूपाने आपल्यासमोर मांडले आहे डॉ. अविनाश बागल यांनी. त्याचा अनुवाद केला आहे जी.बी. देशमुख यांनी. परंतु गंमत अशी की, मूळ लेखकाने लिहिलेली संहिता, कोणत्या भाषेत होती, वा कुठे प्रकाशित झाली याचा तपशील काही यात आलेला नाही. कदाचित ती इंग्रजीत असण्याची शक्यता आहे. अमेरिकेसारख्या देशात यशस्वी ठरलेल्या व्यावसायिकाचे माध्यम हेच असणे अपेक्षित धरायला हरकत नसावी.

कोल्हापूरसारख्या शहरातून अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी गेलेल्या डॉ. बागल यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खरं तर भारतात परत येण्याची इच्छा होती. परंतु जमले नाही. हे न जमणे कोळ्याच्या जाळ्यासारखे नव्हते. एकेका संधीला सोन्याच्या वास्तवात गुंफण्याची कला अंगी असल्याने, प्रगतीचे इमले उंचावत गेले, स्तरावर स्तर रचल्यासारखे! आणि मग निवृत्तीपर्यंत मागे वळून पाहणे झालेच नाही. सिव्हील इंजिनिअर असलेल्या तरुणाच्या ठायी ही कला असणे स्वाभाविक म्हणायला हवे. त्या अर्थाने ही एका यशस्वी व्यावसायिकाची कथा म्हणता येईल, जिला ते स्वतः नाव देतात, 'एका परदेशस्थाची कथा.'

अमेरिका ही डॉ. बागल यांची प्रॉमिसलँड. इथे स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी होतकरूंच्या वाट्याला येणारी कामे त्यांनी कुठलाही कमीपणा न मानता पार पाडली. लॅबची साफसफाई, सभागृहाच्या खुर्च्या लावणे, मित्रांच्या खोलीवर भांडी घासणे, स्वतःच्या शिक्षणाच्या कक्षेत न बसणारी कामे करणे, ही कामे म्हणजे महत्त्वाकांक्षा असलेल्या तरुणाची कसोटी पाहणारी परीक्षा केंद्रे! बागलांनी या कसोट्या लीलया पार केल्या आणि अवघ्या आठ महिन्यात स्वतःच्या कारने प्रवास करण्याइतपत मजल मारली. पोलाक स्टील या कंपनीत कारकीर्दीला सुरुवात केली. पुढे आयटीटी, लिट्टन, एमसीआर, केएएमजी, आबीएम, पीडब्ल्यूएच , केएसए यासारख्या नामांकित कंपन्यांनी त्यांना आपल्या व्यवसायाशी जोडून घेतले, संचालक, सल्लागार, भागीदार म्हणून. अमेरिकेपाठोपाठ भारत, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, असा मोठ्ठा पल्ला त्यांच्या व्यवसायाचा भाग झाला. पुढे स्वतःची कंपनी काढली, 'साई' नावाची. एक पाय जमिनीवर, दुसरा पाय विमानात इतका व्यस्तपणा. तरीही आपल्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ दिलेले नाही. संगणक विषयात पीएच.डी. मिळविली. अर्थातच, पुढील सगळा व्यावसायिक प्रवास हा संगणकाशी जोडला गेला. स्ट्रक्चरल इंजिनीअरची पदवी घ्यायला गेलेल्या तरुणाचे हे यश नक्कीच डोळे दिपवणारे म्हणावे लागेल. याविषयी लेखक लिहितात, ''वीस वर्षापूर्वी मी दोनशे रुपये (चाळीस डॉलर) एकत्र करण्यासाठी धडपडत होतो, कशासाठी तर अमेरिकेला जाण्यासाठी जहाजाचे तिकीट मिळविण्यासाठी. आणि आता तोच मी होतो, एका अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीचा विभाग संचालक, अमेरिकेहून हवेत उडत भारतात येणारा.''

आपले शिक्षण, आपला व्यवसाय एवढेच त्यांनी स्वतःला मर्यादेत ठेवले नाही. पत्नी, भाऊ, मुले यांच्या शिक्षणाकडे, त्यांच्या भवितव्याकडे तितकेच आत्मीयतेने पाहिले. आपल्या बरोबरीने त्यांच्या यशस्वितेला प्राधान्य दिले. काहीवेळा ओढाताण झाली, तरी दुर्लक्ष होऊ दिलेले नाही. यशाबरोबर अपयश आले, अपघात झाला, यांचीही वर्णने यात प्रांजळपणे आलेली आहेत.

प्रत्येक क्षेत्राची स्वतःची ओळख असते, शिस्त असते. तिथे असलेल्या अधिकाऱ्यांचे वेगळेपण असते, त्यात स्पर्धा, चढउतार असतात, अधिक पैसा मिळवण्यासाठी कंपन्या बदलण्याची प्रवृत्ती असते, या सगळ्यांचे तपशील लेखकाच्या प्रवासासोबत आलेले आहेत. त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्ती आहेत, त्या वाचताना जाणवते, जगात चांगली माणसेही आहेत, जी परकेपणाची भावना न दाखविता गुणांची कदर करतात. एकूण लेखन प्रेरक, स्फूर्तिदायक आणि गुणांची कदर करावी असे आहे.

प्रॉमिसलँडकडे सुरू झालेला प्रवास हा जहाजावरून झाला, एस.एस. स्टूॅथेनेर नावाच्या. हे एक जुने जहाज होते. आणि सुरू झालेला प्रवास हा देखील पंच्यावण्ण वर्षांपूर्वीचा. त्यावेळचे ते जहाज, शहराची आकृती, समुद्र हे जुन्या काळच्या ब्लॅक ॲण्ड व्हाईट फोटोत कसे दिसेल, याचा प्रत्यय यावा, असे मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभले आहे. 'ग्रंथाली'च्या संगणक विभागाची ही कल्पकता अप्रतिमच म्हणायला हवी!

**मूल्य १८० रु. ● सवलतीत १२० रु.**




# ग्रंथपान

**ना पूर्व ना पश्चिम**

**डॉ. बाळ फोंडके**




''पर्यटनातून स्थलदर्शनाचा आनंद जरी मिळत असला तरी मनुजा चातुर्या येण्यासाठी अधिक काहीतरी देणं आवश्यक असतं. पॅरिसच्या लूव्ह म्युझियमला भेट देऊन तिथल्या मोनालिसाचं दर्शन घेतल्यानंतर त्या चित्राकृतीचा इतिहास किंवा त्या चित्रशैलीची व्यवच्छेदक लक्षणं सांगितली गेली तर वाचकांच्या चित्रकलेच्या ज्ञानात अधिकच भर पडणार नाही का? ही ज्ञानलालसा काही वाचकांमध्ये असू शकते पण नसली तरी ती रूजवण्याचं काम सहजगत्या होण्यासारखं असतं. हसतखेळत ज्ञानदान करण्याची प्रवृत्ती वृद्धिंगत होण्याच्या आजच्या जमान्याची ती मागणीच आहे.''

पर्यटनाचा आनंद आणि त्याचे वर्णन या दोहोची सांगड घालताना कोणता दृष्टिकोन बाळगायला हवा, त्याची अनुभूती वाचकांच्या ठायी यावी, याची प्रचीती देणारे पुस्तक म्हणजे 'ना पूर्व ना पश्चिम.' डॉ. बाळ फोंडके यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले. डॉ. फोंडके हे वैज्ञानिक आहेत, तसेच सिद्धहस्त विज्ञान लेखक आहेत. आतापर्यंत त्यांची ६५ हून अधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्याच परंपरेला साजेसे हे नवेकोरे पुस्तक, पर्यटनानंद देणारे. संशोधन परिषदा, प्रशिक्षण या निमित्ताने जगभर प्रवास केलेल्या डॉ. फोंडके यांनी नोंद करावी अशी प्रवासवर्णने लिहिली, ती नियतकालिकांमधून प्रकाशित झाली आहेत. ती वाचलेली असतील तर नक्कीच आठवणींत रुंजी घालत असतील. त्याच लेखांचा हा संग्रह आहे. त्यामुळे एकत्रित अनुभव वाचकांच्या समोर उलगडत जातो आणि वाचकालाही उमगत जाते की पर्यटन करताना समोर दिसते त्याचा चक्षुआनंद घ्यायचाच, परंतु त्याबरोबर या स्थळाचा इतिहास, हेतू, पार्श्वभूमी, शास्त्र, असे अनेक पदर असू शकतात, त्यांचाही शोध घ्यायला हवा. आनंदाची पातळी उंचावण्यात त्याचे महत्त्व अधिक आहे. जसे मोनालिसाच्या चित्राबाबत त्यांनी नमूद केले आहे.

एकूण १४ लेखांचा समावेश या पुस्तकात आहे. पहिलाच लेख आपल्याला न्यूझीलंडच्या सफरीवर घेऊन जातो. सुंदर या शब्दाचा नितळपणा, सौंदर्य आणि अद्‌भुतता काय असते, ती इथे अनुभवता येते. अंटार्क्टिका न पाहता तिचे प्रत्यक्ष दर्शन इथे घडवू शकेल असा देश. नायगारा या अमेरिकन धबधब्याला मान खाली घालायला लावणारा बॉवेन धबधबा इथे आहे. निसर्ग तर मुक्त हस्ताने उधळण करीत असलेला. जोडून आहे दुसरा देश, ऑस्ट्रेलिया. तोही तसाच सुंदर. या देशानंतर क्रमांक लागतो सिंगापूरचा. आपणास ज्ञात असलेले सिंगापूर किती पुढारलेले आहे, १९६६ साली स्वतंत्र झाल्यांनतर त्याने आपल्या भौगालिक मर्यादांसह अनेक मर्यादांवर कशाप्रकारे मात करून जगात अव्वल स्थान पटकावले आहे, केवळ इमारती, वा कसिनो उभे करून पर्यटकांना आकर्षित करणारे केंद्र नव्हे तर, यांच्यापलीकडे जाणारे सिंगापूर कसे आहे, ते या लेखांमुळे लक्षात येते. त्यातला न्यू वॉटर, पाण्याचा प्रयोग हा तर जगाच्या डोळ्यातले पाणी काढणारा म्हणावा लागेल. जंगलसफारी दिवसा नाही, रात्री करायची असते, हे सूत्र पटवून देणारा हा देश आहे. यासंबधी लेखक लिहितात, 'नियमांचं काटेकोर पालन करत शिस्तबद्ध वागणूक या एकमेव भांडवलावर तिसऱ्या जगातून त्या देशानं पहिल्या जगात झेप घेतली.'

उल्म हे अल्बर्ट आईनस्टाईनचे जन्मगाव. त्याचं खरं नाव उल्म-आम्-डोना. हे गाव गणितज्ञांची परंपरा लाभलेलं गाव. त्याची म्हण अशी, 'उल्मनीझे सुन्ट मातेमाटिनी' म्हणजे 'उल्मवासी हे गणितीच असतात.' त्या गावाची सफर लेखकाने घडवली आहे. तीच तऱ्हा विज्ञानकथेचं जन्मस्थळाची. बुर्ग फ्रँकेन्स्टाईनची. त्याच्या निर्मितीची कथा आहे. जी लेखकाला तिथे भेट दिल्यामुळे हाती आली. तिथल्या गढीवरचं वातावरणच मुळी भयप्रद असतं. दुपारी तीन-चार वाजताच अंधाराचं साम्राज्य पसरतं. हे स्थळ पाहण्याचं समाधान काही वेगळंच. ग्रीनिच हे एक ठिकाण असे आहे की, एक पाय पूर्व खंडात तर दुसरा पाय पश्चिम खंडात. असे दोन भाग करणारी रेषा म्हणजे मेरिडियन रेषा, तिला भेट देण्यासाठी लोक आवर्जून जातात. तिच्या विषयीची माहिती देताना तिची निर्मिती, त्यामागची कथा, असा सारा तपशील मनोरंजकपणे 'ना पूर्व ना पश्चिम' या लेखात आलेला आहे.

भोपाळजवळील भीमबेटका हा सत्तर गुहा असलेला जंगल-डोंगराने व्याप्त असा आदिप्रदेश. ज्याचा संबंध पांडवांच्या अज्ञातवासाशी जोडला गेलेला आहे. तो पाहताना सापडलेला इतिहास थक्क करणारा आहे. तसेच अमेरिकेत असताना पानगळ अनुभवास आली. त्यावरून निसर्गात जी रंगाची उधळण होते, त्याची कारणमीमांसा वाचतानाही आपण थक्क होत जातो. नुसत्या ठळक गोष्टी वा घटनांची नोंद नाही, तर समुद्र, डोंगर, संध्याकाळ, रेस्टॉरंट, गुलाब, पेंग्विन, प्रवाळ, कोरल, बिअर, अंजीर, दुरियान, ड्रॅगनफ्रूट, जिवंत म्युझियम, पाने, झाडे, फुले, पक्षी, पशू यांची आपणस अज्ञात असलेली कितीतरी माहिती तपशीलवारपणे यात दिलेली आहे. विज्ञानकथेशी नाते असलेल्या त्यांनी जे सुंदर जग वाचकांच्या समोर ठेवले आहे, ते खरोखरच अनोखे आहे. विज्ञानाच्या विविध पैलूंशी नाते सांगणारे आहे. अर्थात त्यासाठी त्यांना सहकार्य लाभले. त्यांच्या नावांचा लेखकाने कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. हे लेखन वाचत असताना कुठेही क्लिष्टता आड येत नाही, उलट अनेक प्रसंगी विनोदांची मनोरंजक पेरणी करणारी वाक्ये भेटत जातात. 'जंगलसफारीचा भन्नाट अनुभव आल्यानंतर सफारी सूट घालायचे टाळू लागणे', 'न्यू वॉटर प्यायल्यानंतरचे चेहरे', भन्नाटच. त्यांनी केलेली वर्णने वाचताना सारी दृश्ये नजरेसमोर जशीच्या तशी उभी राहतात. तरीही सोबत रंगीत फोटो दिलेले आहेत. त्यामुळे वर्णनाच्या सौंदर्यात अधिक भर पडली आहे. सतीश भावसारांनी पर्यटक आणि होकायंत्र यांचा सुरेख मेळ मुखपृष्ठावर घातला आहे, जो शीर्षकाशी नाते जोडणारा आहे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## तरीही शेषप्रश्न

**छाया दातार**




'तरीही शेषप्रश्न' हे छाया दातार यांचे नवीन पुस्तक. 'शेषप्रश्न' हा शब्द स्वतःच ध्वनित करतो, की अजूनही बरेच काही साध्य करायचे शिल्लक आहे. शेषप्रश्न या नावाने असलेली संघटना आणि छाया दातार या दोन बाजू असलेले एक नाणे आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. 'शेषप्रश्न' हे नाव संघटनेला मिळाले ते शरच्चंद्र चटर्जी यांच्या बंगाली कादंबरीवरून. मार्क्सवादाने मानवमुक्तीची कल्पना सांगितली तरी त्याने लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी या प्रश्नावर उत्तर शोधले नाही. म्हणजेच पुन्हा स्त्रीप्रश्न हा शेषप्रश्नच राहणार, म्हणून हे नाव मला आवडले, असे लेखिका पृ.क्र.१२९वर नमूद करतात. यावरून लक्षात येते की, शेषप्रश्न ही संघटना स्त्रीप्रश्नांसाठी कार्य करणारी संघटना होय. परंतु पुस्तक वाचताना असेही जाणवू लागते, हे छाया दातार यांचे चरित्र तर नव्हे? ते पूर्णपणे खरे नसले तरी ते अर्धसत्य नक्कीच म्हणता येईल. एका संघटनेचा प्रवास आणि तिची कार्यकर्ती असे दोन घटक वेगळे करता येत नाही.

अलीकडेच घडलेल्या निर्भया प्रकरणाने सर्वच संवेदनशील माणसांच्या विवेकाला मोठा धक्का दिला. मथुरा प्रकरण, त्यावरील न्यायालयाचा निकाल, भंवरीदेवी प्रकरण, मुझफ्फरनगर प्रकरण, गोध्रा प्रकरण, खैरलांजी, या सगळ्यांत बळी पडलेल्या आहेत त्या स्त्रियाच. कुठलीही दंगल वा जातीय दंगा आग पकडतो, तेव्हा बळी जातो ती स्त्रियांचा. अशावेळी जे अनेक प्रश्न निर्माण होतात, ते सोडविणे अनेकदा अशक्य होते. त्यातून निर्माण होतो तो पहिला प्रश्न, महिलांच्या सुरक्षेचा. कामगारांना संरक्षण देण्यासाठी श्रमिक संघटना आहेत. तरीही श्रमाचा मोबदला देण्यात पुरुष व स्त्री हा भेद आहेच. समान काम समान दाम ही नीती अव्हेरली जाणे, पर्यायाने स्त्रीला कमी लेखणे, हाही स्त्रियांवर अत्याचारच आहे. दलित, मुस्लिम, आदिवासी स्त्रिया, वेश्या यांचे प्रश्न वेगळे आहेत. अलीकडे चर्चेत आलेले लिव्ह इन रिलेशनशिप, समलिंगी संबंध हे विषय मुळातच प्रश्न निर्माण करणारे व त्यातून निर्माण होत असलेले आणखी वेगळे प्रश्न, अशा विषयांची चिकित्सा या पुस्तकात केलेली आहे. या सगळ्या चिकित्सेत केंद्रस्थानी आहे ती स्त्री. स्त्रीप्रश्नाची व्याप्ती आणि जटिलता यांचा सखोलपणा हा एखाद्या तळ न दिसणाऱ्या डोहासारखा आहे. त्याचा तळ गाठणे ही एखाद्या संघटनेच्या आवाक्यातील गोष्ट असू शकत नाही परंतु त्यासाठी प्रयत्नच करायचे नाहीत, हा पळपुटेपणा झाला. इथे या पुस्तकात ठामपणा आहे तो बांधिलकीचा. शरणागत असणाऱ्या मनोवृत्तीला ताठ मानेने उभे करण्याचा. त्यासाठी स्त्रीजागर, नारीमुक्ती, स्त्रीशक्ती, स्त्रीमुक्ती सारख्या अनेक संघटना, अनेक कार्यकर्ते / कार्यकर्त्या अविरतपणे प्रयत्न करीत आहेत. प्रश्नांच्या मुळाशी जात आहेत. एकेक घटना, प्रसंग, यांना समोर ठेवून त्यावर मात कशी करता येईल, काय अनुभव आले, कसे प्रयत्न केले, या सगळ्यांची चर्चा व संवाद साधला जातो. त्यासाठी त्या एकत्र येतात. जोडल्या जातात. सुधा, ललिता, निर्मला, साधना, चारू, अनु, कमला, शहनाझ, कविता, अशा अनेकजणी आहेत. एका विचाराच्या, एका विचाराने झपाटलेल्या. अनेक पुस्तके, कायदा, न्यायालयीन निवाडे, स्थापन झालेले लवाद वा कमिट्या, त्यांचे अहवाल, त्यात सुचविलेल्या दुरुस्त्या, यांचे संदर्भ लेखिका समोर ठेवतात. शेषप्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करतात. इतकेच नाही, तर बलात्कार म्हणजे काय, त्यामागचे मानसशास्त्र काय, अत्याचारामागची मनोवृत्ती काय सांगते, योनिशुचिता, लिव्ह इन रिलेशनशिप, कामप्रेरणा, स्त्रीप्रश्न, स्त्रीविश्व, कौटुंबिक हिंसा अशा अनेक विषयांवर धीटपणाने हे पुस्तक बोलते.

छाया दातार यांचा परिचय आहे तो कार्यकर्ती, चळवळीशी जोडलेली, असा. त्यांची क्षेत्रेही त्यांच्या कर्तृत्वाला साथ देणारी अशी बहुविध स्तरावरील. तरीही त्यांच्यातील माणूसपणाच्या ओलाव्यावर कोणत्याही क्षेत्रांतील रूक्षपणाने मात केलेली नाही, हे त्यांच्या लेखणीने सप्रमाण सिद्ध केलेले आहे. सदर पुस्तकातील लेखन हे पुरोगामी आणि प्रतिगामीत्वाच्या शिवेवर लढणारे दिसत असलेतरी त्यांच्या लेखणीतला संयतपणा आणि निर्भीडपणा काळजाला भिडणारा आहे. संवादाच्या रुपाने विषयाला आकार देण्याचे तंत्र असूनही, वाचक त्यांच्या सभेत हजर आहे, इतकी एकरूपता या लेखनाला लाभलेली आहे. यात कुठे उपदेश करण्याच्या हेतूने वाक्यांची पेरणी केलेली नाही, परंतु काही वाक्यांना ओलांडून जाणेही शक्य नाही. उदा. 'लिंगाचा वापर शस्त्र म्हणून करणे आणि कामवासनेचे शमन म्हणून करणे या दोन कृतीत फरक आहे.' 'धर्मयुद्धे ही स्त्रियांच्या शरीरावर खेळली जातात हे स्त्रीवाद्यांचे विश्लेषण पुन्हा एकदा अधोरेखित झाले होते.' 'माणसे मनाने खचतात की आदर्शावरील श्रद्धा दृढ नसल्याने वाटत राहणाऱ्या अपराधीपणाच्या जाणिवेची भरपाई करण्यासाठी चाकोरी पकडणे सोयीस्कर ठरवतात?'

स्त्रियांच्या प्रश्नांकडे किती अंगांनी पाहण्याची आवश्यकता आहे, आज ज्या कायदे, न्यायालयांचे निकाल, अहवालांतून उपाययोजनांची, शिक्षेची, सुधारणांची चर्चा दिसत आहे ती किती वरवरची असून तिला किती खोलवर नेण्याची आवश्यकता आहे, याची ओळख सदरच्या पुस्तकाने करून दिली आहे.

'तरीही शेषप्रश्न' मांडणाऱ्या, आवाज उठविणाऱ्या, त्यात होरपळणाऱ्या अशा अनेकींचा आवाज हक्काने आपल्यापर्यंत पोहोचविणाऱ्या तरुणी, परकेपणाच्या भावनेला दूर लोटून वाचकांच्या संवेदनेला हात घालून आपलेपण सिद्ध करू पाहत आहेत, त्यांचे प्रातिनिधिक समूहचित्र सतीश भावसार यांनी मुखपृष्ठावर चितारले आहे.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान

## फुलाला सुगंध मातीचा

**डॉ. अनुराधा हरकरे**
**डॉ. अंजली कुलकर्णी**




आपल्या प्रतिभेने, कर्तृत्वाने, ज्ञानाने, खेळाने सर्वार्थाने स्वतःचे जीवन संपन्न, समृद्ध आणि आदर्श करणारे जे रथीमहारथी आज नजरेसमोर दिसतात, त्यांची संख्या प्रचंड नाही परंतु जी आहे ती भूषणावह आहे, असे नक्कीच म्हणता येईल. त्यातले निवडक असे पाच दिग्गज 'फुलाला सुगंध मातीचा' या पुस्तकातून वाचकांच्या भेटीला आलेले आहेत. डॉ. अनिल काकोडकर, अ‍ॅड. डॉ. उज्ज्वल निकम, सचिन तेंडुलकर, मृणाल कुलकर्णी, आणि श्रेया घोषाल हे ते दिग्गज. या सर्वांचे आपापल्या क्षेत्रातले कर्तृत्व निर्विवादपणे मोठे आहे परंतु हे मोठेपण त्यांच्या वाट्याला कसे आले, त्यांच्यावरील संस्काराचा भाग किती महत्त्वाचा होता, यात पालकांची भूमिका कशी होती, कौटुंबिक वातावरणाचा परिणाम किती होता, मिळालेल्या संधीचे सोने त्यांनी कसे केले? या विषयीची जिज्ञासा प्रत्येकाला असते. ती जिज्ञासा पूर्ण करण्यासाठीच हे पुस्तक आलेले आहे, असे समजण्यास हरकत नाही.

'भारतातील शांततामय अणुप्रकल्प व अणुचाचण्यांच्या संदर्भातील निर्णय घेण्यास भारत स्वतंत्र असेल, या मुद्द्यावरील कोणत्याही बाबींवर भारत तडजोड करणार नाही.' असे अणुवनवासातून भारताला मुक्त करताना जगाला ठणकावून सांगणारे डॉ. अनिल काकोडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली जगाला चकवा देत 'ऑपरेशन शक्ती' या नावाने राजस्थानमधील पोखरण येथे गुप्तपणे सन १९९८ मध्ये पाच वेळेस अणुचाचण्या यशस्वीपणे घेण्यात आल्या, आणि जगाला भारताच्या खऱ्या शक्तीची ओळख झाली. भारतातील सर्वात मोठी संशोधनासाठी असलेली अणुभट्टी म्हणजे 'ध्रुव.' संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञान व अत्याधुनिक तांत्रिक कौशल्यावर आधारित असलेला हा अणुउर्जा संशोधन प्रकल्प आहे. या प्रकल्पात डॉ. काकोडकरांचा सिंहाचा वाटा आहे. जगविख्यात नॉटिंगहॅम विद्यापीठात उच्च शिक्षणानंतर तेथेच प्रोफसर व्हावे असा तेथील प्राध्यापकांनी आग्रही सल्ला दिला. परंतु ते देशप्रेमाने परत भारतात आले. यामागे होता स्वातंत्र्यसैनिक मातापित्यांचा स्वदेशीचा संस्कार.

१२ मार्च १९९३ रोजी आणि २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेला मुंबईतील दहशतवादी हल्ला आणि जिवंत पकडण्यात आलेला दहशतवादी कसाब यांना आपण कधीच विस्मृतीत टाकू शकत नाही. या हल्ल्याचा चाललेला खटला आणि त्याची व्यापकता, त्यातून सिद्ध झालेले आरोप आणि शिक्षा, यात लक्षात राहिले ते अ‍ॅड. उज्वल निकम. त्यांनी धैर्याने, जिद्दीने, प्रभावीपणे आणि प्रचंड मेहनतीने हे काम पूर्णत्वास नेले. 'विशेष सरकारी वकील' अशी ख्याती प्राप्त झाली ती यांच खटल्यांच्या यशस्वीतेमुळे. त्यानंतर झालेला खैरलांजी खटला. त्यातही त्यांनी चोखपणे भूमिका बजावल्यामुळे सहा जणांना फाशीची शिक्षा झाली. अ‍ॅड. उज्वल निकम स्पष्टवक्ते, परखड आहेत. परंतु प्रत्येकाच्या अन्यायाला न्याय, दुष्कृत्याला शिक्षा मिळाली पाहिजे या मताचे आहेत. कायद्याबद्दल व सुरक्षिततेबद्दल जनतेच्या मनात आशावाद निर्माण करणे, हीच मोठी कमाई आहे, असे त्यांचे मत आहे. यात आई, वडील, पत्नी, मुले यांच्या प्रेमाचा, संस्कारांचा, वाटाही आहेच.

'स्वामी'तील रमा, 'ग्रेट मराठा'तील अहिल्याबाई होळकर, 'नूरजहाँ'तील हब्बाखातून, मीरा, द्रौपदी अशा अनेक सुंदर आणि तन्मयतेने साकारलेल्या भूमिकांमुळे रसिकांचे मन जिंकणारी मृणाल कुलकर्णी सगळ्यांनाच ठाऊक आहे. देखण्या रूपासोबतच अभिनयाची उत्तम जाण, त्यासाठी भरपूर परिश्रम घेण्याची तयारी, त्यासाठी आवश्यक असणारे आकलन, या जोरावर टीव्ही, सिनेमा या दोन्ही माध्यमात तिने स्वतःचा ठसा उमटवलेला आहे. सुप्रसिद्ध लेखक गो.नी. दांडेकर, वीणा देव यांच्या संस्कारात वाढलेली मृणाल म्हणजे सौंदर्य, शालीनता, संस्कार, क्षमता, आणि बुद्धिमत्ता यांचं अनोखं आणि क्वचित आढळणारं मिश्रण आहे.

'आधुनिक काळातील सर्वोत्कृष्ट खेळाडू' म्हणून क्रिकेटच्या युगातील भीष्माचार्य सर डॉन ब्रॅडमन यांनी गौरवोद्गार काढलेला, 'उत्कृष्ट फलंदाज'व 'सर्वोत्तम व्यक्ती' म्हणून ग्रेग चॅपलने प्रशंसा केलेला, आणि शतकांचे शतक ठोकून स्वतःचे नाव क्रिकेटच्या इतिहासावर कोरणारा सचिन किती ग्रेट आहे, हे सांगण्याची गरज उरलेली नाही. तो नुसताच महान फलंदाज नाही, एक महान व्यक्ती, मित्र, विद्यार्थी, पुत्र, पती आणि पिता देखील आहे. सचिनचे बालपण, शालेय शिक्षण, क्रिकेट खेळणे, त्याचा सराव, त्याचे गुरू, वडील, आई, भाऊ, वहिनी, पत्नी, या सगळ्यांविषयी असलेले कुतूहल, आणि त्यातून दिसणारा सचिन, ही एक आख्यायिका ठरावी, असा प्रकार आहे. साध्या मराठमोळ्या, साहित्यिक घराण्याचा वारसा लाभलेल्या या घरात जगप्रसिद्ध क्रिकेटपटू तयार होतो, हा फक्त नशिबाचा भाग आहे असे अजिबात म्हणता येत नाही. त्यामागे असलेले पाठबळ, संस्कार आणि चिकाटी, मेहनत यांचे ते फळ आहे.

श्रेया घोषाल या आणखी एक मानकरी या पुस्तकात आहेत. त्यांचेही गायनातले यश वादातीत आहे.

या सर्व प्रथितयश व्यक्तींविषयी माहिती मिळविण्यात, तपशील गोळा करण्यात, आणि ते समर्पकपणे मांडण्यात लेखिकांनी प्रचंड मेहनत घेतली असल्याची दिसून येते. केवळ कर्तृत्वावरच भर न देता त्यामागे असलेली पार्श्वभूमी, कुटुंब, संस्कार यांचा मागोवाही घेतला आहे, प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या आहेत. लेखनात क्लिष्टता येणार नाही याची काळजी घेतलेली आहे. स्पष्ट आणि आखीव पद्धतीने व्यक्तिचित्रणे साकार होतील याची काळजी घेतली आहे. त्यामुळे लेखनाला ठाशीवपणा लाभलेला आहे.

रंगीत छायाचित्रे आणि सतीश खनविलकर यांचे सुबक मुखपृष्ठ यांनी पुस्तकाचे सौंदर्य वाढवले आहे.

**मूल्य १६० रु. ● सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**कुसावा**
**उषा परब**




'तरण्याताठ्या बाईनं इधवेचा जिणा जगणा सोप्या नाय. घरातलेच बापे लांडग्यासारखे लाळ घोटीत आसतत. गळ्यात माळा आणि पोटात काळा असणारे घरातच आसतत. परक्याची कागाळी करुक येता. घरातल्याचा कोनाक सांगशील? आपल्याच दाताने जीभ चावली तर तक्रार कोणाकडे करतलंस बाये...'

'कुसवा' हा कोकणी बोलीतील शब्द. कुसवा म्हणजे कूस. आई-मूल यांच्या नात्यातला हळुवारपणा, पावित्र्य, संवेदनशीलता व्यक्त करणारा शब्द. परंतु अलीकडील काळात या शब्दाला कशी कळा लाभत आहे, याचे वर्णन म्हणजे ही कादंबरी. उषा परब यांची ही कादंबरी. कोकणाची पार्श्वभूमी लाभलेली ही कादंबरी केवळ कोकणाचे प्रतिनिधित्व करते असे नाही, ती सर्वच भूभागाचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्याला कारण माणूस हा घटक. तो प्रदेशनिहाय वेगळा भासत असला तरी त्याची प्रवृती समान असते आणि आजचा काळ तर त्यावर अधिकच बोलका झालेला आहे. त्यामुळे या कादंबरीचे समोर येणे ही या 'माणूस प्रवृत्ती'ला स्वतःकडे अंतर्मुख होऊन पाहायला लावणारी घटना आहे, असे म्हणता येईल.

गोदाक्का या व्यक्तिरेखेभोवती ही कांदबरी गुंफलेली आहे. तिचा नवरा जायबा शिकारीच्या धांदलीत गोळी लागून मृत्यू पावतो. त्यावेळी ती तरुण आहे. पोटी दहा वर्षाचा गजा हा मुलगा आहे. आधार म्हणून दीर आणि जाऊ आहेत. तरुणपणात आलेले वैधव्य, त्याचे ओझे पेलीत जीवन कंठण्याचे अवघड आव्हान. गजा मोठा होऊन आधाराला येईल ही वेडी आशा, गजाचे अचानक नाहीसे होऊन मुंबईला जाणे, तेथून परत येऊन गावातच मुक्काम ठोकणे, गावातले त्याचे वेशीवर लक्तरे टांगता येतील असे उद्योग, जातील हेही दिवस म्हणत गोदाक्काचे आशेवरचे जगणे. आणि तिच्या या आशेला बसलेले धक्के, असे हे मुख्य कथानक. साठेलकारीण ही गोदाक्काला सावरणारी, आधार देणारी सखी. अनुभवाचा, समजूतदारपणाचा नमुना. खुळाबाय ही दुसरी व्यक्तिरेखा. कुणाचाही आधार नसलेली तरुणी, भूक-भूक म्हणत गावभर फिरणारी. तिचे जगणे कुत्र्या-मांजरांच्या पंक्तीला जाऊन बसलेले. माणसांच्या संवेदनशीलतेचा पंचनामा करणारी ही व्यक्तिरेखा म्हणावी लागेल. बाबी हॉटेलवाला, संधीचा फायदा कसा उपटावा, याचे प्रतिनिधित्व करणारा गजाचा जोडीदार. तर आपलं आपणच खंबीर असू तर कोण अंगाला हात लावील, याचा आदर्श दाखवणारी नलू. अशा अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आलेल्या आहेत. गावात येणारे विमानतळ, त्यामुळे येणारा पैसा, चंगळ, गावची रीत म्हणून करावयाची पारधी, विधवेचा सोहळा आणि त्यावरील मर्यादा, शेतात काम करताना आडोसा नसल्याने देहधर्मासाठी कष्टकरी स्त्रियांची होणारी कुचंबणा, असा मोठा पट या कादंबरीला लाभलेला आहे.

कादंबरीत ओठावर येतील अशी पारंपारिक गीते आहेत. त्यातून स्त्रीजन्माचा संदेश व्यक्त होत जातो. जशी, 'मायेची ओढ ऽ बळ येत गा पायातऽऽ माय उभी दारातऽ जशी तुळस खळ्यातऽऽ' 'लेकीचा जलम ऽ जलम येऊन चुकलाऽऽ रातदीन बाई ऽ बैल घाण्याला जुंपिलाऽऽ' प्रत्येक प्रकरणाला शीर्षके दिलेली आहेत, ती प्रकरणातील आशय व्यक्त करतील अशी आहेत. त्यांची मांडणी देखील काव्यमय आहेत. जशी, 'इकाच्या पावसा कायी आभाळ उठविलं...' 'लेकी परास मायेची, सून सावली जीवाची...' 'हार गुंफुनी केसा कायी वास घेणारा खरा नायी...'

कथानक गुंफताना गाव, माणसे, चालीरीती यांची वर्णने करून पुढे जाता येते. परंतु तेवढेच पुरेसे नसते. दैनंदिन जगण्यात अनेक अडीअडचणी, वळणे येतात, त्यांच्याकडे बारकाईने पाहावे लागते. लेखिकेची नजर चौफेर आहे. लहान लहान प्रसंगातून संपूर्ण जगणे उभे करण्याची ताकद तिने कमावलेली आहे. मग ते जगणे शेतातले असो, हॉटेलवरचे असो, शिकारीचे असो की खोटे वागणे-बोलण्याचे असो. पटकन सारे चित्र नजरेसमोर उभे राहते. संवादासाठी कोकणी ग्रामीण ढब कायम ठेवलेली आहे, जी ग्रामीण विश्वाचा अविभाज्य भाग आहे. त्यातून माणसांच्या तऱ्हा, कल, मन व्यक्त केलेले आहे. तो गोडवा तिथल्या फळांसारखा मधुर असून संपूर्ण कथानकावर छाप सोडणारा आहे. ग्रामीण भागातील म्हणींचा वापर करीत बोलण्याची, आपल्या बोलण्याला बळकटी देण्याची कलात्मक पद्धत आहे. तिचा लेखिकेने पुरेपूर वापर केलेला आहे. ग्रामीण जीवन कसे बदलत आहे, त्याचा चढता आलेख कथानकाला उंचीवर नेणारा आहे. भडकपणा येऊ शकेल, संताप येऊ शकेल अशा प्रसंगाना संयमाने कसे मांडता येते, हेही लेखिकेने या लेखनातून दाखवून दिलेले आहे. संवादातला प्रवाहीपणा आणि मानवी मनाचा अचूकपणा, ही कादंबरीची बलस्थाने आहेत. त्यामुळे कांदबरी लेखनाचा पहिलाच प्रयत्न असला तरी तो वाचत असताना कुठे जाणवत नाही आणि हेच लेखिकेचे खरे यश आहे. कादंबरी स्त्रीचित्रणाकडे वरवर कल दाखवीत आहे, परंतु आतून ती पुरुषीप्रवृतीवर कोरडे ओढणारी आहे, हे तिचे दुसरे यश आहे

डॉ. तारा भवाळकर यांची कादंबरीचे अंतरंग उलगडून दाखवणारी सुंदर प्रस्तावना या कादंबरीला लाभली आहे. संहितेची मांडणी ते आशय असा व्यापक अभ्यासपूर्ण वेध त्यांनी घेतलेला आहे, जो अभ्यासक आणि संशोधकासही उपयुक्त ठरू शकेल असा विश्वास वाटतो.

सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ रेखाटलेले आहे. चित्रात एखादे झाड उभे रंगवताना त्याच्या मुळांनाही ठळकपणे दाखवावे, तसे गावचित्रण आणि त्याच्या तळाशी असलेली तरुणी मुखपृष्ठावर रंगविलेली आहे. त्यामुळे ग्रामीण जीवन आणि त्यातले स्त्रीजीवन यांना अधोरखित करणारे कथानकच मुखपृष्ठावर साकारल्यासारखे वाटत राहते.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**विमुक्ता**

**तेलगू लेखिका : वोल्गा**

**अनुवाद : वंदना करंबेळकर**




'विमुक्ता' हा कथासंग्रह आहे, तेलगू लेखिका वोल्गा यांचा. सन २०१५ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला. मोजून पाच कथा असलेला लहान चणीचा असावा असा हा कथासंग्रह. त्याचा मराठीत अनुवाद केला आहे वंदना करंबेळकर यांनी. कथा वाचताना लक्षात येते, या पुराणातील स्त्रीव्यक्तिरेखांच्या भोवती गुंफलेल्या कथा आहेत. सर्वसाधारणपणे वाचक म्हणून आपणास ठाऊक असलेल्या व्यक्तिरेखा या कथानकातील घटक म्हणून आढळतात. ज्यांच्याकडे पाहताना आपली दृष्टी देवत्वाचा भास देते. त्यांच्यातला बंध, प्रेम, जगण्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन याबाबत आपण फारसा विचार केलेला नसतो. कारण ही लक्षणे माणसांच्या ठायी असतात. म्हणूनच सहजपणे आपण त्यांच्यावर शिक्का उमटवतो 'नियतीच्या हातची बाहुली' असा. परंतु तसे करणे हे आपण त्यांच्या अंतःकरणात शिरकाव न केल्याची पावती असते, माणूस म्हणून त्यांचा विचार केलेला नसतो, हे या कथा वाचल्यानंतर लक्षात येते. लेखिकेने या व्यक्तिरेखा साकार करताना किती वेगळा विचार केलेला आहे, त्यांच्या किती जवळ जाण्याचा प्रयत्न केलेला आहे, आणि प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतःचे वेगळे वास्तव आहे, ते समजून घेण्याची आवश्यकता आहे, याचा अनुभव लेखिका या कथांमधून देतात.

सीता पुन्हा वनवासात आलेली आहे, रामाने तिचा त्याग केल्यानंतर. वाल्मिकी ऋषीच्या आश्रमात ती राहते आहे. तरी देखील तिचे राम, राज्य यावरील प्रेम कमी झालेले नाही. ते लव कुश यांच्याइतकेच राम, राज्य यावरही आहे परंतु तिचा शूर्पणखेशी येथे परिचय होतो आणि सौंदर्याची वेगळीच ओळख तिला तिच्याकडून होते. रामायण घडले त्याला सीतेइतकीच शूर्पणखा जबाबदार धरली जाते. शूर्पणखा ही सौंदर्यवती आहे. परंतु रामाकडून ती कुरूप केली जाते तेव्हा ती राम, लक्ष्मण आणि सीतेचा प्रचंड द्वेष करू लागते. यात अस्वाभाविक काही नाही. परंतु निसर्गाच्या अपार सौंदर्याने तिला वेगळे बळ दिले आणि पुन्हा ती सौंदर्याची पूजक झाली. सगळे जग तिला सुंदर दिसू लागले. ती स्वतःवर प्रेम करू लागली. ती सीतेची मैत्रीण झाली आणि दोघी एकमेकींना सांगतात, 'जीवनाचे सार्थक म्हणजे काय?'

दुसरी कथा आहे शापित अहल्येची. अनुपम सौंदर्य लाभलेली अहल्या, गौतम ऋषीची पत्नी, इंद्राकडून भूलवून फसवली गेलेली, म्हणून शापित झालेली. तिच्या कथेतून सत्य-असत्य, पवित्रता-अपवित्रता, भ्रष्टता, पापमुक्ती, यासारखे अनेक प्रश्न उपस्थित होतात. महत्त्वाचा प्रश्न आहे तो, तिचे वागणे चूक होते की बरोबर. या वागण्याविषयी ती सीतेला सांगते, 'मी वागले ते चूक की बरोबर, हे ठरविण्याचा अधिकार माझ्याशिवाय इतर कुणालाही कसा असू शकतो?' सीता आणि अहल्या या दोघींच्या संवादातून प्रत्येक स्त्रीने स्वतःला विचारावे असे आणखी एक सार बाहेर पडते, 'तू कोण आहेस आणि तुझ्या आयुष्याचं ध्येय काय?'

तिसरी कथा आहे रेणुकाची. पिता आणि पुत्र यांच्या आज्ञा पालनात बळी ठरलेली रेणुकादेवी. ''पती, पुत्र, हे संबंध स्त्रीसाठी खरंच आवश्यक आहेत? ते आवश्यक न मानता सगळ्यांना सोडून आले.'' हे ती सीतेला सांगताना स्पष्ट करते, ''आमचा पिता कोण'' असा प्रश्न पुत्र विचारतो, आणि ''तुझ्या पुत्राचा पिता कोण?'' असे पती विचारतो, तेव्हा ''स्त्रीची मनःस्थिती काय होत असेल, याची कल्पना करून बघ.'' या आदिम सत्यापुढे सगळेच शब्द, विचार मुके होतात. चौथी कथा आहे उर्मिलेची. लक्ष्मणाची पत्नी, सीतेची बहीण. लक्ष्मण रामासोबत वनवासात गेला, बंधूप्रेम म्हणून. उर्मिला मागे राहिली. तिने स्वतःला कोंडून घेतले, मौन धरले, तब्बल चौदा वर्षे. या कोंडून घेण्याचा, मौनाचा अर्थ काय? ही निद्रा होती, स्वतःचा शोध होता की तपश्चर्या? उर्मिलेच्या मनाचा कुणी विचारच केला नाही. त्या अनुभवातून बाहेर पडलेली उर्मिला स्त्रीच्या जगण्याचे स्वतःचे तत्त्वज्ञान सीतेला समजावते. ''स्वतःचे रक्षण कर, स्वतःवरचा अधिकार स्वतःच्या हातात घे. दुसऱ्यावर अधिकार चालवू नकोस. तर तू, तू राहशील. तू स्वतःची होशील. आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे सोपे नाही.''

या चारही कथा सीतेसोबत साकारलेल्या आहेत. प्रत्येकीच्या वाट्याला आलेले जगणे शापित असावे असे खडतर आहे, त्यातून सीता स्वतःही सुटलेली नाही. स्त्रीचे जीवन महालातले असो वा आश्रमातील; येणारी संकटे, त्याग, भोग सारखेच असू शकतात. त्याचे स्वरूप वेगळे असू शकेल इतकेच. त्या जगण्यातून स्वतःकडे पाहण्याचा, स्वतःचे तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा, नवी दृष्टी लाभल्याचा जो अनुभव माडलेला आहे, तो वाचकालाही स्तिमित करणारा आहे. सीता या कथांच्या मध्यभागी आहे, सूत्रधारासारखी, ती नवे काही अनुभवत जाते, स्वतःच्या निश्चयाकडे येते, हेही यातून प्रत्ययास येते.

शेवटची कथा आहे रामाची. सीतास्वयंवर, सीताहरण, सीतेची अग्निपरीक्षा, सीतेचा त्याग, सीतेने दोन राजपुत्रांना सांभाळणे, या सगळ्या प्रसगांतून दिसणारा राम कसा होता, त्याची मनोवस्था कशी होती, याचे वर्णन या कथेत येते.

कथांचा दर्जा उच्च आहे. त्यांची मांडणी, विचार, तरलता मनाची सहज पकड घेते. त्या कथांचा अनुवाद तितक्याच तरलपणे करण्यात वंदना करंबेळकर यांनीही कुठेही कसर सोडलेली नाही. या कथा अनुवादित नसून मूळ मराठीतीलच आहेत, असाच भास वाचताना होत राहतो. हे अनुवादिकेचे यश म्हणावे लागेल.

सतीश भावसार यांनी कथांना अनुरूप असे मुखपृष्ठ सजवले आहे.

**मूल्य १०० रु. ● सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## यश म्हणजे काय?

**शिल्पा खेर**




'मला भरपूर आनंदी व्हायचं आहे, ही ॲम्बिशन हवी. अशा स्टेप्स स्वतःसाठी ठरवू नका की, मला ५० लाख कमवायचे आहे. एक करोड  कमवायचे आहेत. आहे त्यात आनंदी राहायला शिका. आनंदी मनुष्य नेहमी यशस्वी असतो. स्ट्रेस कमी असेल तर तुमचं काम अधिक सुंदर होतं. जेव्हा आपण तणावात काम करतो, यश दूर राहतं. यशाची गुरुकल्ली ही आहे की, लाईफ शूड बी हॅप्पी, हॅप्पीअर अँड हॅपीइस्ट, हा आनंदाचा ग्राफ कधी खाली येता कामा नये. मग आयुष्य यशस्वीच आहे.'

शिल्पा खेर यांचे 'यश म्हणजे काय?' हे पुस्तक नुकतेच ग्रंथाली आणि बुकगंगा यांनी प्रकाशित केलेले आहे. खरंतर यशाविषयी सांगणारी बरीच पुस्तके सद्या बाजारात आहेत. मग त्यात खेरांचे 'यश म्हणजे काय?' हे पुस्तक यात काय आणि किती भर घालणार आहे, एवढेच त्यातले औत्सुक्य होते. परंतु पुस्तक हातावेगळे केले तेव्हा लक्षात आले, हे पुस्तक सवंग लोकप्रियतेच्या पंक्तीत बसणारे नसून त्याचे स्वतःचे वेगळेपण आहे आणि ते नजरेत भरावे, नव्हे प्रत्येकाने ते वाचावे असे दर्जेदार आहे. आजच्या यशाच्या मागे धावणाऱ्या पिढीसाठी ते प्रेरक ठरावे. एक हे मुलाखतींवर आधारलेले पुस्तक आहे. मुलाखती ज्यांच्या घेतलेल्या आहेत, ती सर्वच मंडळी प्रतिष्ठित, प्रतिथयश प्राप्त केलेली, आपापल्या क्षेत्रात नाव लौकिकाच्या शिखरावर पोहोचलेली आहेत. त्यांचे अनुभव, त्यांचा यशाकडे, जगण्याकडे आणि सामाजिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे, त्यांचा यशापर्यंतचा प्रवास कसा आहे, याचा मागोवा यात घेतलेला आहे. आणि दुसरा आहे लेखनकौशल्याचा. लेखनतंत्र म्हणून मुलाखत तंत्राचा वापर केलेला आहे. परंतु या मुलाखतीना चिकित्सकपणाची जोड दिलेली आहे. मुलाखतीतून व्यक्त झालेल्या विचारांना समजून घेणारा,  विचारांमागची प्रेरणा आणि व्यक्तिमत्त्वाचा मागोवा देखील घेण्याचा सुज्ञ प्रयत्न यात झालेला आहे. या प्रयत्नाला मानसविवेकाची जोड आहे. त्यातून अनुमानाच्या टप्प्यावर चिंतनाचे निश्चित असे विधान आहे. त्यामुळे लेखिकेच्या कसदारपणाचा कस मुलाखत देणाऱ्या व्यक्तिइतकाच प्रभावीपणे नजरेत भरतो. एक सुंदर सुसंवाद वाचकाच्या समोर सुरू आहे, असेच वाचताना वाटत राहते.

लेखिकेने मुलाखतीसाठी निवडलेल्या व्यक्ती या सगळ्यांना आपले आदर्श वाटाव्यात इतके समृद्धपण त्यांच्याकडे आहे. ही निवड आणि त्यांच्याकडून मिळालेल्या मुलाखती, हा वाचकांसाठी मोठा ठेवा म्हणता येईल. डॉ अनिल काकोडकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. प्रेमानंद रामाणी, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. ॲड. उज्ज्वल निकम, श्रीमती मीरा बोरवणकर, श्रीमती अंजली भागवत, रवींद्र प्रभुदेसाई, अविनाश धर्माधिकारी, भरत दाभोळकर, नितीन गडकरी या नावांवरून या विधानाची सत्यता पटावी. या मान्यवराच्या मुलाखतींसाठी लेखिकेने केलेली प्रश्नावली समान आहे. . यश, गुरू, आनंद, आदर्श, सत्यमेव जयते, अंधश्रद्धा, गुन्हेगारी, प्रसिद्धीमाध्यमे, परीक्षेत मिळणारे गुण, आयुष्यातील प्रभावी घटना, पूर्वाश्रमीचे जीवन, इतरांचे मिळालेले योगदान, अशा विधिक विषयांना स्पश केलेला आहे. या विषयांची ही प्रश्नावली समोर ठेवून त्या व्यक्तींचे विचार, त्यांचे अनुभव, त्यांचा दृष्टिकोन, त्यांचे जीवन समजून घेण्यात आले आहे. मुलाखत म्हटली की तिला एकसुरीपणाच्या आरोपाला सामोरे जावे लागते. परंतु तसे इथे टाळलेले आहे. कॉलेज विद्यार्थ्यांचा गट निर्माण करून, प्रोफेसरांसोबत या सर्व घटनांची पार्श्वभूमी निनर्माण केली आहे. आणि शालेय शिक्षणासोबत अशा यशस्वी व्यक्तींना समजून घेणे कसे आवश्यक आहे, ते कसे घेता येईल, आणि समजून घेतल्यानंतर त्याविषयी कसे अनुमानावर येता येईल, असा सुंदर प्रवास लेखिकेने तंत्र म्हणून येथे केलेला आहे. त्यामुळे प्रश्न सारखे असले तरी व्यक्ती भिन्न आहेत, तसे त्यांचे सारेच इतरांहून भिन्न आहे, याचा अनुभव हे पुस्तक देते.

सगळ्यांच मान्यवरांच्या मुलाखती म्हणजे त्यांच्या चरित्राचा हा सक्षिप्त भाग म्हणता येईल. या मान्यवरांनी मुलाखतींच्या ओघात व्यक्त केलेली मते ही अनेकांच्या सुंदर 'कोटेशनांनी' युक्त अशी आहेत. त्यांनी वर्णन केलेल्या घटना तर आपल्या मनाचा ठाव घेतात. एफआरएसच्या वेळी आईन्स्टाईनने सही केलेल्या रजिस्टरमध्ये सही करण्याचा मिळालेला आनंद डॉ. माशेलकरांनी व्यक्त केलेला आहे, तो अवर्णनीय असा आहे. आईन्स्टाईनने स्वतः फिजिक्सचा विद्यार्थी आहे, हे सांगणे नम्रपणाचा कळस गाठते. जे करशील ते असं कर,  इतरांनी त्याची नोंद घेतली पाहिजे, ही डॉ. नरेंद्र जाधव यांच्या  वडिलांची शिकवण कुणालाही नाकारता येणार नाही. आयुष्यात आदर्श घ्यावा अशा व्यक्ती अनेक भेटतात, परंतु स्वतः असे वागा, असा आदर्श निर्माण करा, जो इतरांसाठी आदर्श असेल, असे धर्माधिकारी सांगतात, तेव्हा ती स्वतःसाठी प्रेरणाच असते. 'साब, आप मेरे वकील होते तो..' असे अबू सालेम डॉ. ॲड. उज्वल निकम यांना म्हणतो तेव्हा ती त्यांच्या कठोर कर्तव्याला पावतीच असते.

सतीश भावसारांनी यशाची कल्पना मुखपृष्ठावर साकारली आहे ती आईसबर्गवर उभे राहून जगाकडे पाहणाऱ्या व्यक्तीची. यश किती मोठं असू शकतं आणि प्रत्येकाला ते कसं भावतं, याचा हा सुंदर मिलाफ आहे. वास्तविक या पुस्तकात ज्यांच्या मुलाखती आहेत, त्यांचे फोटो छापून मुखपृष्ठ सजवता आले असते. परंतु त्यात चित्रकाराचे यश दिसणार नाही, हे भान भावसारांनी राखले आहे. आईसबर्ग ठळकपणे नजरेस भरणारा असेल, ही कल्पकता उत्तमच म्हटली पाहिजे.

**मूल्य २५० रु. ● सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**कथा परमवीरचक्र विजेत्यांच्या आणि ऑपरेशन सद्भावना**
**अनुराधा गोरे**




परमवीरचक्र हा सर्वोच्च शौर्य पुरस्कार आहे. २६ जानेवारी १९५० पासून तो प्रदान करण्यात येत आहे. आतापर्यंत एकवीस महारथींना हा सन्मान प्राप्त झालेला आहे. फ्लाईंग ऑफिसर निर्मल जित सिंग सिखॉन हे एअरफोर्सने एकमेव सन्मानार्थी आहेत. उर्वरित वीस सन्मानार्थी सैन्यदलातील आहेत. सैन्यदलातील हा सर्वोच्च सन्मान केवळ युद्धप्रसंगी दिला जातो. धैर्य, प्रेरणा, स्वयंशिस्त, मान सन्मान, कामाप्रती निष्ठा, आपल्या पलटणीची इज्ज़त राखण्याचा केलेला आटोकाट प्रयत्न, उच्च मूल्ये, जिंकण्याची परमोच्च मनीषा, आत्मविश्वास, अशक्य ते शक्य करण्याची दुर्दम्य इच्छा, नेतृत्वगुण, देश, हाताखालची, बरोबरीची माणसे यांवरील पराकोटीचे प्रेम, सैनिकांचे उत्तम चारित्र्य या आणि अशा साऱ्या सद्गुणांचा हा सन्मान असतो.

अशा परमवीरचक्र पुरस्कार सन्मानाचे मानकरी ठरलेल्या एकवीस महारथींचा परिचय, त्यांच्या कामगिरीची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. भारत स्वतंत्र झाला, तरी युद्धांची परंपरा खंडीत झालेली नाही. १९४७-४८ साली पाकिस्तानने काश्मीर आपल्यात सामील करून घेण्याच्या इराद्याने काश्मीरवर आक्रमण केले होते. काश्मीर भारतात विलीन होण्यास कारण ठरलेले हे पहिले युद्ध. प्रचंड थंडी, बर्फ, दुर्गम भाग. तरीही १६००० फुटांवरील झोझिला खिंडीत तोफा चढवण्याचा भीमपराक्रम मेजर जनरल के.एस. थिमय्या यांच्या फौजेने केला. या युद्धात अतुलनीय पराक्रम गाजविल्याबद्दल मेजर सोम नाथ शर्मा, लान्सनायक करमसिंग, सेकंड लेफ्टनन्ट रामा राघोबा राणे, नायक यदुनाथ सिंग आणि कंपनी हवीलदार मेजर पीरू सिंग हे पाच वीर या सर्वोच्च सन्मानाचे मानकरी ठरलेले आहेत. १९६१ मध्ये कांगोच्या मदतीसाठी शांतीसेनेत गेलेल्या कॅ. गुरुबच्चन सिंग सलालिया 'आयो गुरखाली' चा नारा देत आपल्या साऱ्या गुंणांचा परिचय या युद्धात करून दिला. त्यांच्या या धाडसी कृतीने युनायटेड नेशनच्या फौजेला वेढा घालून इतर सैनिकांपासून तोडायचा बंडखोरांचा प्रयत्न फसला. म्हणूनच त्यांना मरणोत्तर परमवीरचक्र प्रदान करण्यात आले.

१९६२ चे भारत-चीन युद्ध ही आपल्या अभिमानावरची भळभळती जखम आहे. या युद्धात भारतीय सैन्याला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. परंतु त्यात आपण पराक्रम गाजविलेला नाही, असे नाही. पराभवाला अनेक कारणे आहेत, परंतु पराक्रमाला कुणाला गालबोट लावू शकले नाही. सुभेदार जागिंदर सिंह, मेजर शैतान सिंह, मेजर धन सिंग थापा, हे या युद्धातील परमवीरचक्र पुरस्काराचे मानकरी ठरलेले आहेत.

१९४७ साली काश्मीर बळकावण्याचा अर्धवट राहिलेला डाव पूर्ण करण्यासाठी पाकने १९६५, साली पुन्हा युद्ध छेडले. सैन्यदलाने जिंकलेले युद्ध आणि मिळविलेला प्रदेश केवळ टेबलावरील चर्चेने हातून गेला, असे हे युद्ध. पाकिस्तानच्या रणगाड्यांचे आणि सेबरजेट विमानांचे अतोनात नुकसान भारताने केले. अतुलनीय पराक्रम करणारे कंपनी क्वार्टर मास्टर हवीलदार अब्दुल हमीद, लेफ्टनंट कर्नल अे.बी.तारापोर, लेफ्टनंट अरुण क्षेत्रपाल यांना परमवीरचक्र प्रदान करण्यात आले. १९७१ ला बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे युद्ध झाले, पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही दिशांना. या युद्धात भारताने पाकचा सर्वच स्तरावर पराभव केला. या युद्धात चार वीरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. १९८७ला सियाचेन -मेघदूत ऑपरेशन झाले त्यात नायब सुभेदार बाणासिंग हे या सन्मानाचे मानकरी ठरले. १९८७-९० या काळात ऑपरेशन पवन झाले. यात मेजर रामस्वामी परमेश्वरन हे मानकरी ठरले. तर १९९९ साली कारगील युद्ध झाले. यात चौघांना हा पुरस्कार प्रापत झाला.

या पुस्तकाची रचना तीन भागात करण्यात आलेली आहे. पहिल्या भागात परमवीरचक्र पुरस्कार प्राप्त शूरवीरांचा परिचय अणि त्यांच्या पराक्रमाविषयी माहिती दिलेली आहे. दुसऱ्या भागात 'ऑपरेशन सदभावना' हा हेतू ठेवून ज्या अनेक संस्था काम करीत आहेत, त्यांच्या कार्याविषयीचे लेख दिलेले आहेत. दहा दहशतवाद्यांना मारणं सोपं आहे. मात्र एखादा दहशतवादी घडूच नये म्हणून प्रयत्न कणे अवघड आहे. तो अवघड प्रयत्न या संस्था करीत आहेत. अशा तेवीस संस्था आहेत. त्यांचे कार्य हे सदभावनेचे आहे तरी ते तितकेच धाडशी आणि खडतर आहे. त्यातून त्या कार्यकर्त्यांच्या चिकाटीचे आणि अथक परिश्रमाचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही.

शेवटचा तिसरा भाग आहे देण्यात येणाऱ्या सन्मान पदकांबाबतचा. युद्ध व शांततेच्या काळात सैनिकांना देण्यात येणारी पदके कोणती आहेत, त्यांचे स्वरूप कसे असते, ती कोणत्या साली देणे सुरू झालेली आहेत, त्यावरील कोरलेला मजकूर कसा असतो, इ. तपशील यात दिलेला आहे.

सदरच्या पुस्तकासाठी अनुराधा गोरे यांनी घेतलेले परिश्रम लक्षात येण्यासारखे आहेत. त्यांनी मिळविलेले संदर्भ, स्थळांना दिलेल्या भेटी, यातून दिलेले तपशील, नकाशे, फोटो यामुळे या पुस्तकाला परिपूर्णता लाभली आहे. प्रत्येक भारतीयास आपल्या परमवीरचक्र पुरस्कार प्राप्त वीरांची माहिती असलीच पाहिजे, इतक्या तन्मयतेने आणि आत्मीयतेने हे लेखन झालेले आहे. 'ओळख सियाचेनची' या पुस्तकाइतकाच हे पुस्तक म्हणजे संदर्भमूल्य असलेला दस्तऐवज आहे.

परमवीरचक्र पदकाची प्रतिकृति, ते प्राप्त करणारा शूरवीर सैनिक, पाठी युद्धाची पार्श्वभूमी आणि तिला दिलेला तिरंगी झेंड्याचा आभास, यामुळे मुखपृष्ठाचा उठावदारपणा थेट आपल्याला येऊन भिडणारा वाटत राहतो. सतीश भावसार यांची ही कल्पना सुंदरच!.

**मूल्य ३५० रु. ● सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## विश्वसंचारी

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**




'ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात मावळत्या उन्हाळ्याचं शेपूट धरून आम्ही तिथे बोटीनं गेलो. त्यावेळी तिथे शिशिराचं नुकतंच आगमन झाल्यामुळे वनश्री आपलं नेसणं बदलत होती. पिवळ्याजर्द किंवा आरक्तवर्णीय पर्णभाराची झाडं नववधूसारखी नटली होती.' 'राजाचं आगमन जसं ढोल पिटून जगजाहीर करण्यात येतं तसं या भव्य धबधब्याचं अस्तित्व त्याच्या गर्जनेनं दुरूनच कळतं.' 'भारतातला एकदेखील राजकारणी अशा बोटीवर तर सोडाच पण मुंबईतल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये कधी बघितला नाही.' 'पृथ्वीच्या पोटातून एक औंस (२८.३ ग्रॅम) सोनं मिळवण्यासाठी १७ टन माती उकरावी लागते.' 'माणसाला सरलतेपेक्षा वक्रतेत, सत्यापेक्षा खोट्यात, उदात्ततेपेक्षा वामकृत्यात आणि आकृतीपेक्षा किकृतीत जास्त रस वाटतो.'

'हे विश्वची माझे घर', असे वचन आपण देवालयात बसलेल्या साधुसंतांच्या मुखातून अनेकदा ऐकलेले आहे. 'दुनिया मेरी मुठ्ठीमे' हेही वचन अलीकडे प्रत्येकाच्या मुखी झालेले आपण गल्लोगल्ली ऐकतो आहोत. परंतु विश्वभर मी संचार केलेला आहे, असे सांगणारा कुणी आपल्या ऐकिवात नव्हता. परंतु

डॉ. अनंत लाभसेटवार हा अनुभव समोर घेऊन आलेले आहेत, 'विश्वसंचारी' या नावाच्या पुस्तकरुपात. हे पुस्तक म्हणजे त्यांनी केलेल्या विश्वटनाचा पुरावा समजण्याची गरज नाही. उलट त्याकडे पाहायचेच झालेतर ते विश्वटनाचे गाईड म्हणावे लागेल. प्रवासात प्रवासाचा आनंद कसा उपभोगायचा त्याचे टॉनिक या गाईडात आहे. ज्यांना कुणाला अशा पर्यटनाची आवड असेल, वा विश्वातल्या कुठल्याही देशाची पर्यटनाच्या दृष्टिकोनातून माहिती मिळवण्याचे कुतूहल असेल, त्यांच्यासाठी वाटाड्या ठरावे, असे हे पुस्तक आहे.

पर्यटन म्हटले की त्या त्या ठिकाणची प्रेक्षणीय स्थळे पाहणे, याला प्राधान्य असते. त्यातले सौंदर्य टिपण्यातला आनंद मोठाच असतो. परंतु सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे त्याचा इतिहास समजून घेण्याचा. तो माहीत असल्याशिवाय त्यातल्या खऱ्या सौंदर्याच्या अंतरंगाचा आनंद नाही घेता येत. डॉ. लाभसेटवार यांनी प्रत्येक देशाचा, तिथल्या प्रत्येक स्थळांचा इतिहास, त्याची संपूर्ण माहिती, तपशील, इतकेच नव्हेतर भूगोल, अशा सगळ्यांचा अभ्यास केलेला दिसून येतो. प्रवासाचे साधन म्हणून विमान, जहाज, बस, कार, घोडागाडी, असा सगळ्यांचा वापर उपयोग केलेला आहे. त्या साधनांनी दिलेला आनंद आणि त्यांच्यातली मौज यांचे तपशीलसुद्धा अनोखे वाटावेत असे आहेत. फोर्ट लॉटरडेल, फ्लोरिडा येथील सव्वादोन लाख टन वजन, ६२९२ उतारूंचा क्षमता आणि सतरा माळे असलेली जगातील सर्वात मोठी आरामबोट-'ओयासिस ऑफ सी' म्हणजे महाबोटच. तिचे वर्णन आणि तिच्यातले राजेशाही वैभव कल्पनेला भूरळ घालणारे आहे. लास व्हेगास या पापनगरीतील एमजीएम ग्रँड हॉटेलाचा अतिभव्यपणा आणि चैन, सुप्रसिद्ध लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे जिथे पाच वर्षे वास्तव्याला होता ते हवाना-क्यूबा येथील अँबोज मुंडोज हॉटेल, दक्षिण ब्राझील व उत्तर अर्जेंटिना यांच्या सरहद्दीवर असलेला २७५ धारांचा इग्वाझू धबधबे, एकेकाळी मधुचंद्राची राजधानी समजला गेलेला नायगारा धबधबा, पश्चिम ग्रँड कॅनियनची महादरी आणि तिच्यावर बांधलेली घोड्याच्या नालीच्या आकाराचा भव्य गोल, इजिप्तची संस्कृती, पिरॅमीड आणि नाईल नदी, व्हिएतनाम आणि नाईक क्रीडा पादत्राणे, रोम आणि ज्युलियस सिझर, नेपोलियन, मुसोलिनी; सोने, सोने शोधण्याची पद्धत, सॅनफ्रान्सिकोचा गोल्डन ग्रेट ब्रिज, लिसबन येथील वास्को-द-गामाच्या वारीचं उगमस्थान, लंडन जवळील शेक्सपिअरचे जन्मस्थान, अशा अगणित स्थळांची माहिती आपल्यासमोर उलगडून ठेवली आहे.

वाचकांच्या सोईसाठी पुस्तकाची भारत, युरोप, आखाती देश, करिबियन समुद्र, दक्षिण अमेरिका, अमेरिका, उत्तर आफ्रिका, आग्नेय आशिया, दक्षिण आफ्रिका, रशिया अशी विभागवार मांडणी केलेली आहे. त्यानुसार त्यात समावेश असलेल्या देशांत केलेल्या पर्यटनाचे वर्णन दिलेले आहे. यात संस्कृती, लोकांच्या आवडीनिवडी, पेहराव, वागणे, वाहतूक, हॉटेल, अतिथ्य, पर्यावरण, निसर्ग, व्यवसाय, युद्धे, मनोरंजन, अशा अनेक स्तरावरील सर्वांगीण अनुभवांचा समावेश आहे. आत अतिशय सुंदर असे स्थळांचे रंगीत फोटो आणि त्या देशांचे नकाशे दिलेले आहेत. विशेष म्हणजे तेथील अनुभव घेताना त्यांची तुलना आपल्या देशाशी केलेली आहे. यात चीन व जपानचा उल्लेख नाही. परंतु या दोन देशांविषयीचे लेखकाचे लेखन अगोदरच प्रकाशित झालेले आहे.

डॉ. लाभसेटवार हे अमेरिकास्थित प्रतिथयश असे लेखक आहेत. कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णन, लेखसंग्रह, अशी त्यांची विपुल ग्रंथसंपदा प्रकाशित झालेली आहे. रसिकमान्यता त्यांना मिळालेली आहे. त्यांची 'विश्वसंचारी' ही गाथा त्याच परंपरेचा प्रवाह पुढे घेऊन जाणारी आहे. त्यांनी प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे ही मोठ्या आकारात असलेली प्रवासातील अनुभवांची गाथा आहे. ही गाथा केवळ लेखकाची न राहता वाचकही तिच्यात आपोआप सहभागी होत जातो. तिच्यातला प्रसन्न ओघवता प्रवाह हा प्रवासातल्या प्रवाहाइतकाच मनोरंजक आणि गुंगवून टाकणारा आहे. उत्कंठा वाढवणारा आहे. परदेशांतील अनुभव हे इंग्रजाळलेल्या शब्दांनी सजलेले नसून अस्सल आपले वाटावेत इतके चपखलपणे आपल्या शब्दांचा साज घेऊन आलेले आहेत. क्रेडीट कार्ड -पतपत्र, उधारपत्र; क्लोजेट-वस्त्रगृह, बार-मद्यागार, शरीरपूजक अल्पवस्त्रधारी, ही त्यातली काही उदाहरणे.

लेखकाने लिहिलेली प्रस्तावना पुस्तकाचे अंतरंग स्पष्ट करणारी आहे. लेखनामागील प्रेरणा आणि प्रस्तावनेचे औचित्य या दृष्टीने ही प्रस्तावना वाचनीय आहे. सतीश भावसार यांनी विश्वसंचार करण्याचे साधन म्हणजे विमान आणि खुला आसमंत यांचा उपयोग करून सुंदर मुखपृष्ठ सजविले आहे.

मूल्य ७०० रु. श्र सवलतीत १८० रु.

## ग्रंथपान

**शब्दकिमया**
**नीला पाटणकर**




'शब्दकिमया' या नावाचे नीला पाटणकरांचे हे पुस्तक म्हणजे शब्दांच्या जादूची गुहा आहे. शब्दकोशांतले शब्द अर्थासह मिळतात. पर्याय शब्दाकोशांतून, समानअर्थी शब्दाकोशांतून अनेक शब्द एका शब्दासाठी उपलब्ध असतात. म्हणींच्या कोशांतून असंख्य म्हणी आपल्याला वाचायला मिळतात. म्हणजेच शब्दांचे भांडार आपणास कोशांतून उपलब्ध होते. त्यांचा उपयोग त्या त्या वेळी चपखलपणे व्हावा म्हणून हे कोश उपलब्ध आहेत. अभ्यासक, संशोधक आणि शब्दांच्या प्रेमात पडलेली माणसे सतत त्यांचा धांडोळा घेत असतात. स्वतः ला समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात. असाच शब्दांच्या संपत्तीने समृद्धपणे असलेला खजिना म्हणजे शब्दकोडे.

वर्तमानपत्रे, नियतकालिके यातून अनेकदा शब्दकोडे छापलेले आपण सतत पाहत आलेले आहोत. त्यांचा आकार लहानमोठा असू शकेल, परंतु त्यांचे महत्त्व कुणाला नाकारता आलेले नाही. अनेक जण अगदी मन लावून ती सोडवताना दिसतात. आपणही कुतूहल म्हणून स्वतः तो प्रयत्न अनेकदा केलेला असतो. त्याकडे काहीजण विरंगुळा म्हणून पाहतात, काहीजण स्वतःच्या क्षमतेचा, आकलनाचा, शब्दभांडाराचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणून त्याकडे पाहतात. खरेतर प्रत्येकाने शब्दकोडे सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. वाहनाला जशी साफसफाईची, इंधनाची गरज असते, तशी स्वतःला ताजेतवाने करण्यासाठी सतत शब्दांच्या सहवासात राहिले पाहिजे.

शब्द काय किमया करू शकतात, हे शब्दकोडे सोडवताना लक्षात येते. शब्दांच्या अंगी किमया करण्याचे, भूलवण्याचे, चकवा देण्याचे, मूळ स्थळी परत आणण्याचे सामर्थ्य आहे. आपली संस्कृती, आपल्या म्हणी, आपले ग्रामीण वाक्यप्रचार, ग्रामीण शब्द, विज्ञान, इतिहास, भूगोल, आपल्या दैनंदिन वापरातले शब्द, इतर भाषांचे सहज बोलण्यात येणारे शब्द, पदव्या, सन्मान, खेळ, सण, चालीरीती, प्राणी, पक्षी, नद्या ... अशा असंख्य घटकांशी जोडलेले शब्द शब्दकोड्यांची सामुग्री असते. ती एकत्रित सापडण्याचे स्थळ म्हणजे शब्दकोडे. शब्दकोड्यांत येणारे सगळे शब्द आपणास ठाऊक आहेत, असा आपला समज असतो. तो समज किती सार्थ आहे, याचा उलगडा होतो तो शब्दकोडे सोडवताना. वरवर सहज वाटणारा शब्द आठवताना घाम फोडतो. तर कधी अतिशय क्लिष्ट वाटणारा शब्द सहज सापडतो. कधी तो लीलया समोर येतो, नाहीतर तिष्ठत ठेवतो प्रियेच्या आगमनासारखा. कधी सहज आनंद देऊन जातो, तर कधी आपलाच द्वेष करायला लावतो. अगदी संपूर्ण सोडवण्याच्या अखेरपर्यंत यावे, आणि एकच शब्द अडून बसतो, तेव्हा सोडवणाऱ्याची अवस्था पक्वान्नात माशी पडावी, तशी झाल्याशिवाय राहात नाही. शब्द नाजूक असतात तितकेच कठोर असतात, शब्द आपले वाटतात कधी परकेपणा दाखवतात. कधी आनंद देतात तर कधी दूर गर्तेत भिरकावून देतात. शब्द जणू आपल्या भावनांशी खेळत असल्यासारखे वाटते. परंतु संपूर्ण कोडे सुटले तर वाटणरा आनंद हा जगज्जेत्यापेक्षा कमी नसतो. हेही सत्य की कोडे सोडवताना आपण कोड्यात सापडलेले असतो, जगाचे भान विसरून.

शब्दकोड्यांकडे आपुलकीने पाहिले पाहिजे. आपले सर्वसामान्यज्ञान किती आहे, याचा आलेख दाखवणारे यंत्र म्हणजे शब्दकोडे. त्याच्याशी मैत्री केली तर आपल्या शब्दांचा गाव आपल्यासोबत सदैव राहील. त्यांची वेगवेगळी रूपे, भाव आनंद देत राहतील. या पुस्तकात शब्दकोडी दिलेली आहेत. रिकामा पट आहे, उभे आडवे शब्द दिलेले आहेत. आणि त्यांची उत्तरे पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहेत. प्रत्येकाने शब्दकोडी सोडवून पाहावीत. नंतर उत्तर तपासून पाहावे. आपण चूक की बरोबर, हे तिथेच शोधून पाहता येईल. इतकेच नाही तर शब्दांचे भांडार, व त्याची किमया काय आहे, त्याचा प्रयत्य आल्याशिवाय राहणार नाही. आपण काही शब्द पाहू, त्यावरून वरील विवेचनाची कल्पना येईल.

पहिले बाजीराव पेशव्यांचे घरगुती नाव : राऊ. रेव असणारी वाळुकामय जमीन : रेताड. खुराक, नियमित येणारा दुधाचा उकडा : रतीब. गुजराती, मारवाडी लोकांत नावापुढे आदरार्थी लावलेली उपाधी : शेट. एक शेंदरी रंगाचा मणी : पोवळे. अक्षरावरच्या उच्चारासाठी मारलेली अर्धाकृती उलटी वेलांटीः रफार. मग्न, गुंग, तल्लीन : रत. विप्र, भटजी, द्विज, ब्राह्मण : भट. हजाम, रजक, नाभिक : न्हावी. दाक्षिणात्य लोकांची आई : अम्मा. वधूने लग्नासमयी पांघरावयाचे वस्त्र, शाल : आडवल.

लेखिकेने शब्दकिमयेसाठी केलेला प्रयास न वाटता तो लांब पल्ल्याचा प्रवास वाटतो. शब्दकोडे तयार करणे सोपे काम नाही. त्यासाठी बुद्धीची तरलता आवश्यक आहे. शब्दांचे इमान शोधण्याची कला आवश्यक आहे. त्यांच्यातली लय, ताल, तोल, अवधान, समन्वय, अचूकता, अक्षरांतला नेमकेपणा आणि त्यांची योग्य अशी सांगड घालण्याची कसरतीसारखी कला आवश्यक आहे. हे सारे लेखिकेने सांभाळले आहे. त्याबरोबर संयमाची आवश्यकता आहे. हे सारे एकत्र आले म्हणूनच हा ग्रंथ आकाराला आला आहे.

सतीश खानविलकर यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. बुद्धिबळाचा पट असावा, तसा शब्दकोड्याचा पट मुखपृष्ठावर दिलेला आहे. बुद्धिबळ आणि शब्दकोडे यांच्यात किती साम्य आहे, हेच यावरून सुचविण्यात आल्यासारखे वाटते.

**मूल्य ३०० रु. ● सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## प्रकाशाचे बेट

**अनुराधा गोरे**




वर आकाश आणि सभोवती अथांग सागर यातून दिशा दाखवण्याचे काम करतो तो किनाऱ्याशी उभा असलेला दीपस्तंभ. त्याप्रमाणे दिशाहीन झालेल्या, भरकटलेल्यांना जीवनाची योग्य दिशा दाखवण्याचे काम करीत आहे युवा परिवर्तन, खेरवाडी सोशल वेलफेअर असोसिएशन. ही संस्था मुंबईतील वांद्रे भागात पूर्वेला स्थित असून स्वतःच्या भव्य आणि प्रशस्त जागेत परिवर्तनाचा मोठा व्याप सांभाळीत सेवाभावीवृत्तीने तरीही सक्षमपणे उभी आहे, 'परिश्रमालय' या नावाला परिश्रमपूर्वक सार्थ करीत. निष्ठा आणि ध्येय याच आचरणातून संस्था उभी राहते तेव्हा तिच्या वयाचा विचार आपोआपच मागे पडतो. परंतु इतिहासाला आपले भान सोडता येत नाही. सदरची संस्था स्थापन झाली तो काळ होता स्वातंत्र्यपूर्व काळ, १९२२, म्हणजे आज २०१७ सालात तिला ९५ वर्षांची परपंरा सागता येईल. परंतु कार्यमग्न कार्यकर्ते आणि संस्थापकांच्या मनात विचार आहे तो केवळ परिवर्तनाचा, अव्याहत कार्य करण्याचा. या संस्थेला आकाराला आणण्याचे श्रेय जाते ते संस्थापक मा. बाळासाहेब खेर यांच्याकडे. मा. बाळासाहेब हे त्यावेळचे मुंबई प्रोव्हिन्सचे प्रिमियर आणि मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री, स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी कार्यकर्ते, म. गांधीचे अनुयायी, समाजसुधारक. त्यांच्यानंतर किशोर खेर आणि मृणालिनी खेर यांनी या कार्याची धुरा हाती घेतली आणि आजच्या आधुनिकतेची जोड देत या संथेचा प्रसार भारतभर करण्यास सुरुवात केली. भारतातील १७ राज्यांतील १३६ जिल्ह्यांत या संस्थेचे कार्य जोमाने सुरू आहे. मोठी शहरे आणि दुर्गमभाग अशा दोन्ही स्तरांवर कार्य सुरू आहे. सुरुवातीच्या काळात काड्यापेट्या व साबणाचे उत्पादन खादी व ग्रामीण उद्योगाच्या साहाय्याने सुरू झाले होते. आज ही प्रगती व्यावसायिक, आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, मॅनेजमेंटपर्यंत पोहोचली आहे. विविध कला-कौशल्यांच्या कोर्सेससाठी 'इन्स्टिट्यूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग अँड आंत्रप्रनरशिप' सुरू केली आहे. सर्व केंद्रातून वायरमन, एअरकंडिशनिंग आणि रेफ्रिजरेशन, मोटर मॅकेनिक, मोटर ड्रायव्हिंग, नर्सिंग-नर्स असिस्टंट, टेलरिंग, एम्ब्रॉयडरी, ब्युटीफिकेशन, एंटरप्रनरशिप, कॉम्प्युटर कोर्सेस, कॉनव्हरसेशनल इंग्लिश, हॉस्पिटॅलिटी, कंस्ट्रक्शन, हेल्थकेअर हे कोर्सेस चालविले जातात. त्याच्यासोबत समुपदेशनाचीही जोड दिलेली आहे. हे समुपदेशन शैक्षणिक, कौटुंबिक, व्यवसाय, विवाहपूर्व आणि विवाहोत्तर, व्यसन-मुक्ती, कुमार -पालक आणि ज्येष्ठ नागरिक, मानसिक आणि शारीरिक आजार अशा विविध पातळ्यांवर केले जाते. त्यामुळे एक परिपूर्ण असे सर्वव्यापी स्वरूप या संस्थेला लाभलेले आहे. सामाजिक भान जपताना आजची युवापिढी अधिक सक्षम कशी होईल, ती आपल्या पायांवर कशी ठामपणे उभी राहील याकडे ही संस्था अधिक आस्थेने पाहाते. वर्षाकाठी एक लाख युवकांपर्यंत ही संस्था पोहोचते, यावरून तिच्या कार्याची व क्षमतेची कल्पना यावी.

'सोच का परिवर्तन - विचार बदला, आचार बदलेल' हा गाभा असलेल्या संस्थेचा परिचय करून दिला सुप्रसिद्ध लेखिका अनुराधा गोरे यांनी. त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेली अनेक पुस्तके आपण वाचलेली आहेत. 'ओळख सियाचेनची' या पुस्तकातून त्यांच्या संशोधनाचा आणि लेखनाच्या कसदारपणाचा प्रत्यय आपणास आलेला आहे. तितक्याच उत्तमपणे त्यांनी 'प्रकाशाचे बेट' या पुस्तकाचे लेखन केलेले आहे. हे लेखन केवळ वर्णनात्मक नाही, संस्थेच्या भरीव कार्याइतकेच मनाच्या गाभ्याला सहजपणे हात घालणारे सुंदर विचारांचे लेखन आहे. एक उदाहरण पहा, ''कोणीतरी, कधीतरी स्वप्न बघितल्याशिवाय ते प्रत्यक्षात येऊ शकत नाही, हे खरं. काहीजण स्वप्न बघायचेच विसरतात. काहीजण बघतात पण त्या स्वप्नांपर्यंत कसं पोहोचायचं हे त्यांना माहीत नसतं. मग होते चिडचिड, रागावणं, द्वेष करणं, भांडण, आततायीपणा करणं. अशा माणसांना हवा असतो थोडा आधार, चार सहानुभूतीचे शब्द आणि सर्वात महत्त्वाचं आपल्या मनावर, डोक्यावर ताबा ठेवत प्रयत्न करत राहण्याची कला. हे ज्याला जमतं तो स्वप्नांपर्यत पाहोचतो.''

पं. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, राजीव गांधी, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. अब्दुल कलाम यांनी संस्थेचा गौरव केलेला आहे, ही माहिती यात आलेली आहे. परंतु याचवेळी ही संस्था जे कार्य करीत आहे, अनेकांना तिचा पुनर्जन्म लाभावा इतका लाभ झाला, यांची काही उदाहरणे दिलेली आहेत. हॉटेल सुरू करण्याचे स्वप्न पाहणारा सलीम, स्वतःच्या पायावर उभा राहू पाहणारा परंतु पोलिसांच्या ताब्यात सापडलेला मोनू, वय २० वर्षे परंतु बुद्ध्यांक १० वर्षाच्या मुलीएवढा असलेली रूपा, स्वतःच्या मालकीचे घर असावे ही आस असलेली श्वेता, घरातल्या वातावरणाने उद्विग्न झालेला हसन, स्वतःच्या भविष्याच्या चिंतेने ग्रासलेला चिमण्या, कुवतीचा विचार न करता भलत्या ध्यासाने गोंधळलेली प्रगती, घरातल्यांनी पुरेसा वेळ न दिल्याने स्वतःवरचा आत्मविश्वास उडालेला अजय, एकाग्रतेचा अभाव असलेला सुयश, लग्नाआधी ठरलेल्या नवऱ्याशी शरीरसंबंध ठेवण्यास नकार दिला म्हणून संपूर्ण कुटुंबाच्या परवडीस कारण ठरलेली रंजना, श्रीमंती आणि सगळ्या चैनी उपलब्ध झाल्याने स्वैर झालेला करण, जन्मदात्याच्या अत्याचाराला बळी पडलेली नयना, भाबड्या वयात भाबड्या समजुतीने ग्रासलेल्या युवती, घरातल्या गरिबीवर मात करू पाहणाऱ्या प्रिया व फैय्याज, लर्निंग डिसॅबिलिटी असलेला दिनू, याप्रमाणे गोलू, लीला, जॉन, सलमा, सुनिता, शांतीप्रिया, आयेशा बेगम अशा अनेकांच्या आयुष्याला प्रकाश दाखविण्याचे कार्य संस्था करीत आहे. ही मोजकीच उदाहरणे आहेत. प्रत्यक्ष संस्थेचा आवाका प्रचंड आहे. यात दिलेले काही रंगीत फोटो संस्थेविषयी बरेच काही सांगून जातात. ही संस्था नसून पथदर्शक कुटुंब आहे असेच म्हणता येईल.

संस्थापक बाळासाहेब खेर यांची प्रतिमा प्रकाशाच्या कोनात दिलेली आहे. तर युवा परिवर्तनाचे प्रतीक असलेली युवापिढी जल्लोशाने नव्या आयुष्याचे स्वागत करीत आहे. सतीश भावसार यांनी ही सुंदर कल्पना मुखपृष्ठावर सजीव केली आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**प्रिय रामू...**

**योगीराज बागूल**



'तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्य नि माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली, तेव्हा मी नशिबाने लादलेला मित्ररहित काळ चिंतेसह कंठित होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या 'रामू'च्या आठवणीत कोरलेले हे प्रतीक.' ही आहे अर्पणपत्रिका, डॉ. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या निधनानंतर 'थॉट्स ऑन पाकिस्तान ऑर पार्टीशन ऑफ इंडिया' या पुस्तकावर लिहिलेली. डॉ. बाबासाहेबाच्या हृदयात रमाबाईंचे स्थान अढळ होते, त्यांच्या त्यागाची त्यांना पूर्ण जाणीव होती, हे यावरून लक्षात होते. आहे त्या परिस्थितीला निष्ठेने सामोरे जात पतिधर्माला जागणे, पतीच्या पाठी खंबीरपणे उभे राहणे ही एक अग्निपरीक्षा असते, त्यातून ज्या तावून सुलाखून सुखरूप बाहेर पडतात, त्याच लौकिकाला पात्र होतात, इतरांकरता प्रेरणास्थान होतात, त्यापैकी माता रमाबाई एक होत.

'प्रिय रामू...' हे योगीराज बागूल यांनी लिहिलेले आणि ग्रंथालीने प्रकाशित केलेले रमाबाईंचे समग्र असे चरित्र. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी अशी आतापर्यंत रमाबाईंची ओळख ज्ञात होती. परंतु 'प्रिय रामू...' या पुस्तकामुळे त्यांच्या संपूर्ण व्यक्तित्वाचा, चरित्राचा आलेख वाचकांसमोर आला आहे. योगीराज बागूल हे सिद्धहस्त लेखक आहेत तसे संशोधनात्मक व चरित्रात्मक लेखन करणारे लेखक म्हणून परिचित आहेत. 'पाचट' हे त्यांचे पहिले पुस्तक आजही आपल्या स्मरणात आहे. 'आठवणीतले बाबासाहेब', आणि 'डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी' ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी संबंधित पुस्तके या आधी प्रकाशित झालेली आहेत. त्यातून बाबासाहेबांच्या कार्याचा, त्या काळाचा, त्या काळातील परिस्थितीचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा पट वाचकासमोर उलगडलेला आहे. रमाबाईचे चरित्र लिहून बागूल यांनी केवळ रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतलेला नाही, तर बाबासाहेबांचे कौटुंबिक आयुष्य, त्यांच्या काळातील कौटुंबिक परिस्थिती, समाजकारण, राजकारण, मुंबई, दारिद्र्य, कष्ट, नातेसंबंध, शिक्षण, माणूसपण असा मोठा पट उलगडून दाखविलेला आहे.

आपणास ज्ञात असलेले डॉ. बाबासाहेब, त्यांचे शिक्षण, समाज–शैक्षणिक कार्य, त्यांचे सत्याग्रह, यामागे त्यांची असलेली तळमळ, त्यासाठीचा खंबीरपणा, झोकून देण्याची तयारी यांचा परिचय आपल्याला या पुस्तकातून होतो. परंतु त्याचवेळी आपलं माणूस म्हणून त्यांची वाटणारी काळजी, त्यांनी सुखरूप असावे म्हणून केलेली काळजी आणि त्यासाठी केलेली धडपड, हे आपल्या गावीही नसते. रमाबाई नावाचे एक बेट या अथांग सागरात आहे, आणि जग कवेत घ्यायला निघालेल्या जहाजाकडे ते आस लावून बसले आहे, त्याची वाट पाहात आहे, हे रमाबाईच्या चरित्रामुळे लक्षात येते. अस्पृश्यांसाठी राखीव जागा या प्रकरणात गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब यांच्यात अटीतटीचा प्रसंग येतो तेव्हा कस्तुरबा इतकीच काळजी रमाबाईंना वाटते, याला सामान्यपण कसे म्हणणार? शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या बाबासाहेबांना स्वतः ला खाण्यापिण्याची भ्रांत असायची, तरी ते कुटुंबाला मदत करीत. परंतु हीच गोष्ट रमाबाईना समजली तेव्हा आपल्या खर्चातून बाबासाहेबांना मदत कशी करता येईल, असा विचार त्या करतात तेव्हा त्यांच्या त्यागाची कल्पना येते. घरात कधीही पूर्ण पोटभर जेवण वाट्याला येत नसे. अर्धा चतकोर खाऊन पाणी पिऊन दिवसभर कष्टाचा गाडा ओढायचा, मुलाबाळांना, कुटुंबाला आधार द्यायचा, अशा परिस्थितीत बाबासाहेबांची काळजी वाहायची, त्यांच्या शिक्षणाच्या आड कुटुंब येऊ द्यायचे नाही, यासाठी लागणारे असामान्य धैर्य केवळ ही माऊलीच दाखवू शकली, हे या चरित्रामुळे समजून येते. किरकोळ देहयष्टी, तीन अपत्यांचा मांडीवर झालेला मृत्यू आणि अपार काबाडकष्ट तरी आपल्या मनाचा समतोलपणा सांभाळला आहे. बाबासाहेबांच्या प्रतिष्ठेला कुठे बाधा येणार नाही म्हणून सतत डोळ्यांत तेल घालून वागणे झाले आहे. जिथे गेल्या तिथे आपलेपणाने वागल्या, स्वतःचे वेगळेपण कुठे दाखवले नाही, हे मोठेपण केवळ रमाबाईनाच शोभून दिसते.

या निमित्ताने कौटुंबिक बाबासाहेबांचाही परिचय होतो. पत्नीला शिकवण्याची धडपड, त्यासाठी शिक्षक नेमणे, मुलांचा अभ्यास घेणे, स्वतःच्या रागावर नियंत्रण ठेवता न येणे, मुलाचा मृत्यू झाला तेव्हा त्याला स्मशानात घेऊन जायचे तर अंगावर घालायला कपडे नाहीत, म्हणून स्मशानात जाणे टाळणे, पत्नीच्या तब्येतीची काळजी, तिला दीर्घायुष्य लाभावे म्हणून स्वतःवर बंधने घालून घेणे, तिला कधीतरी विरंगुळा हवा म्हणून सिनेमा दाखवायला घेऊन जाणे, या सगळ्यांतून वेगळेच डॉ. बाबासाहेब आपल्यासमोर उभे राहतात.

डॉ. बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदार यांनी रमाबाईची केलेली निवड अचूकच म्हणायला हवी. अगोदरच्या दोन मुली पाहून झाल्यानंतरही त्यांनी रमाबाईची निवड केली. एक अनाथ पोर हे एक कारण, परंतु प्रथम दर्शनीच तिचे संस्कारित वागणे, दिसणे, भीमरावसाठी अनुरूप असणे, त्यांनी ओळखले होते. ती निवड किती सार्थ ठरली याचा प्रत्यय त्यांनी बाबासाहेबांना दिलेल्या साथसोबतीतून येतो. अल्पायुषी ठरलेल्या रमाबाई बाबासाहेबांच्या आयुष्याला पोरके करून जातात, तरीही त्या त्यांचे हृदय व्यापून जातात, हे या पुस्तकामुळे कळते. त्या केवळ बाबसाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर कुटुंबाच्या, कुटुंबात आलेल्या प्रत्येकाच्या माता होत्या. एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व बागूल यांनी प्रकाशात आणले असे हमखास म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशात बराच काळ राहिले, तरी त्यांनी आपल्या कुटुंबाची काळजी सतत घेतली आहे. पत्राद्वारे ते रमाबाईशी सतत संवाद करीत. रमाबाईंना ते रामू म्हणत. पत्रावर तसाच उल्लेख असे. तोच मायना मुखपृष्ठावर सतीश भावसार यांनी घेतला आहे. शिवाय बाबासाहेबांचा चष्मा व पेन समोर ठेवले आहेत. त्यामुळे मुखपृष्ठाला एक वेगळाच आशय प्राप्त झाला आहे.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

## मळई

**किसन डगळे**




बऱ्याच कालावधीनंतर दीर्घकथासंग्रह वाचायला मिळाला, तोही ग्रामीण कथांचा. कथा म्हटल्या की त्यांचा आवाका एका व्यक्तिरेखेभोवती वा घटनेभोवती केलेली प्रसंगांची गुंफण, अशी साधी सरळ समजूत. ग्रामीण कथा असतील तर व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांना प्राधान्य असणे, इरसाल, बेरकीपणा, स्वार्थ, घरदारातील कलह, भाऊबंदकी, ग्रामीण राजकारण, चावडीवरच्या गप्पा, कुणाच्या चुलीवर काय शिजत आहे याचा वास घेण्यापर्यंतची मजल, यांचा साधारण यात समावेश असतो. निसर्गवर्णन अभावाने वा मोजक्या शब्दात येणे, हे आतापर्यंतच्या वाचनाच्या सवयीतून अंगवळणी पडलेले समजुतीचे प्रकार. परंतु या समजाला छेद मिळावा असा संग्रह वाचनात आला आणि एक वेगळेच भारावलेलेपण जाणवले. हा भारावून टाकणारा कथा संग्रह आहे किसन डगळे यांनी लिहिलेला 'मळई'.

या संग्रहात सात कथा आहेत. 'राधाई', 'सारजाई', 'मळई', 'कृष्णामामा', 'बाळाराम', 'विशाखा', अशी या कथांची शीर्षके आहेत. त्यावरून लक्षात यावे, या कथा व्यक्तिरेखांभोवती गुंफलेल्या आहेत. 'मळई' ही शेतजमिनी विषयीची कथा आहे. शेताची वाटणी, खरेदी-विक्री, तिची सातबारावर नोंदणी, बैल आणि ट्रॅक्टर यातील फरक, गावातले राजकारण, स्वार्थीपणा, कोर्टकचेरी आणि या सगळ्यात होत जाणारी फरफट, अशी दोन कुटुंबांची कथा आहे. 'राधाई' या कथेत विधवापण आलेल्या राधाईच्या कष्टांचा, गरिबीचा, मुलांचा सांभाळ, पुढे त्यांच्यातील धुसफूस, स्वार्थ यातच स्वतःला मुरवून घेणे आणि शेवटी तिच्या अखेरच्या कार्यासाठी शेत गहाण ठेवावे लागणे, असे विदारक वर्णन आले आहे. 'सारजाई' ही कथा मुलीच्या लग्नाभोवती गुंफलेली आहे. मुलीचे भले व्हावे, तिच्या नशिबी गरिबी येऊ नये, यासाठी तिचा बाप कशी नाती तोडत जातो, प्रत्यक्ष गरीब बहिणीलाही मुलगी देण्याचे नाकारतो, यात मुलीच्या भावनेचा, तिला काय पसंत आहे याचा विचार करीत नाही, अशी ही कथा. 'बाळाराम' या कथेतला बाळाराम अडाणी असूनही स्वतःच्या हिंमतीवर आणि अंगमेहनतीवर गाव सोडून शहरात येतो. एक कांदे व्यापारी शेठच्या मदतीने मोठा व्यापारी होतो. प्रचंड संपत्ती हाती येते. परंतु मूलबाळ नसल्याने दुःखी होतो, शेवटी दुःखातच जातो. 'विशाखा' या कथेतील विशाखा अशीच परिस्थितीची बळी ठरलेली. यात स्वतःचा स्वभाव आणि इतरांवर असलेला भरोसा, यामुळे फरफटत जाते. अशा विशाल पट असलेल्या, ग्रामीण जीवनात रूजलेल्या या कथा आहेत.

'मळई' संग्रह वाचताना प्रामुख्याने जाणवले ते लेखकाने टिपलेल्या सणवार, लग्नविधी, मुलगी पाहण्याचे कार्यक्रम यासारख्या ग्रामीण सांस्कृतिक चालीरितींच्या खुणा व त्यांचे बारकावे. ही आपल्या संस्कृतीची घट्ट वीण आहे, ती पूर्वापार चालत आली आहे, तिला ओलांडून पुढे जाणे शक्य नाही, हेच जणू लेखक अधोरेखित करीत आहे. शेती, बैल, अवजारे ही तर माणसांच्या नात्यांइतकी जीवनाशी नाते सांगणारी जिवलग नातेवाईक मंडळी. त्यांच्याविषयीचा जिव्हाळा, आत्मीयता, ओढ माणसाच्या जीवनातून कधीही दूर होऊ शकणार नाही, याचा प्रत्यय प्रत्येक कथेतून येतो. ही जी जुळलेली नाळ आहे, ती किती अतूट आहे, याचे वर्णन आपल्यालाही खिळवून ठेवणारे आहे. माणसांच्या नात्यात असलेले अनेक भावबंध लेखकाच्या जणू रोमारोमात भिनलेले आहेत. प्रत्येक कथेत त्यांचे वेगवेगळेपण आलेले आहे. या सगळ्यांचा समतोल लेखकाने कुठेही ढळू दिलेला नाही. त्यातून उभ्या राहिलेल्या व्यक्तिरेखा ठसठशीतपणे उभ्या राहिलेल्या आहेत त्या त्यामुळेच. निसर्गाचे वर्णन हे केवळ पार्श्वभूमी रंगविण्यासाठी आलेले नाही, तर ते त्या जीवनाचा एक भाग म्हणून आलेले आहे, हे लेखकाचे खरे कसब. कथा दीर्घ आहेत, त्यांचा आवाका प्रचंड मोठा आहे. प्रत्येक कथेवर स्वतंत्रपणे कादंबरी होऊ शकेल इतक्या त्या दमदार आहेत. परंतु लेखकाने त्यांना कथेच्या रूपातच मांडलेले आहे. यावरून लेखकाच्या लेखनाचा आवाकाही लक्षात येतो. निवेदन पद्धतीने या कथांची मांडणी केलेली आहे. यात आलेल्या पात्रांची संख्या मोठी दिसते ती कुटुंबव्यवस्था व नातेसंबधाने. प्रमुख व्यक्तिरेखा ही कथानक पुढे नेण्याचे कार्य करीत असलीतरी इतर प्रत्येक व्यक्तिरेखा सशक्तपणे मांडलेली आहे. तिच्या अस्तित्वाने कथानकाला वेग तर येतोच परंतु नात्याचे, भावविश्वाचे अधिक पैलू वाचकांच्या समोर येतात. त्यामुळे ही कथा एकाची न राहता अनेकांची होते, तरीही तिचा प्रभाव एकसंध असाच राहतो.

लेखनाला एक प्रवाह आहे. नित्याच्या बोलण्याच्या सवयी, त्यांची ढब, वाक्प्रचार यांचाही बारकाईने उपयोग केलेला आहे. काही ठिकाणी लेखकाने चिंतनही मांडलेले आहे. 'विशाखा' या कथेच्या शेवटी निवेदन येते, 'खऱ्या प्रेमाची पारख करण्यात विशाखा असमर्थ ठरली. याला कारण जी माणसं वरकरणी प्रेम दाखवतात, आपला स्वार्थ जपण्यासाठी गोड गोड बोलतात अशा माणसांच्या भूलथापांना बळी पडून विशाखाने आपले आयुष्य परावलंबी बनविले.' 'सारजाई 'या कथेत सुंदराच्या तोंडी वास्तवाचे भान देणारे सुंदर वाक्य आले आहे, 'मावशी, तुम्ही मला काय गाय, म्हैस समजता की गळ्यात दावं बांधावं आणि लग्नाच्या बाजारात उभं करावं. ज्याला पसंत पडेल त्याला योग्य भावात विकून मोकळं व्हावं.'

एक चांगला दीर्घ कथासंग्रह वाचल्याचा आनंद देणारे हे पुस्तक आहेच, तसे लेखकाकडून अधिक अपेक्षा व्यक्त करणारे हे पुस्तक आहे, असे म्हणता येईल. माधवी कुंटे यांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. लेखकानेही मनोगतात या कथांच्या कथाबीजांविषयी मोकळेपणाने लिहिले आहे.

कथासंग्रहाचे मुखपृष्ठ सजवले आहे, 'ग्रंथाली'च्या संगणक विभागाने. पाहताच क्षणी ग्रामीण भाग नजरेसमोर उभा राहावा असे मुखपृष्ठ. निळा डोंगर, हिरवीगार झाडी, आच्छादलेल्या गवताने सजलेली जमीन, शांत जलाशय आणि त्याच्या काठी विसावलेले टुमदार गाव, अशी ही संकल्पना आहे.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रुपये**




# ग्रंथपान

**मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा...**
**माधव शिरवळकर**




मुंबई ही मायानगरी आहे, मुंबई हे कॉस्मापोलिटन शहर आहे, मुंबई म्हणजे अद्‌भुत नगर आहे, मुंबई महाराष्ट्राची असली तरी ती देशाची आर्थिक राजधानी आहे, वेगवेगळी तरीही सार्थ ठरावी अशी बिरुदावली मुंबई नावाच्या पुढे आपण ऐकत आलो आहोत. तिच्याविषयीचे वर्णन, इतिहास, कुतूहल हे कधीही न शमणारे विषय होत, अनेक पुस्तकांतून तिची ओळख आपल्याला यापूर्वी झालेली असली तरीही. माधव शिरवळकरांचे ग्रंथालीने प्रकाशित केलेले 'मुंबई ब्रिटिशांची होती तेव्हा...' हे पुतक मुंबईविषयी माहिती सांगणारे असले तरी त्याचे वैशिष्ट्ये वेगळे ठरावे, असे हमखास म्हणता येईल.

मुंबईवर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. परंतु ती ब्रिटिशांच्या ताब्यात आली ती हुंडा म्हणून. इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स याचे लग्न पोर्तुगीज राजा जॉन (चौथा) याची मुलगी कथेरीन ब्रिगांझा हिच्याशी ठरले तेव्हा हुंड्याची रीतसर लिखापढी झाली आणि पोर्तुगीज राजाने आख्खी मुंबई हुंडा म्हणून इंग्लडच्या राजाला देऊन टाकली. त्या कराराची तारीख आहे ११ मे १६६१. प्रत्यक्षात तिचा ताबा मिळाला ते १६६२-६३ मध्ये, तोही लढाई करून, हा भाग अलाहिदा. म्हणजे तेव्हापासून मुंबई ब्रिटिशांच्या ताब्यात गेली असे म्हणता येईल. लेखकाने तेव्हापासून मुंबईवर अधिराज्य गाजवणाऱ्या ब्रिटिशांची, त्यांच्या चरित्रांची, वैशिष्ट्यांची, त्यावेळी असलेल्या मुंबईची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे. ही ओळख मोठी मनोरंजक आहे. ती केवळ माहिती वा वर्णनापुरती मर्यादित नाही, तर सोबत संदर्भांची पेरणी करीत, स्वभावांची झलक दाखवीत, अंगच्या गुणवैशिष्ट्यांना स्पर्श करीत आपल्यासमोर सादर केलेली आहे. त्यामुळे मूळ संदर्भ चाळण्याचा मोह झाला नाही तर नवलच. किंबहुना अभ्यासकांसाठी उत्तम साधन म्हणून या संदर्भांचा उपयोग होऊ शकेल.

मुंबईतील सँडहर्स्ट रोड, ग्रँटरोड, एल्फिन्स्टन, हर्निमन सर्कल, विलिंग्डन क्लब, विल्सन-एल्फिन्स्टन कॉलेज, क्रॉफर्ड मार्केट, हाफकिन इंस्टिट्युट अशी अनेक स्थळे, रेल्वेस्टेशने, कॉलेज, बागा, पूल, चौक, रोड, चर्च आजही ब्रिटिश नावांचा मळवट माथ्यावर मिरवीत आहेत. यामागे त्या त्या नावाचा गौरव दिसत असला तरी त्या व्यक्ती तितक्याच कर्तबगार, विद्वान, व्यासंगी, प्रशासक आणि स्वतःचे वेगळेपण दाखविणाऱ्या होत्या, याचा अनुभव हे लेख वाचल्यानंतर येतोच येतो. एशियाटिक सोसायटीत असलेले पुतळे पाहताना प्रश्न पडतो, ही मंडळी इथे काय करीत आहेत अजून, लेखकालाही हा प्रश्न पडला होता, त्याचे उत्तर या पुस्तकातील लेख देतात. सर जॉन माल्कमचा एक पुतळा तेथे आहे. माल्कम स्वतः उत्तम लढवय्या होता. म्हैसूरचा टिपू सुलतान आणि महाराजा होळकर यांच्याशी लढाई करून त्यांना पराभूत करणारा हा सेनानी. परंतु त्याचवेळी तो उत्तम लेखक होता. नऊ पुस्तके त्याच्या नावावर आहेत. फोर्ब्स या अधिकाऱ्याने गुजरातमध्ये पहिले ग्रंथालय सुरू केले. जोनाथन डंकन या विद्वान अधिकाऱ्याने बनारसला संस्कृत विद्यापीठ सुरू केले. स्त्रीभ्रूणहत्या रोखणारा हाच पहिला अधिकारी. १६ वर्षे हा मुंबईचा गव्हर्नर होता. मुंबईत प्लेगने थैमान घातले तेव्हा हाफकिन या शास्त्रज्ञाने प्रतिबंधक लस तयार केली. तिचा पहिला प्रयोग स्वतःवर करून घेणारा असा हा शास्त्रज्ञ. त्याच्या नावाने ही इन्स्टिट्यूट आजही परळ भागात आहे. मुळात हे त्यावेळी गव्हर्नरचे निवासस्थान होते, ही माहिती यातून पुढे आली. मुंबईतील परळ ते कुलाबा दरम्यान १८७४ साली धावलेल्या ट्रामगाड्यांना ओढण्यासाठी घोडे जोडलेले असत. १९०७ ला विजेवर चालणारी ट्राम आली. त्यावेळी बेस्टचा जन्म कसा झाला याची माहिती यात मिळते. सोने, चांदी वाळत घालणारा झुरन पाटील, अब्दुल रहमान नावाचा व्यापारी, अख्खी पवई ज्याच्या मालकीची होती व जो इंग्लडच्या राणीला मुंबईतून आंबे पाठवत असे, ज्याने मुगभाटात पहिली पाण्याची पाईपलाईन टाकली, असा फ्रामजी कासवजी, मुंबई महानगरपालिकेच्या समोर ज्यांचा पुतळा आहे, ते फिरोजशहा मेहता, शेट जगन्नाथ शंकरशेट यांचीही माहिती या पुस्तकात दिलेली आहे. क्रॉफर्ड मार्केट ज्याच्या नावाने ओळखले जाते तो मुंबई पालिकेचा पहिला आयुक्त, हा खरा पोलीस अधिकारी तरी त्याने त्यावेळी मुंबई स्वच्छ करण्याचे मोठे काम केले. एलफिन्स्टन कॉलेज हे माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन तर एलफिन्स्टन रेल्वेस्टेशन हे जॉन एलफिन्स्टनच्या नावे आहे, हा फरक या पुस्तकामुळे लक्षात येतो. मुंबई पालिकेने १८९९ साली ठाण्याला पाणी पुरवठा करण्याचा करार केला होता तो १००० गॅलनला १२ आणे दराने, हा संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे. मुंबईतील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न, अग्निशमन दल, पोलीस दल आणि त्यांचा भ्रष्टाचार, फोर्टची तटबंदी, विलिंग्डन क्लब, खडा पारशी, ब्रिटिशांच्या बायका, गव्हर्नरची मुलगी, अशी बरीच माहिती लेखकाने वाचकांसमोर ठेवलेली आहे.

सदर पुस्तकातील लेखांना स्वतःची मर्यादा आहे. तरी देखील त्यांच्या संदर्भांसाठी लेखकाने घेतलेले संशोधनाचे परिश्रम मोठे आहेत, हे त्यांनी दिलेल्या संदर्भांवरून लक्षात येते. लेखांच्यासोबत फोटो, चित्रे दिलेली आहेत. लेखकाची स्वतःची निवेदन शैलीही तितकीच कसदार आहे. त्यांनी व्यक्त केलेले मनोगत आणि डॉ. शरद काळे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना या पुस्तकाच्या वैभवात भर घालतात. मुंबईची एक मोठी खूण म्हणजे खडा पारशी, जरी आज तो भायखळ्याच्या दोन पुलांच्या पुळणीत उभा आहे, त्याचे अस्तित्व मात्र आजही अधिराज्य गाजवत आहे गतवैभवाइतकेच. त्याचे नाव उच्चारले तरी अख्खी मुंबई नजरेसमोर उभी राहते. मुखपृष्ठकार विश्वनाथ खांदारे यांनी मुखपृष्ठावर नेमकी त्याच पुतळ्याची निवड केली आहे अगदी चपखलपणे. शिवाय गतकालाचा सूचक ठरावा असा रंग पार्श्वभागी निवडला आहे, मुंबईवर स्वतःची मोहर उमटवलेल्या ब्रिटिशांच्या मुद्रा दिलेल्या आहेत. त्यामुळे मुखपृष्ठ आकर्षक आणि शीर्षकाशी साधर्म्य साधणारे झाले आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## रानवीचा माळ

**अभिजित हेगशेट्ये**




'महाराष्ट्र औद्यागिक महामंडळाला औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारी जमीन ताब्यात घेण्यासाठीच्या अधिकाराखाली कलम १९६१ अन्वये २ अ ची भूसंपादनाची नोटीस रानवीच्या माळावरील काही घरात येऊन थडकली आणि एक थंड कळ पठार चिरत थेट दाभोळच्या खाडीत दूरवर पोहोचली. रानवी अणि कातळवाडीच्या माळावर एकच कालवाकालव झाली.' कथानकाची सुरुवात होते ती इथून. १९९१ साली जागतिकीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताचे द्वार मुक्त करण्यात आले. अनेक कंपन्यांनी त्यांना सोयीचा ठरेल असा भूभाग निवडण्यास सुरुवात केली. त्यापैकी बहुचर्चित आणि प्रचंड व्याप असलेली एन्रॉन कंपनी भारतात दाखल झाली. तिने निवडलेला भूभाग म्हणजे दाभोळचा किनारपट्टा, रानवी, कातळवाडीचा माळ. तिच्या आगमनापासून ते तिचे गमन करण्यापर्यंतचा जो लपंडावाचा खेळ खेळला गेला, त्याचे स्मरण करून देणारी कांदबरी म्हणजे 'रानवीचा माळ'. अभिजित हेगशेट्ये या पत्रकाराने या खेळाचा जो प्रत्यक्ष अनुभव पत्रकार म्हणून घेतला, घडलेल्या घटनांना जवळून पाहिले, अनुभवले, त्याचे चित्रण कादंबरीच्या रूपात त्यांनी चितारलेले आहे.

एन्रॉन वीजप्रकल्प रानवीच्या माळावर आकार घेऊ लागला, तशी त्या परिसरात अस्वस्थता पसरली. प्रकल्पात जाणारी जमीन हा कळीचा आणि भावनिक प्रश्न. जयवंत सालीम हा तरुण या प्रकल्पाला विरोध करू पाहतो ते त्याची जमीन ताब्यातून जाणार या भितीतून; पुढे ती परत मिळावी म्हणून त्यासाठी गावकऱ्यांना एकत्रित करणे, त्यांच्या सभा घेणे, मोर्चा काढणे अशा अनेक स्तरावर लढा देत राहतो. गावकरीही त्याला तितक्याच तीव्रतेने साथ देतात. स्थानिक आमदार डॉ. लिमये, पत्रकार तारी आणि मोरे हेही प्रकल्पाविरोधात वातावरण धगधगत ठेवण्याचा प्रयत्न करतात. देशभर या प्रकल्पाला विरोध होतो, त्यात प्रदूषण, टेंडर न मागवता प्रकल्पाला दिलेले आमंत्रण, छुपा व्यवहार अशी अनेक कारणे आहेत. यात वीज मंडळाची भूमिका विरोधाची आहे, त्याला कारण न परवडणारा वीजदर. त्यांची कामगार संघटना लढ्याची भूमिका घेते, ही एक बाजू. तर दुसऱ्या बाजूला प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी मोठ्या तयारीने उतरलेली रिबेका मार्क, केनेथ ही प्रकल्पप्रमुख मंडळी. त्यांनी सर्व अधिकार प्रदान केलेला विशेष अधिकारी, राजीव चाणक्य हे दुसऱ्या बाजूला. आणि या सगळ्याकडे राजकीय भांडवल म्हणून पाहणारी, त्याचा आपापल्या परीने उपयोग करून घेणारी राजकीय यंत्रणा, ही तिसरी बाजू. अशा तीन स्तरावर आपापल्या ताकदीनिशी कसा लढा दिला जातो, याचा संघर्ष या कादंबरीत आहे. उभा राहात असलेला प्रकल्प एका टप्प्यापर्यंत येतो आणि थांबतो, हा विरोधकांचा आंदोलकांचा विजय ठरतो. प्रकरण कोर्टापर्यंत जाते. आणि पुन्हा राजकीय हालचाली सुरू होतात, समुद्राखाली सागर शांत नसतो तशा. आणि पुन्हा त्याला जीवदान मिळते. हे कसे घडले, हा तर या कादंबरीचा कळसबिंदू.

राजकारण म्हणजे काय, हे समजून घ्यायचे तर यातील प्रत्येक राजकीय व्यक्तिरेखेकडे संदर्भ म्हणून पाहता येईल. पक्षनिष्ठा आणि व्यक्ती या एकाचवेळी ऊनसावलीसारखी कशी रूपे बदलतात, त्यांचे वर्णन अतिशय उत्तमपणे आलेले आहे. तीच गोष्ट पत्रकारांची. तेही भूमिकेत कसा बदल करतात, याचेही वर्णन यात आहे. चाणक्य हा कार्पोरेट जगताचा प्रतिनिधी ठरतो. अधिकार आणि हुशारी एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला ऐषोराम यांचे उदाहरण म्हणजे चाणक्य. चाणक्य ही यातली मध्यवर्ती व्यक्तिरेखा असेही म्हणता येईल. आपला अंमल कायम राहील यासाठी तो ज्या ज्या क्लृप्त्या काढतो, प्रसंगानुरूप वागतो, इतरांना वाकायला भाग पाडतो, आणि उंचे लोग उंची पसंद याचा पुरेपूर फायदा घेतो, त्यावरून उच्च पदस्थांच्या प्रतिमा स्पष्ट होतात. असे असले तरी येणारा मानसिक ताण देखील कमी नसतो, याकडेही लेखकाने अवधानाला जागृत ठेवलेले आहे. लढत राहणारी जयवंत सालीम सारखी माणसे अनेक आहेत. ती सरळ, भाबडेपणाने, तळमळीने आपला लढा देत राहतात. तर काही स्थानिक काही प्रलोभनांना बळी पडून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करताना दिसतात. स्वप्ना सावे, अनिता काळसेकर, स्वाती तिच्यासारख्या इतर तरुणींचा वापर, पिल्लेसारखा दलाल याही घटना कार्पोरेट जगताचा एक भाग असतात, ते यातून स्पष्ट होते. परंतु याचवेळी कोकणापासून ते देशापर्यंतचे वातावरण या निमित्ताने कसे होते, कोणकोणत्या प्रकल्पांसाठी कसाकसा विरोध होते गेला, त्यांचे परिणाम काय झाले, कोकणचा इतिहास, संस्कृती काय आहे, येणाऱ्या प्रकल्पाचा आवाका, क्षमता, दूरदृष्टी यांचे स्वरूप स्पष्ट करणारी आकडेवारी, असा व्यापक पट लेखकाने निवडलेला आहे. त्याचे संदर्भ गोळा केलेले आहेत. त्यामुळे ही कादंबरी ललितकृती आणि माहिती अशा दोन स्तरावर आकार घेताना दिसून येते.

अभिजित हेगशेट्ये यांची ही दुसरी कादंबरी. पत्रकार म्हणून असलेला व्यासंग, माणूस समजून घेण्याची समज, घडणाऱ्या घटनांचा अन्वयार्थ जोडण्याची कला आणि लेखनावर असलेले प्रेम यातून ही कादंबरी साकारलेली आहे. त्यामुळे तिच्यातला प्रवाहीपणा, सहजता, डावपेचांचा संघर्ष, व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये आणि कथानकाची गुंफण यांचा सुंदर अविष्कार पाहायला मिळतो. कोकण आणि तिथला निसर्ग ही तर निसर्गाची देणगीच म्हणावी लागेल. परंतु तिच्या अंतरंगात डोकावणारी दृष्टी असावी लागते, ती त्यांच्याकडे असल्याचा प्रत्यय केलेल्या वर्णनातून येतो. एका संघर्षाची गाथा असेच या कादंबरीचे वर्णन करावे लागेल. आणि कुठलाही असा संघर्ष उभा राहील तेव्हा या कादंबरीची आठवण हमखास येईल, इतका प्रभावीपणा तिच्यात सामावलेला आहे.

सतीश भावसार यांनी वीजप्रकल्पाची भट्टी, आक्रोशणारा हात आणि विरोध करणारा माणूस असा एकत्रित परिणाम साधणारे मुखपृष्ठ साकारलेले आहे, जे कादंबरीतील वास्तव स्पष्टपणे साकार करते.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

## पर्यायी मातृत्व

**डॉ. संदीप माने**




१९७८ साली इंग्लंडमध्ये लुई ब्राऊन या पहिल्या टेस्टट्युब बेबीचा जन्म झाला. तेव्हा अनेकांच्या प्रतिक्रिया संमिश्र होत्या. काहींनी स्वागत केले, विज्ञानाचे कौतुक केले, तर काहींनी अचरटपणाखाली त्याची संभावना केली. त्यातून पुढे 'सरोगसी' शब्द आला तो १९८५ साली, जेव्हा पर्यायी गर्भाशयाचा पर्याय यशस्वी झाला. त्यावेळीही प्रतिक्रिया अशीच होती. या दोन्ही शब्दांच्या जन्माने माणसाचा जन्मसिद्ध हक्क आणि त्यापासूनचा आनंद या परंपरिक समजुतींना भूकंपाच्या पातळीवर आणून ठेवल्याची भावना अधिक होती. भुवया उंचावल्या होत्या. कुठल्याही नवीन शोधाबाबत असे घडणे अस्वाभाविक म्हणता येत नाही. टेस्टट्युब बेबीने बाळाच्या जन्मावर शिक्कामोर्तब केले. वंध्यत्वाच्या समस्येला आपल्या आवाक्यात आणले. तर सरोगसीने मातृत्वापासून वंचित असणाऱ्यांना पालकांना आपल्या अपत्याचा आनंद फुलविण्याचे स्वप्न, सत्यात पाहण्याचे आश्वासन दिले. याला विज्ञानाचा चमत्कार म्हणता येईल. अनेक काळ जे असाध्य वाटत होते, ते शक्य असण्याचे आश्वासन दिले ते विज्ञानाने. यात भावनिक, मानसिक गुंतागुंत आहे, हा भाग मान्य केला तरी आज त्याचा स्वीकार करण्यास सर्वांनीच मान्यता दिली आहे, हे वास्तव आहे.

डॉ. संदीप माने हे वंध्यत्वाच्या समस्येचे निवारण करण्यात अग्रभागीअसलेले नाव. प्रजनन औषधोपचार आणि शस्त्रक्रिया सल्लागार, शल्यचिकित्सक अशी त्यांची ख्याती. शिवाय 'ओरिजिन फाऊंडेशन' या संथेमार्फत त्यांचे आरोग्य, शिक्षण आणि कला या संदर्भातील सामाजिक कार्य सुरू आहे. मातृत्व हा निखळ आनंद देणारा अनुभव. अशीही काही दांपत्ये आहेत, जी या आनंदापासून वंचित आहेत. ही वंचित अवस्था विवंचनेपासून संभावनेपर्यंत जाते, स्वतःचा मानसिक-भावनिक कोंडमारा तर होतोच, शिवाय समाजाकडून होणारी अवहेलनाही क्रूर स्वरूपाची दिसून येते. त्यामुळे या वंध्यत्वाच्या समस्येचे स्वरूप उग्र झाल्याशिवाय राहत नाही. त्यातून डॉक्टरांकडे उपचारासाठी होणारी धावपळ, चाचण्या, त्यातून अपेक्षित फळ न मिळाल्यास पदरी येणारी निराशा, वैफल्य, घटस्फोट, दुसरा विवाह या सारखे यातून पुढे येणारे पर्याय. हा साराच जीवघेणा प्रकार ठरतो. परंतु या सगळ्यांवर उपाय उपलब्ध आहे, त्याचे नाव पर्यायी मातृत्व.

स्वतःचे मूल असणे ही प्रत्येकाची इच्छा असते. ते स्वजनुकाचे असणे ही त्यातील प्रबळ इच्छा. परंतु ज्या स्त्रियांना गर्भाशयाशी संबंधित विविध समस्यांमुळे गर्भधारणा शक्य नाही, वैद्यकीय उपचारानंतरही त्याची शक्यता शून्य असल्याचे निष्पन्न होते, अशांसाठी मातृत्वाचा उपलब्ध झालेला पर्याय म्हणजे 'पर्यायी मातृत्व'. सक्षम, सुदृढ आणि सर्व वैद्यकीय चाचण्यांतून सिद्ध ठरलेल्या दुसऱ्या दाता महिलेच्या गर्भाशयाचा उपयोग, हा तो मार्ग. अंडबीज आणि वीर्य यांच्या प्रयोगशाळेतील संयोगाने तयार झालेल्या भ्रूणाची सूक्ष्म नलिकेच्या साहाय्याने महिलेच्या गर्भाशयात स्थापना करणे, ही अवलंबिली जाणारी यातली पद्धती. याद्वारे वंध्यत्वावर मात होतेच, शिवाय आपल्या जनुकाचे आपले बाळ, ही अपेक्षाही पूर्ण होते.

या मातृत्वाच्या संबंधाने असणारे अनेक विषय येतात. वंध्यत्व असण्याची कारणे, ती महिला व पुरुष यांच्यात असणारे प्रमाण, त्याचे भावनिक-सामाजिक-वैवाहिक परिणाम, त्यावरील उपचार व त्यांच्या यशस्वीतेचे प्रमाण, भावी पालक आणि त्यांचा पर्यायी मातृत्वाकडे जाणारा प्रवास, पर्यायी मातेला उपलब्ध असलेले अन्य मार्ग, नि:स्वार्थी आणि व्यापारी स्वरूपाचे पर्यायी मातृत्व अशा विविध पातळीवरील तपशीलवार माहिती या पुस्तकात दिलेली आहे. हा विषय जास्तीत जास्त सोपा करून त्याची मांडणी केलेली आहे. विषयाचे आकलन सहज व्हावे म्हणून सोबत तक्ते दिलेले आहेत. या पद्धतीचा अवलंब ज्यांनी केलेला आहे, अशा अनुभवी माता आणि पालक यांचे अनुभव, यासंबंधीचे नियम व विधेयके, सर्वेक्षण असा संपूर्ण तपशील एकत्रित स्वरूपात दिलेला आहे. ज्या शब्दांना इंग्रजीतच मान्यता आहे आणि बहुतेकांच्या तोंडी तेच शब्द रूळलेले आहेत, अशा शब्दांची व्याख्या व स्पष्टीकरण वाचकांच्या सोयीसाठी पुस्तकाच्या शेवटी दिलेले आहे. या पुस्तकामुळे मूळ विषयाची अचूक माहिती तर मिळतेच, परंतु त्यामुळे या समस्येने व्यथित झालेल्या अनेकांना यापासून दिलासाही मिळण्यास मदत होईल. एका अनुभवसंपन्न तज्ज्ञाचे समग्र मार्गदर्शनच या निमित्ताने उपलब्ध झाले आहे असे म्हणता येईल.

डॉ. माने यांच्या 'सरोगसी : ड्रीम्स कम ट्रू ' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा तरलतेने मराठीत उत्तम अनुवाद केला आहे तो श्याम तारे यांनी. वैद्यकीय क्षेत्रातील जवळपास सगळेच शब्द हे इंग्रजीमधून आहेत. आणि त्यांचा सर्रास वापर सर्वत्र केल जातो. परंतु अनुवादकाने या शब्दांची कुठे अडचण येणार नाही याची काळजी घेत या पुस्तकाचा सोप्या, सरळ, सहज आकलन होईल अशा भाषेत सुंदर अनुवाद केलेला आहे. त्यामुळे वाचत असताना हे मूळ पुस्तक इंग्रजीतून मराठीत आलेले आहे, याचे स्मरण होत नाही. 'पर्यायी मातृत्व' हा सरोगसीला दिलेला पर्यायी शब्ददेखील चपखल म्हणायला हवा.

सदर विषयावर असलेले मराठीतले हे पहिले पुस्तक असावे. यास अनुसरून प्रकाशकाची टिप्पणी पहिल्याच पृष्ठावर दिलेली आहे. तिचेही स्वागत करायला हवे. विषयाला न्याय आणि विज्ञानातील प्रागतिकता यांचा हा आदर म्हणायला हवा. डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांची या पुस्तकाला प्रस्तावना लाभलेली आहे. विज्ञान आणि डॉक्टर यांच्या साहाय्याने मिळणाऱ्या मातृत्वाच्या निखळ आनंदाचे निर्मळ मनाने केलेले कौतुक, अशी ही प्रस्तावना आहे.

पर्यायी मातृत्वाची कल्पना मुखपृष्ठावर उतरविली आहे ती चित्रकार सतीश भावसार यांनी. एका मातेने आपल्या हाताने दुसऱ्या मातेच्या हाती सोपविलेले बाळ, असे हे मुखपृष्ठ. यातून दिसते ती मातृत्वाचे दातृत्व ही संकल्पना! एक देणारा, जो औक्षवंताचे आशीर्वाद औक्षणाने व्यक्त करीत आहे, तर दुसरा ते दान आपलं म्हणून स्वीकारीत आहे. स्वीकारलेल्या हातावर आहे गोंडस बाळ. अशी परिपूर्ण संकल्पना दोन हातांच्या माध्यमांनी साकारली आहे.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रुपये**

# ग्रंथपान

**मुक्या जंगलाची गर्जना**

**अर्जुन व्हटकर**



'मुक्या जंगलाची गर्जना' हा अर्जुन व्हटकर यांचा निसर्गकथांचा संग्रह. वरवर तो जंगलकथांशी नाते सांगत असला तरी जंगल हा निसर्गाचा एक भाग आहे. त्यापलीकडेही निसर्ग आहे आणि त्याचा आवाका झाडी, प्राणी यांच्यापुरताच मर्यादित नाही, याचे भान या कथा देतात. जंगल हे मुके आहे आणि आपण त्याचा हवा तसा ऱ्हास करू शकतो, याविरोधात जंगल आवाज उठवू शकत नाही, वा त्याला आवाजच नसतो, ही माणसाची समजूत किती भाबडी आहे, याचीही जाणीव या कथा प्रकर्षाने करून देतात. माणसाची वृत्ती ही निव्वळ स्वार्थी तर आहेच शिवाय ती विध्वंसक देखील आहे. कुऱ्हाड नावाचे हत्यार बाळगणे त्याला भूषणास्पद वाटत असले तरी तो केवळ जंगल आणि जंगलातील प्राणी-पक्षी यांचा नायनाट करीत नाही तर स्वतःच्याच पायावर ती कुऱ्हाड मारून घेत आहे. सगळ्यात वाईट हे आहे की त्याला स्वतःच्या पायांवर मारलेल्या कुऱ्हाडीची जखम दिसत नाही आणि दिसत असेल तर तिच्याकडे तो डोळेझाक करतो आहे. परिणामी तो सगळ्यांच्याच नाशाला कारणीभूत होत आहे. त्याच्या या वृत्तीविरोधात शेवटी आवाज उठवण्याची वेळ जंगलावर आली आहे. तो आवाज या कथांमधून आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे, पर्यावरणाविषयी असलेल्या सजग जाणिवेतून मृत मनाला जागृत करण्याचे मोठे काम लेखकाने अतिशय कौशल्याने केलेले आहे.

या कथांच्या व्यक्तिरेखा आहेत आंबा-चिंच, मोर-लांडोर, राघू-मैना, कावळा-चिमणी, हवा, पाणी, धरती, प्राणी, पक्षी. या सगळ्यांची कैफियत आहे ती त्यांच्या अस्तित्वाविषयी. निवारा नाही. प्यायला हक्काचे पाणी नाही, हे पाणी माणसाने पळवले, अडवले, जिरवले. झाडांकडे, प्राण्यांकडे, पक्ष्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. त्याविरोधात त्यांनी बोलायला सुरुवात केली आहे. माणसाला त्याच्या कृत्याचा जाब विचारण्यासाठी मोर्चा काढला आहे, निवडणूक लढविली आहे, ससंदेपर्यंत आपले म्हणणे मांडले आहे. यात अपेक्षा आहे ती आमचा हक्काचा सातबारा कोरा झाला आहे. तो परत आमच्या नावावर व्हावा. आमचे जगणे आमचे असावे. या सातबारावरून माणसाने हद्दपार व्हावे.

या कथांची गुंफण लहान-लहान कथांच्या आधारावर केलेली आहे. चिमणीचे घर मेणाचे, कावळ्याचे घर शेणाचे; एक घास चिऊचा, एक घास काऊचा; थुई थुई नाचरे मोरा; वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती; मैना राघूला घाली मुजरा, आंबट चिंचा खाण्याचे गुपित; गंगा शुद्धीकरणाचा देखावा आहे. अनेक गोष्टी, रूपके, कविता, गाणी, यांचा उपयोग यात केलेला आहे. माणसासारखी निवडणूक, जाहीरनामा, पॅनल, मोर्चा, घोषणा, भाषणबाजी, आवेश, सोबतच बाईमाणसाने पुरुषाच्या डाव्या बाजूला बसण्यासारख्या चालीरिती, अनुनय यांचाही या कथांमध्ये पुरेपूर वापर केलेला आहे. त्यामुळे वातावरण जंगल, पाणी, धरणी, प्राणी, पक्षी यांनी भारलेले असले तरी संवाद आणि त्यातला आशय हा माणसांशी नाते सांगणारा आहे. यात आलेला निसर्ग, त्याची विविध रूपे, बदलत गेलेले वातावरण, ऋतूंप्रमाणे होणारे बदल, दुष्काळ, पानगळ, पडझड याकडे लेखकाने बारकाईने पाहिलेले आहे. प्राण्यांचे-पक्ष्यांचे स्वभाव, वागणे, बोलणे आणि माणसाविषयीची चीड यातून कथांचा आशय अलगदपणे उलगडून दाखवण्याचे कसबही लेखकाने ताकदीने पेलले आहे. भारत सासणे यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे.

या कथांना दिलेली शीर्षके हा सुद्धा एक कल्पक आविष्कार म्हणता येईल. 'काऊ-चिऊचं सेमिनार', 'राघू-मैनेचा अभंग', 'जंगलाची संसद', 'हवाबाईचा जाहीरनामा', 'धरणीमायचं सिझर.' यातूनच कथांच्या अंतरंगाची उत्सुकता आणि आशय लक्षात येतो. या निमित्ताने झाडे, प्राणी, पक्षी यांच्या नावांची संपूर्ण यादीही यात वाचायला मिळते.

'जुन्या ताकतीवर वाढलेली पिंपळाची पानं ग्रीष्माच्या उन्हामुळं खाली उतरू लागली.' 'एकेकाळी हिरवागार असणारा मळा रांडवबाईसारखा उदास आणि नापिक झाला.' 'शिवाराचं हिरवं सौंदर्य पाण्यानं नाहीसं केल्यामुळं कुस्तीच्या फडात हारलेल्या पैलवानासारखा खाली मान घालून शिवार गपचीप बसलेला.' 'एका झाडावर घातलेला कुऱ्हाडीचा घाव समद्या सजीवाच्या आयुष्यावर पडलेला घाव असतो.' 'धरणीमाता तांबूस लालसर करड्या रंगाची दुष्काळी साडी नेसली. कित्येक वर्षापासनं हिरवा शालू नेसताच आला न्हायी.' लेखक निसर्गाकडे किती आत्मीयतेने पाहत आहे, त्याची निरीक्षणाची नजर निसर्गाशी किती एकरूप झालेली आहे, तिचा प्रत्यय ही वाक्ये देतात. ही वाक्ये लेखकाने हायब्रीड पिकासारखी मुद्दाम पेरलेली नसून ती त्यांच्या जगण्यातून आलेली आहेत, असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. या कथांची धाटणी जंगलाच्या आक्रोशाशी नाते सांगत असली तरी लेखकाची आंतरिक तगमग त्यातून अधिक प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे. नव्हे ती इशारा देण्यासाठी आलेली दिसते. त्यांच्या मनोगतात ते लिहितात, ''किसानवादी आणि कॉर्पोरेटवादी यांचा शिवणापाण्याचा खेळ चालू आहे. हा संघर्ष शेवटी क्रांतीचे रूप धारण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही क्रांती हवा, पाणी, अन्न यासाठी होईल असे वाटते. सृष्टीचा मूलाधार पाणी आहे. पाणी तर आपण विकत घेतोच; पुढे हवासुद्धा मॉलमध्ये विकत घ्यावी लागेल हे अर्ध्यसत्य आहे.''

मुक्या जंगलाची गर्जना हे शीर्षक चित्रातून व्यक्त करण्याची सुंदर कल्पकता मुखपृष्ठावर दिसून येते. जंगलाच्या दाट अंतरंगातून सिंहाचा गर्जना करणारा जबडा दाखविलेला आहे. ही गर्जना सिंहाची आहे तशी ती या जंगलाची आहे, त्यात पूर्वी निवासाला असलेल्या प्राण्यांची आहे. कारण याच जंगलाचा अर्धा भाग उजाड झालेला दिसत असून जंगलातील प्राणी या उजाड भागात वावरताना दिसत आहेत. हे जंगलाचे उजाडपण नसून माणसाने त्यांच्या माथी मारलेले आहे, याची साक्ष हे मुखपृष्ठ देते. सतीश भावसारांची ही उत्तम कल्पकता म्हणायला हवी.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**हिरजेची हिकरणी आणि चुंगीची पोरं**

**डॉ. भास्कर थोरात**




आत्मचरित्रांची संख्या मराठी साहित्यात बरीच मोठी आहे. त्यातली अनेक आत्मचरित्रेही दर्जेदार म्हणून नावाजली देखील. याच परंपरेत बसावे असे आणखी एक आत्मचरित्र दाखल झाले आहे, त्याचे नाव 'हिरजची हिरकणी आणि चुंगीची पोरं'. डॉ. भास्कर थोरात हे नॅशनल केमिकल लॅबोरटरी आणि इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, येथे संशोधक, शास्त्रज्ञ आणि अधिव्याखाता आहेत. या क्षेत्रातील अनेक संशोधनांसाठी त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाचे हे आत्मचरित्र आहे. डॉ. अनिल काकोडकर, डॉ. नरेंद्र जाधव, प्रा. डॉ. देवानंद शिंदे आणि प्रा. ए.बी. पंडित यांच्यासारख्या मान्यवरांनी या आत्मचरित्राविषयी आपल्या परिप्रेक्ष्यातून लिहिले आहे. राजन खान यांच्यासारख्या साहित्यिक, समीक्षकाने त्याचे मूल्यमापन केलेले आहे.

डॉ. थोरात यांचे संशोधन क्षेत्रातले स्थान अद्वितीय असे आहे. तिथपर्यंतचा त्यांचा प्रवास कसा होत गेला, मिळालेले सहकारी, प्राध्यापक यांनी केलेले साहाय्य, त्यातून घडत गेलेले संशोधन, संशोधन पातळीवर निर्माण झालेली यंत्रसामग्री, तिला मिळालेले पुरस्कार, याविषयी वाचक म्हणून वाटणारे कुतूहल येथे पूर्ण करण्याचा प्रयत्न लेखनात झालेला आहे. परंतु डॉ. थोरात यात स्वतःच्या मोठेपणाकडे पाहताना 'मी, मी, मीच, माझं' असा उदोउदो करीत नाहीत. स्वतःच्या हुशारीचा गर्व नाही. उलट या स्थानापर्यंत प्रवास झाला यात इतरांचा वाटा किती मोठा आहे, हे आवर्जून आणि तितक्याच नम्रपणे सांगतात त्यांची आई, सत्यभामाबाई, हे वेगळेच व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. 'वयाच्या पंचविसाव्या वर्षी मी कुटुंबनियोजनाचे ऑपरेशन केले बाबांना न सांगता. त्यांचा काय संबंध त्याच्याशी?' अशी प्रगत धाडसी आई. शिक्षण, संस्कार, समज, जबाबदारी, प्रेम, आणि दूरदृष्टीचा धाडसीपणा यांचा जणू च्यवनप्राश असलेली ही माऊली, या आत्मचरित्राचा केंद्रबिंदू आहे. आज आपण जे काही आहोत ते या माऊलीच्या संस्काराचे फळ आहे असे डॉ. थोरात सांगतात. वडील अण्णा– नारायण टीसी, हे गावातले पहिले रेल्वे टीसी. कुटुंब, गावाविषयीची आपुलकी असणारे, कडक शिस्तीचे, संतापी, तरी जबाबदारी आणि शिक्षणाची ओढ असलेले. त्यासाठी वाटेल ते परिश्रम घेणारे, मुलांवर विश्वास ठेवणारे. गुरुवर्य शिवा शिवमूर्ती सलवदे, पोवाडे, ओव्या, गाणी यांचा संस्कार देणारे, घडण्यापोषणात आकार देणारे. धाडसी, सतत मदतीला धावून जाणारी आडकेबाई इत्यादींविषयी डॉ. भरभरून बोलताना दिसतात. त्यांच्या गुणांचा, संस्काराचा, मार्गदर्शनाचा प्रभाव आजही मान्य करतात. त्या सगळ्यांविषयीचा मजकूर पाहता, या पुस्तकातील जवळपास निम्मी पृष्ठे त्यांच्यासाठी दिलेली आहेत. ही कृतज्ञता वेगळीच म्हणायला हवी. शाळा, कॉलेज, संस्था येथे भेटलेले मित्र, सहकारी यांच्याविषयी तितक्याच आपुलकीने कृतज्ञता व्यक्त करतात. त्याचबरोबर सामाजिक बदलांचा आढावा घेताना स्वतःचे चिंतनही देतात. त्यामुळे हे डॉ. यांचे आत्मचरित्र आहे त्यापेक्षा आत्मचिंतन आहे, असे प्रा. डॉ. देवानंद शिंदे म्हणतात, त्याची सत्यता पटते. विशेष या प्रवासात अनेक असेही प्रसंग आहेत, जेथे मनावर जखम केलेली आहे. परंतु त्याविषयीचा खेद करण्याऐवजी ते मानसिकता आणि चिंतन यांचा आधार घेतात.

या पुस्तकाचे शीर्षक गमतीशीर वाटते. परंतु त्याला संदर्भ आहे. आई सत्यभामाबाई यांचे माहेर हिरज या गावचे. त्या गावची ही हिरकणी. तर वडील ज्या गावचे ते गाव चुंगी. परंतु ते आजोळी शिंगडगावात ते मोठे झाले. त्या गावात त्यांच्या मुलांची ओळख म्हणजे 'चुंग्याची पोरं'. म्हणून हिरजेची हिरकणी आणि चुंगीची पोरं.

संस्कार करणारे गाव, त्यात असणारी माणसे, आपला भवताल, त्यावेळची सामाजिक स्थिती, चालीरिती यांचाही वेध या लेखनात घेतलेला आहे. विधवेला, तिने पुन्हा विवाह केला असला तरी हळदीकुंकवाला न बोलवणे, लग्नसमारंभाच्या निमित्ताने गावकरी आणि येणाऱ्या वऱ्हाडी मंडळींचे आपसातले सहकार्य, लग्नातले नवरदेवाचे रुसणे, नवरीला उचलून आणणे, वरात काढणे या परंपरा त्यावेळच्या सांकृतिकखुणा ठळकपणे नजरेत भरणाऱ्या आहेत. गाणी, ओव्या, पोवाडे हेही वैभव त्यांना अनुभवता आलेले असल्याने त्यांचा या आत्मचरित्रात समावेश असणे आपसूकच झाले. डॉ. बाबासाहेबांच्या विचारसरणीचा प्रभाव, त्यातून झालेले सामाजिक परिवर्तन यांचे डॉ. भास्कर थोरात वेगळ्या पातळीवर मूल्यमापन करतात, त्याविषयीचे चिंतन करतात, त्यातून त्यांच्य प्रगल्भ सामाजिक जाणिवेची ओळख पटते. एक वेगळेच व्यक्तिमत्त्व उभे राहते. 'वर्ल्ड फोरम फॉर क्रिस्टलायझेशन, फिल्ट्रेशन ॲण्ड ड्रॉईंग'सारखी संस्था स्थापन करून त्यांनी आपल्या हेतूंना जागतिक पातळीवर नेऊन ठेवले आहे. ते म्हणतात, 'ग्लोबलायझेशनच्या या युगात माझे विद्यार्थी, त्यांचे संशोधन कसे ग्लोबल होईल याचा मी सतत विचार करीत असतो.' पुढील पिढी जातपात या पलीकडे विचार करायला शिकेल हा हेतू ठेवून कितीतरी आंतरजातीय विवाह लावून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

उच्चपदस्थ, थोर, व्यासंगी व्यक्तिमत्त्वाला त्याच्याच शब्दात लेखणीबद्ध करणे सोपे काम नाही. त्यातून ते आत्मचरित्र या तंत्रात साकारायचे म्हणजे परकाया प्रवेश करण्यासारखे म्हणावे लागेल. परंतु हे कौशल्य लतिका भानुशाली यांनी दाखविले आहे. आणि हा परकायाप्रवेश कसलेल्या नटासारखा अगदी बरहुकूम वठला आहे.

या पुस्तकाचे मुखपृष्ठ साकारले आहे ते चित्रकार पुंडलिक वझे यांनी. हिरजेची हिरकणी, जी कुटुंबांचा आणि संस्काराचा चंद्र आपल्या कर्तव्यनिष्ठ हातात झेलते आहे, त्याच्या प्रकाशात सारे कुटुंब, तिची लेकरंबाळं उजळून निघाली आहेत. आणि आता ते सगळे मिळून तो चंद्र नव्हे सूर्य हाती पेलण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशी ही कल्पना दिसते.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## ज्वालामुखीच्या तोंडावर

**कुमार केतकर**



''मी एका धगधगत्या ज्वालामुखीच्या टोकावर बसलेली आहे. कोणत्याही क्षणी हा ज्वालामुखी उफाळून स्फोट होईल अन् मी लाव्हारसात फ `कली जाईन, याची मला जाणीव आहे.'' हे आहेत इंदिरा गांधी यांचे उद्गार. त्यांच्या या उद्गारातील वास्तवाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मोठी प्रयोगशाळा आहे ती म्हणजे 'तो काळ'. या प्रयोगशाळेतील राजकारण देशकेंद्री किती होते, व्यक्तिकेंद्री किती होते, त्यातून निघालेले निष्कर्ष आणि अनुमान काय होते, यांचा घेतलेला वेध म्हणजे 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक होय.

इंदिरा गांधी यांनी प्रतंप्रधानपदाची शपथ घेतली ती १९६६साली. तिथपासून त्यांचा झालेला प्रवास हा राजकारणाला स्वतंत्र दिशा देणारा आणि त्याचवेळी राजकारणात स्वतःला केंद्रीभूत ठेवणारा होता, असा हा प्रवास. व्यक्ती म्हणून इंदिरा गांधी या नेहरू घराण्याचा वारसा सांगतात, परंतु त्यांची कारकीर्द त्या वारशाला पुढे नेणारी होती, स्वातंत्र्य चळवळीत सगळ्यांच्या अपेक्षांची पूर्ती करू शकेल असा विश्वास वाटणारा काँग्रेस पक्ष इंदिरा गांधींच्या कालखंडात वृद्धिंगत झाला, नेहरू, शास्त्री यांची भारतवर्षाची स्वप्ने इंदिरा गांधींनी मूर्त स्वरुपात आणली, देशातील स्थिरता आणि शांततेचा पाया समृद्धी आणि सहिष्णुतेच्या मार्गाने खोदला जातो, असे खोदकाम झाले वा खोदकाम करताना जमीन खडकाची लागली, या व अशा अनेक अपेक्षा प्रश्नचिन्हांच्या रांगोळीत स्वतःचे स्थान बळकट करतात, तेव्हा त्यांच्याविषयी निर्माण होते ते कुतूहल. वास्तवाची शिवण उसवून पाहण्याचे कुतूहल. इंदिरा गांधी या व्यक्तिमत्त्वाभोवती विणलेले हे ते कुतूहल अनेक चरित्रकारांना आव्हान वाटावे आणि लेखनासाठी आवाहन करणारे वाटावे, यात आश्चर्य नाही. आश्चर्य आहे ते त्यांनी पार केलेल्या आव्हानाचे. ते आश्चर्य वाटत राहते ते 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक वाचत असताना, आणि वाचून झाल्यावरही.

१९६६ ते १९८४ हा त्यांचा कालखंड, म्हाजे अवघा १८ वर्षांचा. या कालखंडाने पाहिलेले चढउतार हे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच स्तरावरील आहेत. यात एक व्यक्ती म्हणून, देशाची एक पंतप्रधान म्हणून, पक्षाची सदस्य म्हणून इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व का उठून दिसते, त्याचा शोध कुमार केतकर यांनी या पुस्तकात घेतलेला आहे. तोही अतिशय स्पष्ट, निरपेक्ष, कुठलाही एक पक्ष न घेता. ते स्वतःच लिहितात,''स्वतःशी कोणत्याही प्रकारची प्रतारणा न करता हा शोध करायचा, असे मी ठरवले. शोध घेताना उत्तर नसतेच. असते फक्त जिज्ञासा, कुतूहल आणि ज्याचा आपण शोध घेणार, याबाबत उत्कट आकर्षण.''

खरे तर हा एक इतिहास आहे, एका कालखंडाचा. राष्ट्रपती व्ही.व्ही गिरी यांच्या निवडीत झालेले राजकारण, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची परंपरा मोडून केलेल्या नियुक्त्या, भांडवलशाहीचा पुरस्कार करणाऱ्या बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थानिकांचे तनखे बंद, रेल्वेच्या कामगारांचे जाळे हाताशी धरून आव्हान देणारे जॉर्ज फर्नांडीस, सन्याशीवृत्तीत गेलेले जयप्रकाश नारायण यांचे पुन्हा उदयाला आलेले नेतृत्व, गुजरातमधील राजकारण, बिहारमधील विद्यार्थी आंदोलन, पंजाबातील राजकारण, कामगारांचे संप, जमीनदारांचा जुलूम, दुष्काळामुळे अन्नधान्याची टंचाई, बेकारी, गरिबी हटाव, बांगला देशाचे निर्वासित व त्यातून युद्ध, यावेळी आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकारण, चीन–अमेरिका–पाकिस्तान यांचे अडथळे, रशिया–भारत करार, सिमला करार, अलाहाबाद उच्च न्यायालयाचा विरोधी निकाल, घटना दुरुस्ती, अराजक सदृश परिस्थिती, आणीबाणी, जनता दलाची स्थापना, अल्पावधीची सरकारे, धर्माच्या नावाखाली चाललेले व्यवहार, ब्ल्यू स्टार ऑपरेशन, या व अशा अनेक घटनांचे तपशील, त्यामागील राजकारण व इतिहास आणि सगळ्या हिंस्त्रपशूसमान जबडे वासून हल्ला करणाऱ्या वातावरणात केंद्रस्थानी आहेत इंदिरा गांधी. यावेळी ज्या तऱ्हेने सामोऱ्या गेल्या, खंबीरपणे उभ्या राहिल्या, सडेतोडपणे आंतरराष्ट्रीय नेतृत्वाला जबाब देऊ लागल्या. निर्भयपणे युद्धात उभ्या राहिल्या. आपल्या नेतृत्वावर, राजकारणावर, ठाम राहिल्या, न डगमगता प्रत्येक आव्हानाचा सामना केला, पराभवातही खचून न जाता स्वतःचे मार्ग शोधीत राहिल्या. जनतेशी असलेले नाते कायम राखले. या सगळ्या प्रसंगांची यादी अराजक माजविण्यास पूरक ठरली वा त्यातून तसे वातावरण तयार झाले परंतु यात इंदिरा गांधी आपल्या जागी अविचल राहिल्या. पुस्तकाचे वैशिष्ट्य असे की सर्व प्रसंगांचे सन दिलेले आहेत. त्यामुळे प्रसंग आणि काळ यांच्यात विसंगती न येता संदर्भांचे सातत्य कायम राहिले आहे.

कुमार पत्रकार आहेत, त्यांचा अभ्यासाचा, वाचनाचा, लेखनाचा व्यासंग मोठा आहे. देशात घडत असलेल्या घटनांची नोंद ते तीक्ष्ण आणि चिकित्सकपणे घेत असतात. त्याचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना पदोपदी येत राहतो. सदर पुस्तकाच्या शेवटी संदर्भसूची दिलेली आहे. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यासाठी किती परिश्रम घ्यावे लागतात याचा अंदाज या सूचीवरून येतो. त्यांचे लेखन अस्सल पुरावे आणि संदर्भ यांची मेजवानी असते. तिला स्वतःची धारदार अशी लय आहे. सामाजिक जाणिवा, राजकीय विश्लेषण, डाव्या–उजव्याची तुलनात्मक पातळी, विचारांची पक्की बैठक, यामुळे लेखन बंदीश बांधल्यासारखे घट्ट विणीचे झाले आहे. उदा. वाक्यातून कल्पना येईल, 'एका माणसाच्या अश्रू ढाळण्याला रडणं म्हणतात, लाखो लोक रडू लागले की ते आक्रंदन असते. आक्रंदनात क्रांतीचे सामर्थ्य असते, रडण्यात हतबलता.'

मुखपृष्ठ सतीश भावसारांनी सजवलेले आहे. उत्सर्जित होत असलेला ज्वालामुखी, त्यासमोर शक्तिस्थळाची शिळा आणि तिच्यातून दृश्यमान झालेली प्रसन्न, निश्चयाच्या महामेरू असलेल्या इंदिरा गांधी यांची प्रतिमा, हा संगम शीर्षकाची सार्थकता तर दाखवतोच परंतु प्रसन्न प्रारंभापासून प्रस्थानापर्यंतच्या प्रवासाचे प्रतीक म्हणूनही समोर येतो.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




# ग्रंथपान

## गुलाबराव पारनेरकर

**सचिन जगदाळे**




'गुलाबराव पारनेरकर' हे सचिन जगदाळे यांचे पुस्तक वाचताना 'संभूसांच्या चाळीत' या नाटकाची आठवण झाली. चाळ आणि तिचे रहिवासी हे दोन्हीही घटक एका परिघात आपली ओळख निर्माण करतात, त्यांचे आपसातले संबंध, तिथल्या अडीअडचणींवर कसे मात करतात, टोकाचा विरोध आणि तितकाच घनिष्टपणा, प्रत्येकाची तऱ्हा वेगळी तरी प्रसंगी हातात हात गुंफून गुण्यागोविंदाने एकत्र येणार, प्रेम–विरोध, हेवे–दावे, तुलना–मत्सर, ऊन–सावली, काळा–पांढरा, लहान–थोर तरीही आम्ही एक, अशी विविधता अनुभवास देणारे एकमेव ठिकाण म्हणजे चाळ. 'गुलाबराव पारनेरकर' हे पुस्तक त्या पठडीतले म्हणता येईल.

चाळ या संस्कृतीशी नाळ जुळलेली असल्याने त्या संस्कृतीच्या अनुभवांनी झोळी शिगोशिग भरलेली, स्वतःचा पत्रकारितेच्या क्षेत्रातला वावर, त्यामुळे चित्रातले वि–चित्र शोधण्याची कलाही साधलेली, अशा समृद्धीच्या वाटेवर असलेल्यांचा प्रवास सुसाट न झाला तरच नवल. गुलाबराव पारनेरकरांची जन्मकथा लेखकाने त्यांच्या मनोगतात सांगितली आहे, तीही भन्नाटच म्हणायला हवी. असे प्रयोग करण्यासाठी केवळ पत्रकार वा चाळकरी असून चालत नाही, स्वतःकडे प्रतिभाही असावी लागते, आपल्याला जे सांगायचे आहे, त्याचे नेमके भान असवे लागते, तरच गुलाबरावांसारखी व्यक्तिरेखा साकार होऊ शकते, तिच्या भोवतीचे वातावरण साकारले जाऊ शकते. लेखकाकडे प्रतिभा आहे तसे भानही आहे, त्यामुळे गुलाबराव पारनेरकरांची व्यक्तिरेखा साकार झाली आहे.

गुलाबराव पारनेरकर हे चाळीत राहणारे, मिलमध्ये काम करणारे, साधेसरळ आयुष्य जगणारे, पोटाचा मोठा घेर असलेले, सत्तरीतील एक गृहस्थ. झोपेत चालण्याची सवय असलेले. स्वच्छतेची, सहलीची, फिरायला जायची आवड असलेले. आनंदी, परोपकारी, शेजारधर्म पाळणारे. मदतीसाठी धावणारे, मैत्री जपणारे. त्यांची पत्नी सौ. पारनेरकर आणि ते असे दोघेच. मुलगा निधन पावलेला. लहान जागेत संसार नेकीने आणि काटकसरीने करणारे. ते या कथानकातील मध्यवर्ती व्यक्तिमत्त्व. झोपेत चालण्याची सवय त्यामुळे उडणारे गोंधळ, सिनेमात कलाकार म्हणून काम करण्याचे स्वप्न आणि त्यासाठी करायची तयारी, निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या आमदाराची मुलाखत घेण्याची कल्पना, वजन कमी करणे, स्वच्छतेची कल्पना आणि त्यासाठीचे प्रयत्न, गिरणी संप, लग्नाची जबाबदारी, गोव्याची सहल, हनुमंतरावांची मैत्री आणि प्रेमाचा दिवस, अशा मोजक्याच कथानकाशी गुंफण केलेले हे लेखन आहे. या लेखनात केवळ विनोद नाही, तर मार्मिकपणे सामाजिक उणिवांवर बोट ठेवलेले दिसून येते. गिरणी संपाचा हेतू कितीही उदात्त असो, सामान्य माणूस कामापासून दूर राहिला तर त्याच्या होणाऱ्या परवडीचे काय? स्वच्छता केवळ घोषणांनी अंमलात येत नाही, त्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा लागतो. घराचे लहानपण, मर्यादित सोयीसुविधा यात आनंद, सुख, मानावे लागते, परंतु त्याचवेळी उतारवयात आईबापाने मुलासाठी ही जागा सोडून गावी जायचा निर्णय घ्यावा लागतो. सामान्य माणसाला ऐहिक सुखाशी जशी तडजोड करावी लागते, तशी प्रेमाशीही करावी लागते. आपले काही संस्कार आहेत, लग्नकार्याच्या परंपरा आहेत. थोडीशी मिळाली संधी तर तिच्यात मनापासून रममाण होण्याची वृत्ती आहे. चोरून प्रेम करण्याच्या सवयीसोबत स्वतःकडे कमीपणा घेणे आहे, परंतु त्याचवेळी भावनिक गहिवर सुद्धा आहे. प्रेमाचा दिवस, हनुमंतरावांची मैत्री, लग्नाला पन्नास वर्षे झाली, त्यातून आलेले प्रसंग हे भावनेलाच थेट हात घालतात. वय, परकेपण सारे विसरून प्रेम देता येते, आपलेपणा जपता येतो, हेही या लेखनातून प्रत्ययास येते. उपहास, उणीव, प्रेम, मैत्री, गहिवर असा वेगवेगळा अनुभव विनोदाच्या हातात हात घालून आल्याने लेखनाला वेगळे वैभव प्राप्त झाले आहे. गुलाबरांवाच्या सोबत हनुमंतराव, प्रशांत, ठोंबरे, हेलपाटे, पाष्टे, बनसोडे, शिंतोडे, पावडे, पांचाळ, थोरात, या व्यक्तिरेखा आहेत. या वैभवात यांचा वाटा गुलाबरावांइतकाच मोठा आहे.

विनोद हा प्रसंगनिष्ठ, शब्दनिष्ठ आणि व्यक्तिनिष्ठ असा तीन प्रकारात विभागलेला असतो. लेखकाने गुलाबराव साकारताना या तीनही प्रकारांचा उपयोग केलेला असला तरी प्रसंगनिष्ठ विनोदावर अधिक भर दिलेला आहे. त्यामुळे त्यातील सहजता आपोआप लक्षात येते. संवादांच्या माध्यमातून येणारे विनोद त्या त्या व्यक्तिरेखांच्या स्वभावांचा परिचय करून देतात. रात्री सगुणाबाईचा तमाशा पाहण्यामुळे सकाळी शाळेत झोप येणे स्वाभाविक होते. त्या झोपेवरून झालेल्या तमाशाचे वर्णन लेखक करतात, 'शाळेचे हेडमास्तर गुलाबरावांना हातात तुणतुणं देऊन बोर्डावर उभे करायचे बकी राहिले होते.' मित्र पाटकराच्या अंत्ययात्रेचा प्रसंग– 'जोशी वडेवाल्याच्या हॉटेलवर गुलाबराव आणि पाटकर दोन–चार वडाप्लेट विभागून खायचे इथंपर्यंत ठीक होतं, पण पाटकरांच्या तिरडीवर पडणारी फुलंही विभागून आपल्या डोक्यावर पडत असलेली पाहून गुलाबराव थोडे घाबरलेच.' डॉक्टरचा बाप असलेल्याला दिलेले उत्तर, 'थोडी सर्दी होती. तुमच्या चिरंजीवांकडून औषधे घेतली होती. मला जरी बरे वाटले नसले तरी ती औषधे चुकून उंदरांनी खाल्ल्याने उंदीर मात्र मेले हो. सांगा तुमच्या डॉक्टरांना.' एकूण लेखनच निखळ आनंद देत, प्रसन्नपणे वाचकाला सोबत घेते. पुस्तकरूपाने हा पहिलाच प्रयत्न असूनही यात कुठे नवखेपण जाणवत नाही. विनोदाला एक प्रवाहीपणाचा वेग असावा लागतो, तोही उत्तमपणे सांभाळलेला आहे.

लेखकाने वर्णन केल्याप्रमाणे अगदी हुबेहूब गुलाबराव मुखपृष्ठावर साकारलेले दिसतात. त्यांची टोपी, धोतर, सदरा, पुढे आलेला पोटाचा मोठा घेर, पायात चपला, हाताला अडकवलेली छत्री. आणि एक निरागस प्रसन्न मुद्रा, बेरकीपणाच्या जवळ जाणारी. शिवाय आत रेखाचित्रेही दिलेली आहेत, जी अकर्चित्र वाटावीत इतकी उत्तम साधली आहेत. नवरदेवाच्या डोक्यावरची पगडी आणि कपाळावरचे बाशिंग घोड्याच्या डोक्यावर आलेले पाहताना, सगळा प्रसंगच नजरेसमोर उभा राहतो. प्रत्येक रेखाचित्राची खासियत तशीच आहे. महत्त्वाचे म्हणजे सगळ्या चित्रांमध्ये गुलाबराव असून त्यांच्या भावमुद्रा वेगवेगळ्या आहेत, परंतु घेर असलेले टम्म पोट कायम एकसारखेच आहे. निलेश जाधव यांची ही सजावट उत्तमच!

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**




# ग्रंथपान

## दुःखाची स्वगते

**डॉ. संजय कळमकर**



लेखक आणि त्याचे लेखन हे नेहमीच कुतूहलाचे विषय ठरलेले आहेत. लेखक आणि त्याचे लेखन यांचा परस्पर संबंध किती? लेखन हे लेखकाचा अविष्कार आहे, तसे ते त्याचे स्वतःचे अनुभव आहेत का? प्रतिभेच्या जोरावर कल्पिलेले साहित्य असेल तर ते त्याला सुचते कसे? कथाबीज आणि त्यातील व्यक्तिरेखा यांचा उगम कसा, त्यांची लेखकाशी भेट कुठे व कशी झाली, कशी सुचली, असे अनेक प्रश्न साहित्यकृती वाचून झाली की उपस्थित होतात. त्यांच्या जोडीला उपस्थित होते ते लेखकाविषयीचे व्यक्तिगत पातळीवरील कुतूहल. हे कुतूहल शांत होण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्या लेखकाचे चरित्र वा आत्मचरित्र, विशेषांक किंवा त्याचा घेतलेला शोध. अशाच शोधाचे पुस्तक म्हणजे डॉ. संजय कळमकर यांनी लिहिलेले 'दुःखाची स्वगते' हे होय. यात जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास हा मुख्य विषय आहे.

जयवंत दळवी यांनी लिहिलेल्या चौफेर साहित्याची यादी मोठी आहे. त्यांची संख्या पाहता कथासंग्रह पंधरा, कादंबऱ्या बावीस, नाटके सतरा, विनोदी पुस्तके आठ, प्रवासवर्णन एक, एकांकिका संग्रह एक, संकीर्ण सहा अशी ही यादी आहे. यातील प्रत्येक साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास होऊ शकतो. लेखकाने दळवींची 'कादंबरी' हा विषय शोधासाठी निवडलेला आहे. चिकित्सकपणे शोध घ्यायचा तर त्यासाठी काही काटेकोर निकषांची आवश्यकता असते. लेखकाने त्यादृष्टीने केलेला प्रवास नक्कीच कौतुकास्पद आहे. कादंबरी साहित्यप्रकारात कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, निवेदन पद्धती, संवाद, भाषाशैली, हे महत्त्वाचे घटक समजले जातात. या घटकांवर लेखक म्हणून जयवंत दळवी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव किती आहे, त्यांची जडणघडण, त्यांचे निसर्गरम्य कोकणातील वास्तव्य, एकत्र कुटुंब पद्धती, संस्कार, पुरुष-स्त्री संबंध, मानसिकता, आदींचे त्यांच्या साहित्यात उमटलेले प्रतिबिंब, याचा शोध घेणे अपरिहार्य ठरते. या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात 'जयवंत दळवी : व्यक्तिमत्त्व जडणघडण आणि वाङ्मयदर्शन' हा शोध दिलेला आहे. यात स्वतः दळवी यांनी स्वतःविषयी व्यक्त केलेली मते, समीक्षकांनी व्यक्त केलेली मते यांचा समावेश आहे. घरात लेखनाची कुठलीही परंपरा नसलेल्या दळवीनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या मूलस्थानी असणाऱ्या अंगभूत प्रतिभाशक्तीने आपल्या वाटा शोधल्या आहेत, असे अभ्यासातून लेखकाच्या लक्षात येते.

तिसऱ्या प्रकरणात जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचे आशयरूप व आशयसूत्रे यांचा शोध घेतलेला आहे. दळवींची पहिली १९६१ साली प्रकाशित झालेली कादंबरी 'चक्र', त्यानंतर प्रकाशित झालेल्या कादंबऱ्या- 'सारे प्रवासी घडीचे', ' स्वागत', ' महानंदा', 'अथांग', वेडगळ', 'सावल्या', 'प्रवाह', 'धर्मानंद', 'आल्बम', 'अंधांतरी', 'श्रीमंगलमूर्ती आणि कंपनी', 'ऋणानुबंद', 'कहाणी', 'अंधाराच्या पारंब्या', 'कवडसे', 'प्रदक्षिणा', ' अभिनेता', 'सूर्यास्त', 'चक्रव्यूह', 'बाजार', 'कारभाऱ्याच्या शोधात' या होत. पैकी पुस्तक रूपाने प्रकाशित झालेल्या सतरा कादंबऱ्यांचा या शोधासाठी समावेश आहे. मानवी संबंधातील विविधता, निसर्ग, विजोड संसार, वेडेपणा, विफल प्रेम, आजार, लैंगिकता, दारिद्र्य, वैफल्य, नैराश्य, या आशयसूत्रांशी ही कथानके गुंफलेली प्रामुख्याने दिसतात.

चौथ्या प्रकरणात, व्यक्तिचित्रणाचा शोध आहे. दळवींच्या कादंबऱ्या या बहुतेक व्यक्तिप्रधान आहेत. त्यांची तीन प्रकारात विभागणी केलेली आहे. त्यांचा अंतर्मुख व बहिर्मुख अशा दोन अंगांनी शोध घेतलेला आहे. शिवा ओटवणे, दिगंबर, धर्मानंद, लुका, अप्पाजी, मंजुनाथ, बेन्वा, प्रकाश, कल्याणी, शिवनाथची आई, जनाई, अपर्णा या सगळ्यांचे वैशिष्ट्ये, परस्परसंबंध, त्यांची मानसिकता, यांचा शोध वरील निकषांनुसार घेतलेला आहे. नातेसंबंध आणि देहधर्म, व्यक्तिरेखांचा मनोविश्लेषणावादी भूमिकेतून विचार, कादंबऱ्यांची भाषा, यासाठी स्वतंत्र प्रकरणे दिलेली आहेत. विशेष म्हणजे या प्रत्येक कादंबरीमध्ये आलेले वाक्प्रचार, सुभाषिते, उपमा, परभाषिक शब्द, हिंदी शब्द, कोकणी शब्द, शिव्या, ध्वनिमयता यांचीही नोंद लेखकाने घेतलेली आहे. शेवटच्या प्रकरणात लेखकाने 'जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचा विवेचक अभ्यास' याविषयी आपली निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

डॉ. संजय कळमकर यांनी घेतलेला व्यापक पट आणि त्यासाठी केलेला अभ्यास, याचे कौतुक वाटते. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्यांनी दिलेली संदर्भग्रंथांची सूची पाहिली तरी त्यांच्या अभ्यासाची व्यापकता लक्षात यावी, परंतु तितकेच नाही, त्यांनी केलेली प्रत्येक प्रकरणाची मांडणी आणि त्यानुसार केलेले विवेचन, यातून अनुमानापर्यंत जाणारा प्रवास, हा त्यांच्या चिकित्सक चिंतनाचा अनुभव देणारा अभ्यास आहे, याची खात्री पटते. विषय प्रबंधाचा आहे, तरी तो स्वकेंद्री नाही. कुणाही वाचकाला, अभ्यासकाला तो सहज आकलन होणारा, आपला वाटावा, वाचून झाल्यानंतर समाधानाची तृप्त भावना मनावर रेंगाळत ठेवणारा, असा एक सुंदर प्रवास आहे. एखाद्या लेखकाच्या साहित्याचा शोध घेण्याचा राजमार्ग कसा असतो, याचे उत्तम उदाहरण म्हणून या प्रबंधाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. त्यातून जयवंत दळवी यांच्यासारख्या बहुआयामी सिद्धहस्त लेखकाचे मूल्यमापन करणे म्हणजे समुद्राच्या तळाचा शोध घेण्यासारखे महत्प्रयासाचे प्रयत्न म्हणावे लागतील. डॉ. कळमकर यांनी या तळाला गवसणी घातली आहे. त्यामुळे जयवंत दळवी यांच्या साहित्याचा शोध घेऊ पाहणाऱ्या अभ्यासकांसाठी ते या सागरावरील दीपस्तंभ आहेत.

मुखपृष्ठासाठी जयवंत दळवींची चिंतनगर्भमुद्रा निवडलेली आहे आणि उरलेले अवकाश व्यापले आहे ते त्यांच्या साहित्यकृतींच्या नामावलीने. हा सुरेख समन्वय साकारला आहे राजेंद्र ठाणगे यांनी जो शीर्षक आणि आशय यांचे प्रतिबिंब वाटावा.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २२० रु.**

# ग्रंथपान

## शहरातला प्रत्येक

**सुजाता महाजन**




सुजाता महाजन यांचे ‘शहरातला प्रत्येक’ या नावाचे ‘ग्रंथाली’ने प्रकाशित केलेले हे पुस्तक आहे. या पुस्तकाला कथासंग्रह म्हणायचे की कादंबरी, असा प्रश्न पुस्तक वाचत असताना उपस्थित झाला. कथासंग्रह म्हटला तर त्यातील प्रत्येक कथा स्वतंत्र अनुभवाचे अस्तित्व घेऊन आलेली असते. कादंबरी म्हटली तर तिचा एक आकृतिबंध असतो, तिच्यातील व्यक्तिरेखा एका सुत्राशी बांधलेल्या असतात. ही आपली ढोबळ कल्पना. परंतु अलीकडे लेखनाचे तंत्र, आशय, आकृतीबंध यासारख्या पारंपरिक सुत्रांना छेद देत नवनवे प्रयोग करीत साहित्य वाचकांच्या समोर येत आहे. त्यामुळे चाकोरीबद्ध सुत्राशी नाते सांगणाऱ्या वाचकांवर अशा स्वरूपाच्या प्रश्नांना सामोर जाण्याचा प्रसंग येतो. प्रस्तुत पुस्तकाने तो प्रसंग आणला हे खरे.

कारखाने, कार्यालये, उद्योग, शाळा, म हाविद्यालये, इमारती, न्यायालय, दवाखाने, वाहने, बागा, रस्ते, अशा अनेक घटकांना आपल्या कवेत घेऊन विस्तारत गेलेल्या शहराचे रूप ‘अफाट’ या शब्दाशी विराम पावते. त्याचे स्वतःचे कायदे, नियम, शिस्त, अपेक्षा आहेत, ज्या त्याच्या व्यवहाराशी निगडित असतात. त्यांचे पालन करण्याची जबाबदारी असते ती माणसावर. त्यामुळे या सगळ्यांच्या मुळाशी असतो तो माणूस. ज्याला हे शहर आपल्या तालावर खेळवत असते, असे म्हटले तर वावगे ठरू नये. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, उच्च-नीच, जातपात, हे मानवाने कल्पिलेले वर्ग शहराच्या दृष्टीने बेदखल असतात कारण इथे अंमल असतो तो शहराचा. या शहरातला प्रत्येक हा वेगवेगळा असूनही तो शहराचाच एक भाग असल्याने त्याचे वेगळेपण स्वतःचे न राहता ते या शहराचे होते. त्यामुळे या शहरातील माणसांच्या कथा जरी या माणसांच्या कथा आहेत असे म्हटले, तरी त्यांचा नायक आहे ते शहर. या शहराने या सगळ्यांना आपल्या सूत्राशी जोडून घेतले आहे. त्यामुळे ही माणसांची कथा न म्हणता ही शहराची कथा आहे. परंतु तिचा पट आणि आवाका पाहता तिला कथा म्हणणे अन्यायकारक ठरेल. ही आहे शहराची कादंबरी.

‘शहरातला प्रत्येक’ हा ठळकपणे नजरेत भरावा असा ‘प्रत्येक’ आहे. यात आलेल्या व्यक्तिरेखांना स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे. स्वतःचे गुणधर्म आहेत. त्यांच्यात विविधता आहे. त्यांचे वागणे, बोलणे, त्यांचे व्यवहार हे सगळे शहराचा गुणधर्म सांगणारे आहेत. प्रमोशन आणि स्टेटस यांची गल्लत करून चालत नाही, याचे उदाहरण म्हणजे तुंगा आणि सुरेश. बायकोने हुशारी दाखवून नवऱ्यापेक्षा वरचे प्रमोशन मिळवणे म्हणजे नवऱ्याचा अपमान. म्हणून तिने मुद्दाम नापास व्हायचे, नवऱ्याचा अपमान टाळण्यासाठी. आपुलकी-आत्मीयता जपणारे नाते असूनही ते व्यक्त करण्याचे नियम आहेत. त्यापलीकडे गेले की भुवया उंचावतात आणि प्रश्न निर्माण होतो,‘मग?’ नात्याच्या नसलेल्या तारामावशीच्या निधनामुळे क्षिप्राला शोक अनावर झाला, तेव्हा नाते नसलेली ही बाई इतकी का शोक करतेय, असा प्रश्न विचारला जातो. स्वतःची जमीन, स्वतःची इमारत, तिच्यात राहणारे भाडेकरू कसेही वागले तरी त्यांना पाठीशी घालणारा मालक हा तर मोठाच विषय. अशा इमारतींमध्ये घरकाम करणाऱ्या गोदू, यम्नी, गंगी यांचे स्वतःचे मनस्वीपण. आपली चूक असतानाही तिच्यातून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी ठामपणे बतावणी करणारी तापी, प्रवास आणि पार्टी यात व्यस्त असलेला नवरा आणि त्याच्या तालावर नाचण्यासाठी तारेवरची कसरत करणारी बायको, महाविद्यालयीन मुले आणि मुली यांच्या प्रेम व मैत्रीबद्दलच्या असलेल्या कल्पना, त्यांच्या तोंडी असलेल्या भन्नाट वाक्यांची सहजता दाखविणारी कावेरी आणि त्यांनी धसका घेतलेले तिचे आईवडील, पदोपदी आढळणारी फसवणूक, भोंदूगिरी, लबाडी यांचा ठणकावून पर्दाफाश करणारी इंद्रायणी; बायको कितीही गुणी असू देत, तिला काय ००० कळतं, अशी वृत्ती असलेला नवरा; मारामाऱ्या, दहशत, व्यसने यांनी भारलेल्या वातावरणात सुगावा लागू न देता हिंस्रपणे वावरणारी माणसं, सेल्समन म्हणून दारावर येणारे तरुण, कॉलनी-सोसायटीत होणारी भांडणे व उपद्रव, असा अनेक व्यक्तिरेखांच्या द्वारे शहराचा विशाल पट या पुस्तकातून आपल्यासमोर उलगडत जातो. जणू शहरातील वेगवेगळ्या भागांतून लेखिकेने वास्तव्य केलेले असून त्या सगळ्या व्यक्तिरेखांशी त्यांचा परिचय आहे. यात जशी उच्चभ्रू सोसायटी येते, मध्यमवर्गीयांची कॉलनी येते, तशी गरिबांची झोपडपट्टीही येते. प्रत्येक स्तरावरील व्यक्तिरेखा त्या त्या प्रसंगी कशी वागेल, बोलेल, प्रतिक्रिया व्यक्त करील, त्यांचे सूक्ष्म अवलोकन केलेले दिसून येते. त्यामुळे त्यात कुठे कृत्रिमता न येता सहजता जाणवते. यातले आणखी एक वैशिष्ट्य असे की, यातील प्रत्येक व्यक्तिरेखेला दिलेले नाव हे नदीचे आहे. गंगा, यमुना, कावेरी, इंद्रायणी, तापी, विपाशा, कालिंदी, पवना...

लेखिकेच्या लिखाणातील सहजता जशी भावणारी आहे तसा आरंभाशी जुळणारा कथेचा शेवट, आपल्याला जे सांगायचे आहे त्या तत्त्वाला जोडणारा. त्यामुळे प्रत्येक अनुभवाची पातळी स्वतंत्रपणे परिणाम करणारी जाणवते. घर आणि घरातील व्यवहार, परस्परसंबंध यांचा गोफ सुरेखपणे विणलेला आहे. ‘सगळे खाली उतरले तेव्हा चंद्राची चपराक आपल्यालाच बसली असावी असं ओशाळेपण नीट न घासलेल्या भाड्यांला खरकटं राहून जावं तसं प्रत्येकाच्या मनाला चिकटून राहिलं होतं.’ ‘हे असं एकदम काय होतं? क्षणापूर्वी नदीवरून येणाऱ्या झुळकांनी सुखावलेले जीव घसा सुकून वाळवंटातल्या बिनसावल्यांच्या जगात तडफडायला लागतात.’ अशा वाक्यांतून तो व्यक्त झाला आहे.

अफाट असे जग असलेल्या शहरातला प्रत्येक जण स्वतःचे अस्तित्व घेऊन वावरत असतो. या अफाट जगाचा तो एक अभिन्न असा घटक असतो, तरीही त्याचे अस्तित्व हे शहराच्या दृष्टीने पुसट झालेले असते. त्याचे वावरणे हा केवळ असतो भास, अंधारातील सावलीसारखा. अशा असंख्य सावल्या या शहराच्या अस्तित्वात आपले हरवलेले अस्तित्व शोधताना दिसतात. तीच यथार्थ कल्पना सुप्रिया वडगावकर यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठावर कल्पकतेने साकारलेली आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आठवणीतला गाव**

**अशोक बेंडखळे**




'एका क्षणी मन आनंदाने फुलून जाण्याचा तर दुसऱ्याच क्षणी दुःखाने सैरभैर झाल्याचा काहीसा सुन्न अनुभव या कातरवेळीच येतो. तसा हा अनुभवक्षण कुणाला देऊ शकत नाही वा सांगूनही शब्दातून पूर्ण समजत नाही. तर हा अनुभव स्वतः भोगायचा असतो आणि संपूर्ण उपभोगून आठवणीत साठवायचा असतो. हा अनुभव इतका उत्कट असतो की, ज्यांनी अजूनही गावाकडली खेड्यामधील एकही कातरवेळ नि त्या काठी फुललेली कातरसांज अनुभवलेली नाही त्याच्यासारखा कमनशिबी तोच.'अनुभवांचे बोल असे उत्स्फुर्तपणे व्यक्त होतात.

आजच्या नावाजलेल्या लेखकांमध्ये एक नाव आहे अशोक बेंडखळे यांचे. जवळपास पंचवीस ग्रंथांची निर्मिती त्यांच्या नावावर आहे. नियतकालिके आणि वर्तमानपत्रांतील स्तंभलेखन यातून सातत्याने ते वाचकांच्या भेटीला येत असतात. त्यांचे अलीकडे प्रकाशित झालेले पुस्तक म्हणजे 'आठवणीतला गाव' हे होय. विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा हा संग्रह आहे. तरीही तो ताजा टवटवीत वाटावा असा, एकाच विषयाला धरून सिद्ध केलेला संग्रह आहे. विषय आहे, गाव आणि त्याच्या आठवणी. सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले कोकणातले खेडेगाव. म्हणजे निसर्गाचा सुंदर वरद्हस्त लाभलेले गाव. अशा रम्य गावी बालपण गेलेले असल्याने त्याच्या आठवणी देखील तितक्याच सुंदर, लोभस, निरागस आणि रमणीय आहेत याचा प्रत्यय हे लेख वाचताना येतो. वर नोंद केलेली कातरवेळ किती हळवी आहे, ती लेखकाच्या मनावर कशी आरूढ झाली आहे, वयाच्या पल्याड अनुभूती देणे म्हणजे काय, ते वर्णन या लेखात आहे.

बालपण मागे सोडून पुढच्या पर्वात पदार्पण झाले तसे खेडेही मागे पडले. तालुका, शहर, महानगर असा प्रवास सुरू झाला. तिथले जीवन खेड्यासारखे सुंदर कसे असणार? तिथली रूक्ष, व्यवसाय आणि वेळेशी जखडलेली संस्कृती कोरडेपणाचा अनुभव देणारच. परंतु लेखक म्हणून त्याकडे पाहताना मनाचा ओलावा कुठे हरवलेला नाही, वा रूक्ष झालेला नाही. उलट त्यातूनच गावच्या आठवणी तीव्रपणे समोर येतात, तुलना करायला भाग पाडतात. बालपणापासून मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या काही जागा आहेत. त्यात आहे पाऊस आणि थंडी. चैत्र आणि श्रावण. गुढीपाडवा, गणपती, दसरा-दिवाळी. जत्रा आणि गावाकडचा रानमेवा. पाऊस हा सर्वत्र सारखाच समजला जातो. परंतु तसे नाही. पाऊस हा खेड्यातला वेगळा आणि शहरातला वेगळा असतो. पाऊस बालपणाचा वेगळा असतो आणि बालपण ओसरल्यानंतरचा वेगळा असतो. त्या प्रत्येक टप्प्यावर येणारा अनुभव वेगळा वेगळा असतो. त्यांच्या तऱ्हा कशा वेगळ्या अनुभवास आल्या, त्यांचे वर्णन 'पावसाच्या तीन तऱ्हा' या लेखात आहे. थंडी म्हटली की शेकोटी आलीच. थंडीबरोबर धुकेही आलेच. या दिवसांत हवेहवेसे वाटणारे ऊन आणि धुक्यात हरवलेली वाटच नव्हे तर डोंगररांगाही, हे सारेच अंगावर शहारा आणि रोमांच उभे करणारे. चैत्र हा वर्षारंभाचा मास. याची सुरुवात होते ती गुढीपाडव्याने. शालिवाहन शकाचा प्रारंभ म्हणून प्रतिपदेला गुढी उभारून संवत्सराची पूजा केली जाते. नववर्षाचे स्वागत आनंदाने करायचे हा त्यापाठचा हेतू. त्याची तयारीही तशीच असायची. गुढी उभारणे, गोडधोड भोजन. एक चैतन्यमय वातावरण असायचे. परंतु शहरात आगमन झाले आणि गावाकडचा हा उत्साह, आनंद यांचा जणू बोनसाय झाला. शहरात ना चैत्राचे भान, ना गुढीचे. कुणी अगदीच भान ठेवून उभारली तर ती अगदी इवलीशी. पावसाविषयी तर अनास्थाच, दैनंदिन व्यवहारात अडसर ठरतो म्हणून. त्यात आनंद घेणे दूरच. थंडीला इथे कुडकुडायला थाराच नाही. आलीच चुकून तर चारआठ दिवस, पाहुणी आल्यासारखी. त्यामुळे कौतुक कोण करणार? गणपती, दसरा यांचे शहरी रूप म्हणजे नुसताच धांगडधिंगाणा, जल्लोष उत्सवीस्वरूपाचा. भाव, भक्ती, आपसातले प्रेम, सोने वाटणे यांना जणू होळीत अर्पण केलेले. जत्रा, सिनेमा, गावरान मेवा यांचे अप्रूप असण्याचे तर शहरात कारणच नाही.

शहरातल्या कोरडेपणाने गावच्या ओलाव्याची आठवण तीव्रतेने होते. दोन्ही ठिकणी वास्तव्य असल्याने त्यातली तुलना आपोआपच समोर येते. त्यातून ज्यांचे बालपण ग्रामीण भागात गेले, त्यांना तीच ओढ, आनंद, उल्हास, प्रेम, संस्कृती, चालीरीती, परंपरा, निसर्गचक्र याचे अप्रूप वाटत राहते, मन सतत तिकडेच ओढ घेते. त्यापुढे शहरातला हा साजरेपणा बेगडी वाटत राहतो,हे सारे लेखकाने मांडले ते जिव्हाळ्याने, आत्मीयतेने. डॉ. दत्ता पवार यांनी प्रस्तावनेत लेखकाच्या आठवणींचे कौतुक केले आहे.

रम्य ते बालपण असे नेहमीच म्हटले जाते. परंतु ते तितकेचलीलया कागदावर उतरले तर त्यातले रम्यपण कायम राहते. केवळ स्मरणाच्या नावाखाली स्वतः, मी, मला, माझे असेच येत रहिले तर त्यात रूक्षपणाच अधिक येण्याची शक्यता असते. तसे इथे झालेले नाही. गाव आठवणीतला आहे तो तसाच वाचकांसमोर आला आहे. दिलेल्या शीर्षकाप्रमाणे लेखांची वर्णने आहेत. ही वर्णने एकांगी नाहीत. कवितेच्या चपखल ओळी, अन्य पुस्तकांतील वर्णने यांचेसमर्पक संदर्भ देऊनलेखांना अलंकृत केलेले आहे. लेखकाचा स्वतःचा बाज आहे. अनुभव, निरीक्षण, तुलना यांच्याकडे पाहण्याची अलवार दृष्टी आहे. त्यामुळे आलेली वर्णने थेट मनावर आरूढ होतात. वाचकालाच भूरळ घालतात, नकळत चिंब करीत जातात. जशा, 'आठवणी एखाद्या फुलाच्या गंधाप्रमाणे अजून ताज्या आहेत, त्या आठवत मी मोकळे क्षण भोगीत बसतो. त्या दिवसातील अनोख्या आठवणींचा मध थेबाथेबांने माझ्या अंतःकरणात पाझरून घेत मी ताजातवाना होतो.'

मागे वळून पाहताना आठवतो तो गाव. तिथला परिसर, नदी, डोंगर, शाळा, सवंगडी, पाऊस आणि बालपण. हे सारे मुखपृष्ठावर साकारले आहे ते पुंडलिक वझे यांनी. जणू आठवणीतला गावच समोर उभा राहिला आहे.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रुपये**




# ग्रंथपान

**मी स्त्री आहे म्हणून...**
**संपादन : अरुण शेवते**




माणूस हुन्नरी असेल तर त्याच्या कल्पनेला पंख लावण्याची गरज असत नाही. कल्पनाच त्याच्या मागे धावत (उडत?) येतात.तो जे काही मनाशी कल्पून सत्यात उतावण्याची प्रयत्न करील, ते स्वप्नवत नसेल परंतु 'व्वा !' अशी दाद देण्यास नक्कीच भाग पाडील. आणि ती दाद असेल ती त्याच्या हुन्नरीपणाला. असा हुन्नरी माणूस म्हणजे अरुण शेवते.संपादक, लेखक, कवी, संग्राहक वगैरे वगैरे.'ऋतुरंग' या दिवाळी अंकाने यंदाचे वर्ष रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. या पंचवीस वर्षाच्या प्रवासात दिवाळी अंकांच्या माध्यमातून विषय, आशय आणि साहित्यिक यांचा जो उत्सव संपादक शेवतेनी मांडला, तो अचंबित करणारा म्हणावा लागेल. त्याच विषयांची पुस्तकरुपाने भेट वाचकांच्या हाती देण्यातला चोखंदळपणाही तितकाच औचित्यपूर्ण असा आहे.'मी स्त्री आहे म्हणून...' हे पुस्तक त्यापैकी एक.

'मी स्त्री आहे म्हणून...' हे निवडक लेखांचे पुस्तक आहे. या लेखांच्या लेखिका आहेत उर्मिला पवार, विजया राजाध्यक्ष, शिरीष पै, प्रतिभा रानडे,यशोधरा काटकर, शारदा साठे आणि सुरेखा सबनीस. आपापल्या क्षेत्रात भक्कमपणे पाय रोवून उभ्या असलेल्या, आपल्या मताशी ठाम असलेल्या,समाज आणि आपण याचा अभ्यास असलेल्या,स्वतःविषयीच्या आणि आपल्या भोवती वावर असलेल्यांच्या मानसिकतेविषयी जागरूक असलेल्या या लेखिका आहेत, याचा प्रत्यय त्यांचे लेख वाचताना येतो. कर्तृत्व आहे, त्याप्रमाणात सन्मान मिळणे अपेक्षित असतो. परंतु दलित असणे आणि त्यातून स्त्री असण्याचा मानसिक त्रास कसा सहन करावा लागला, याविषयी उर्मिला पवार यांनी लिहिले आहे. ग्रामीण भागातले अनुभव विखारी आहेतच पण शहरी भाग जात आणि बाई या दोन स्तरावर तितकेच तीक्ष्ण अनुभव देण्यात मागे नसतो. त्यामुळे होणारा मानसिक कोंडमारा किती तीव्रपणे दंश करीत राहतो, याचे दाहक चित्रण 'दुस्तर' या लेखात केले आहे.त्या लिहितात, 'माझी नोकरी हीच माझी भाकरी असल्याने माझ्याही अनेक मर्यादा असत आणि जातीतून येणारा, स्त्रित्वातून येणारा न्यूनगंड माझ्या जाणीवनेणिवेत दबा धरून बसलेला होता.'

स्त्री म्हणून स्वतःचा शोध कथा, ललितलेख यातून घेतला. त्यातील व्यक्तिरेखा ही माझीच रूपे आहेत, त्या त्या संदर्भानुसार बदलेली. असे 'स्त्री असणे हेच खरे आव्हान' या लेखात सांगताना विजया राजाध्यक्ष काही साहित्यकृतींचा संदर्भ देतात. शशी देशपांडे यांची 'दॅट लाँग सायलेन्स' ही कादंबरी, एरिका जोंग यांची 'वुमन इनफ' ही कविता. या साहित्यातून व्यक्त झालेला स्त्रीचा आवाज आणि मौन, हा आपला, प्रत्येकीचे प्रतिनिधीत्व करतो. तशी प्रत्येकीची वाट वेगळी असते, अनेक वाटा समोर असतात. तरी जे अनुभव अनुभवता आले ते केवळ स्त्री आहे म्हणूनच.

'स्त्रीत्वाची खंत नाही' या लेखात शिरीष पै लिहितात, संपादक म्हणून काम करताना अनेक बरेवाईट अनुभव आले ते केवळ स्त्री आहे म्हणून. परंतु स्त्री म्हणून जन्माला आले याची कधी खंत वाटली नाही किंवा मी पुरुष असते तर याहून अधिक कर्तबगारी गाजवली असती याची रुखरुखही माझ्या मनात नाही. एक स्त्री या नात्याने जीवनामधले जे जे अनुभव मी घेतले, त्या अनुभवांचा अंशमात्र अनुभव एखाद्या पुरुषाला येईल का?

आईच्या शिकवणीप्रमाणे बाईने शहाणपणा, समजूतदारपणा जपावा, बंडखोरपणा करू नये हे तत्त्वज्ञान कितीही शीलालेखासारखे मनावर बिंबवले तरी अनेक अडचणी, जबाबदाऱ्या जेव्हा समोर येतात, तेव्हा मी स्त्री आहे म्हणून त्या टाळता येत नाहीत. त्यांना सामोरे जावेच लागते. तरीही आपण कुटुंबप्रमुख आहोत, हा अहंभाव जोपासता येत नाही. 'पिंजड़ा लेकर उड़ जा पंछी' या लेखात प्रतिभा रानडे यांनी अनेक उदाहरणांसह आपले मनोगत व्यक्त केले आहे.

स्त्रीला आपला सन्मान, आपलेपण जपण्यासाठी अनेक आघाड्यांवर कसरत करावी लागते. परंतु ठामपणे निर्णय घेतले, धाडसाने पाऊल टाकले तर अशक्य नावाची गोष्ट 'स्त्री आहे म्हणून' आड येत नाही, या विषयीचे अनुभव आणि विचार यशोधरा काटकर यांनी 'घरासाठी' या लेखात व्यक्त केले आहेत. शारदा साठे यांनी 'बंडखोरीचा शिक्का' या लेखात स्वतःचा घेतलेला शोध स्पष्ट केला आहे. वागण्यात काही पारंपरिकता बाजूला ठेवली गेली असेल तर ती कुणाला बंडखोरी वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्यांना तशी ती स्वतःला वाटत नाही. याचे कारण त्यांचे जडणघडणीतून साकारलेले व्यक्तिमत्त्व, कार्यकर्ती असणे आणि स्त्रीवादाचा विचार. त्यामुळेच त्या लिहितात, 'मी बाई आहे म्हणून मी काहीही केलं तरी ते परंपरा मोडणारंच असणार. त्यामुळे अल्टिमेट बंडखेरीचा शिक्का माझ्यावरच बसणार!' सुरेखा सबनीस यांनी 'बिकट वाट वहिवाट नसावी' या लेखात स्त्री म्हणून पदोपदी आलेले अनुभव व्यक्त केले आहेत.

हे सर्वच लेख पुनर्प्रत्ययाचा अनुभव देणारे आहेत. स्त्री म्हणून घेतलेला हा स्वतःचा आत्मशोध आहे. त्याचवेळी कुटुंब, आप्त, सहकारी, समाज यांच्याही मानसिकतेचा शोध आहे.संस्कार, परंपरा, नाते यांच्या चौकटी, दुय्यम स्थान, असमानता, सृजन, शक्ती यासारख्या प्रश्नांच्या आवर्तनात 'स्त्री आहे म्हणून' विषयी अनुभवाधारित विचार व्यक्त झालेले आहेत. सर्वच लेख हे लेखिकांच्या अंतर्मनाचा, अनुभवांचा, धांडोळा घेणारे आहेत. त्यांच्यातला प्रांजळपणा, परखडपणा आणि स्वतःविषयीचे चिंतन अंतर्मुख करणारे आहे.

या पुस्तकाची मांडणी करताना त्यात रेखाचित्रांचा सुरेख वापर केलेला आहे. प्रत्येक लेखाच्या अगोदरचे रेखाचित्र हे जणू त्या लेखाचे आरशातील प्रतिबिंब आहे, इतके ते चपखल झाले आहे. तितकेच उत्तम झाले आहे ते मुखपृष्ठ. स्वतः विणलेल्या घरट्याच्या काठावर मागे वळून पाहणारी पक्षीण, ती प्रतिनिधित्व करतेय स्त्री मनाचे, कष्टाचे, संसाराचे आणि साशंकतेचे.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रुपये**



# ग्रंथपान

**रस्त्यावरची मुले**
**संघर्ष हमारा फाउंडेशन'चा**
**आशा राणे**




समाजात किती प्रकारच्या समस्या असू शकतात, आणि त्यासाठी काम करणाऱ्या किती संस्था आहेत, यांची कल्पना सामान्यपणे लोकांपर्यंत पोहोचत नाही. काही प्रश्नांविषयी वृत्तपत्रीय लेखनातून कधीकाळी दर्शन घडते. नाही असे नाही, परंतु ते तेवढेच. त्यातली आस्था आणि कळवळा तात्कालीक ठरतो. परंतु 'हमारा फाउंडेशन'सारख्या संस्था किती तळमळीने आणि जिद्दीने काम करतात, हे नजरेस येते ते अशा तऱ्हेची पुस्तके समोर आल्यानंतरच.

आशा राणे यांच्या जिद्दीचा आणि तळमळीचा हा प्रवास आहे. सामाजिक भान ठेवून त्याच क्षेत्रात स्वतःला झोकून देणे सोपे नाही. हे झोकून देणे वरवरचे नाही. आपला वेळ, कुटुंब, करियर यांना प्रसंगी मागे ठेवून सरसावणे, त्याच ध्यासात बुडून जाणे, हे केवळ आशा राणेच करू शकतात, असा अनुभव हे पुस्तक वाचताना येतो.

उत्तम शैक्षणिक गुणवत्ता लाभलेल्या आशा राणे, हाताशी टेलिफोन एक्सचेंजमधील नोकरी असताना देखील त्या समाजातील वंचित घटकांबरोबर काम कसण्यास सरसावल्या. अवघ्या २२व्या वर्षी त्या शासनाच्या समाजकल्याण विभागात 'प्रोबेशन ऑफिसर' म्हणून रूजू झाल्या, आणि तिथून या पर्वाला सुरुवात झाली. मानसशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयाच्या अभ्यासाने त्यांना हे क्षेत्र निवडण्यास बळकटी दिली, असे त्या नमूद करतात.

स्त्रियांचे प्रश्न आहेत. ज्या अनेक व्याधींनी ग्रस्त आहेत, अनेक कारणांनी त्या शोषणाला बळी पडलेल्या आहेत. निराधार झालेल्या आहेत, तर काहींना कायद्याच्या कक्षेने सुधारगृहात दाखल केलेले आहे. अशा स्त्रियांमध्ये काही विवाहित, विधवा, परित्यक्ता, काही अविवाहित आहेत. यांना पुन्हा आधार मिळून देणे, आयुष्यात स्वतःच्या पायांवर उभे करणे, त्यांना व्याधीमुक्त करणे, समस्यांची सोडवणूक करणे, भावनांवर हळूवार फुंकर घालणे, ही मोठीच जबाबदारी. परंतु आशा राणे सामाजिक उत्तरदायित्वाचा एक ध्यास म्हणून या कार्याकडे पाहतात, त्यामुळे या स्त्रियांना त्यांच्या विश्वात परत पाठवतानाचे समाधान त्यांना मिळाले आहे.

या कार्यासाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था, कायदे, न्यायालय आहेत. त्यांच्या चौकटीत राहून, काळजीपूर्वक अभ्यास करून या स्त्रियांचे आयुष्य सावरायचे असते. ते सावरण्याचे काम उत्तमपणे आशा राणे यांनी केले आहे. इतकेच नव्हे तर, तृतीय पंथीयांचे प्रश्न आहेत. त्यांच्या समस्या आहेत. त्यांच्याविषयी देखील आशा राणे यांनी काम केले आहे.

स्टेशन परिसर, बसस्टँड, रस्त्यावर अनेक मुले अस्वच्छ, बेवारशी अवस्थेत वावरताना दिसत असतात. त्यांच्याविषयी कनवळा, जिव्हाळा असणारी माणसे मोजकीच, तीही शब्दिक. परंतु जाणीवपूर्वक त्यांच्याकडे पाहणारी, त्यांच्यासाठी काम करणारी माणसे, आशा राणे यांच्यासारखी अपवादानेच. या मुलासांठी काम करताना त्यांचा सर्वांगीण अभ्यास करणे आवश्यक असतो. त्यांची रस्त्यावर येण्याची कारणे, त्यांची कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, सामाजिक –राजकीय–शैक्षणिक परिस्थिती, त्यांचे भावविश्व, मानसशास्त्र, ते करीत असलेले अर्थाजनासाठीचे उद्योग, त्यातून येणारी व्यसनाधीनता, उपासमार, कुपोषण, शोषण, त्यांच्यासाठी असलेले धोरण, योजना, कायदे, हक्क, असा मोठा पट समस्यांनी विणलेला आहे. हा एक मोठा संघर्ष आहे. या मुलांना केवळ सुधारगृहात घालून नवे आयुष्य देता येत नाही. त्यासाठी आस्थेवाईकपणे जिद्दीने मेहनत घेण्याची गरज असते. हमारा फाउंडेशन ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. असे फाउंडेशन असावे, त्याची स्थापन करण्यात आपण पुढाकार घ्यावा, या मागची प्रेरणा आणि पार्श्वभूमी वेधक आहे. हमारा फाउंडेशन करीत असलेली वाटचाल बिकट असूनही जिद्दीने ती करीत आहे, हे सारे श्रेय आशा राणे यांच्याकडे जाते.

आशा राणे यांचे हे चरित्र नाही, त्यांच्या कार्याविषयीची माहिती अनुभवांसह त्यांनी वाचकांच्या समोर ठेवली आहे. ती वाचून कुणाला त्यांच्याप्रमाणे कार्य करण्याची प्रेरणा झाली, तर लेखनाचे सार्थक झाले, असे म्हणता येईल. हे पुस्तक लिहिताना त्याचे भाग पाडले आहेत. त्यांना स्वतःविषयीचे जे सांगायचे आहे ते त्यांनी विस्तृतपणे मनोगतात मांडले आहे. परतु हे मांडणे स्वतःचा मोठेपणा सांगण्यासाठी वा दाखविण्यासाठी नाही, आपली भूमिका कशाप्रकारे पार पाडता आली, त्याविषयी त्यांनी लिहिले आहे. हे लिहिणेसुद्धा मोकळेपणाचे आहे. यात भावनिक गुंता नाही. कुटुंबाकडे प्रसंगी दुर्लक्ष करावे लागले, तरी कुटुंबियांकडून मिळालेली साथ किती मोलाची होती, याविषयी त्या कृतज्ञ आहेत. त्यांच्यासोबत काम करणारे सहकारी त्यांचे अनुभव कथन करतात. यासाठी स्वतंत्र प्रकरण दिलेले आहे. ज्यांना या संस्थेमुळे जगण्याचे बळ मिळाले, नवी भरारी घेता आली, त्यांची मनोगते आहेत. जणू हे एक कुटुंब आहे, अशा भावनेने जसे त्यांचे कार्य चालते, त्याच आपुलकीने हे लेखन झालेले आहे. मोठा आवाका असलेला प्रकल्प, त्यात येणारे अनुभव मनाला उभारी देणारे कसे असतील, यापेक्षा ज्यांच्यासाठी हा आग्रह आहे, त्यांच्या मनाला उभारी कशी मिळेल, याचे दर्शन घडवणारा आहे. लेखनातला सुटसुटीतपणा, कायदे, नियम, हेतू यांची माहिती वाचकांसाठी नक्कीच अनोखी आहे. एक वेगळे विश्व यातून समोर येते.

आशा राणे यांना त्यांनी केलेल्या कार्यासाठी, आणि त्यांच्या 'हमारा फाउंडेशन'ला मिळालेले पुरस्कार हा त्यांचा गौरव आहे. रंगीत फोटो या कार्याची ओळख करून देतात. रेणू गावस्कर आणि अरुण खोरे यांच्या प्रस्तावना आशा राणे आणि त्या करीत असलेले कार्य, यांचा मागोवा घेणाऱ्या आहेत.

पुंडलिक वझे यांनी मुखपृष्ठ सजवले आहे. रस्त्यावरची मुले, त्यांचे मुक्त जगणे, अर्थाजनासाठी पत्कलेले उद्योग, त्यातून पाठीशी दप्तर टांगण्यापर्यंतचा प्रवास, रस्त्यावरील सिग्नलच्या खांबावर टांगलेल्या शाळेच्या पाटीशी येऊन थांबतो. शीर्षकाला सार्थ करणारे सुंदर मुखपृष्ठ.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!**

**सुशीलकुमार शिंदे**




कागदाला येते खाज,
म्हणून थोडीच लिहितो कोणी?
काळीज चिरताना गप्प बसवत नाही हेच खरं.

अशा ओळी लिहिणारा कवी किती संवेदनशील आणि अस्वस्थ आहे याची कल्पना यावी. सभोवताली सर्वत्र असह्य ओल असेल तर कवी कोरडा राहणार कसा? आकर्षण वाटावे असे गाव म्हणजे शहर. सगळ्या सोयीसुविधांचे आगार. सुंदर, रमणीय, स्वप्ननगरी वाटावे असे. हवे ते हाकेच्या अंतरावर उपलब्ध होण्याची हमखास खात्री. म्हणून ते सारेच चकाकणारे सोने असते, असे नाही. ते भ्रमिष्टासाररखे आहे.

शहरात येणारी माणसे ग्रामीण भागातून आलेली असतात, पोटाला आधार शोधीत. कुणी सिग्नलशी उभा राहतो, कुणी रस्त्यावर, कुणी फॉकलंड रोडवर. ही बिनचेहऱ्याची माणसे कुठून आली, हा प्रश्न या शहराला कधीच पडत नाही. तेवढा वेळी त्याच्याकडे नाही. जगण्यासाठी कुणी रस्त्याच्या कडेला, फुटपाथवर, गटारीच्या काठावर, पुलाखाली, जागा दिसेल तिथे पथारी टाकतो. झोपटपट्टी आणि डोंगर यांचेतर इथे अतूट नाते. डोंगराने या लोकांचे पालकत्व स्वीकारल्याची कल्पना कवीने चपखलपणे मांडली आहे. तर दुसरी बाजू आहे ती मतलबी दुनियेची, जी मतांसाठी कनवळा घेऊन येते. उंच चकचकीत इमारतींच्या हुकाला टांगलेल्या कोंबडी-बोकडासारखे असूनही 'साब हसनेका, जिंदगी ऐसीच है' असे हे इथले जगणे आहे.

शहर यंत्रवत तसे इथले जगणे यंत्रवत, त्याच्या जिभेतून ओघळत राहते रक्त. इथे सांडणाऱ्या घामाला गंध नसतो. घाम, रक्तच नव्हे तर माणसाला पचवून करपट ढेकर देणारे हे शहर आहे. वाळूने इमारतीना बळकटी येते, पण तीच वाळू वाळवंट निर्माण करीत आहे, इमारतींच्या जंगलाचे, माणसांचे. शहर शहर राहिले नसून ते जंगल झाले आहे. गिरणी हा इथला आत्मा होता. आर्थिक व्यवहाराचे झाड होते. आता तिथली माणसे परागंदा झालीत.

विकृती, क्रौर्य यातून सर्वच मूल्यांचे विघटन होत आहे. माणसाचे माणूसपण जनावरांच्या स्तरावर आले आहे. त्यामुळे हे शहर आत्महत्या करण्याच्या कपारी उभे आहे. इथे मार्क्स, स्मिथ, डार्विन यांचे तत्त्वज्ञान फोल आहे.

कवी केवळ शहराचेच वर्णन करतो असे नाही. फाशी घेतेलेल्या नवऱ्याच्यापाठी कुटुबांसाठी माळाच्या काळजाला पाझर फोडणारी, काळ्याआईला सवाष्णपण बहाल करणाऱ्या माउलीचे कष्ट आहेत. शेती, तिच्यावर राबणारा शेतकरी, त्याचा कवडीमोल झालेला घाम, त्यातून हरवत चाललेली एक संस्कृती भविष्यात कुठल्याही उत्खननात सापडणार आहे? शहरीकरणाच्या नावाखाली मागे उरलेले घुबड, म्हातारा लिंब आणि बकाल झालेले गाव, हा वास्तवावरचा घाव मन सुन्न करणारा आहे. जागतिकीकरणाने व्यवहार, सुबत्ता, चकचकीतपणा यांच्यात बदल झाले असतीलही, परंतु सामान्य माणसाला पडलेली पोटाची भ्रांत आणि शरीराचे मुटकुळे टाकायला हवी असणारी जागा यात काही फरक पडलेला नाही. मग जागतिकीकरण आहे कुठे? माणूसकी, विश्वकल्याण यासाठी आदिकाळापासून सुरू असलेला घोष का कोरडा पडतो आहे, हा कवीचा प्रश्न आहे. तरीही कवी आशावादी आहे, सूर्यबीज डोळ्यांत साठवलेली माणसे या वाटेने येतील, उजेड पेरणाऱ्या मशाली अद्यापही कुणाच्याच गुलाम नाहीत, या ओळी तो आशावाद व्यक्त करतात.

रक्तात मिसळत जाणारं राक्षसीकरण, 'आत्मा विकणे आहे'ची पाटी, आदिम वर्षांची घुसमट, जिंदगीची शाळा, अॅबॉर्शन केलेल्या कविता, रक्ताळलेले शब्द, अशा आशयाची एकूण सगळीच शीर्षके कवीच्या मनातली तगमग व्यक्त करणारी असल्याची दिसून येतात.

कागदावर उतरले ते
निव्वळ शब्द नव्हतेच कधी,
ती आदिम वर्षांची घुसमट
सांडत गेली अक्षरांतून सहजपणे.

खोलवर निरीक्षण आणि त्यावरचे भाष्य हे जगण्याशी जोडले गेलेले असल्याने ही जगण्याची चित्रमय कविता आहे. प्रत्येक कविता एक स्वतंत्र अनुभव देते. आशयाला थेट भिडते. त्यातून कवीची प्रगल्भता आणि भवतालाकडे पाहण्याची दृष्टी यांचा प्रत्यय येतो. काही शब्द बोचरे आहेत, तरी ते रोखठोक आहेत. नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांचे स्मरण करून देणारा हा संग्रह आहे.

प्रा. रणवीर शिंदे, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची अभ्यासपूर्ण अशी विस्तृत प्रस्तावना लाभलेली आहे. कवी आणि कविता यांचा सर्वांगाने घेतलेला शोध या प्रस्तावनेत आहे.

मुखपृष्ठाबाबत स्टेशनरोड असा उल्लेख आहे. स्टेशनरोडला असणारा माणसांचा कोलाहल इथे आहे, प्रत्येकाची जगण्याची धडपड आणि तऱ्हा वेगवेगळी आहे. गर्दीत असूनही प्रत्येकाचे स्वतःचे वेगळे अस्तित्व आहे. शहराचे वैशिष्ट्य मुखपृष्ठावर दिसून येते.

**मूल्य ८० रु. सवलतीत ४० रुपये**